CMYK

सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
SOLAPUR TARUN BHARAT

सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित

सोलापूर | शनिवार, १० मे २०२५। युगाब्द ५१२७ । वर्ष ४१ वे अंक १८१ । पाने १२ । किंमत रु. ६/-

| RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |
ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही

dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com

## विचारपुष्प



प. पू. डॉ. हेडगेवार यांचे अंत:करण मातृभूमीच्या उद्धारासाठी शेवटच्या श्वासापर्यंत तळमळत होते. त्यांनी आपले संपूर्ण आयुष्य आपल्या जन्मभूमीसाठी समर्पित केले. डॉक्टरांचे जीवन म्हणजे एक अखंड स्वरूपात चालणारा यज्ञच होता. त्यांनी आपल्या आयुष्याचा क्षण अन् क्षण वेचून हिंदू राष्ट्रामध्ये चैतन्य जागृत करून हिंदू समाजाला एक नवीन दृष्टी प्रदान केली.

**- भय्याजी दाणी**
रा. स्व. संघाचे पूर्व सरकार्यवाह

# शेकडो ड्रोनच्या मदतीने पश्चिम सीमेवर हल्ले



पाकिस्तानच्या माऱ्यात बारामुल्लाच्या गिंगले गावातील घराची पडझड झाली

- तुर्की ड्रोन वापरून केले ३६ ठिकाणांना लक्ष्य
- एअर डिफेन्स यंत्रणेने पाडली तिनशेंवर ड्रोन
- नियंत्रण रेषेवर भारताचे ४ जवान हुतात्मा
- दोन शाळकरी मुलांनी गमावला जीव

**नवी दिल्ली, ९ मे**

तुर्की ड्रोनच्या मदतीने पाकिस्तानने भारताच्या पश्चिम सीमेवरील ३६ महत्वांच्या ठिकाणांना लक्ष्य करीत हल्ले करीत सीमेचे उल्लंघन केले. मात्र, भारताने हे हल्ले पूर्णपणे हाणून पाडले. एअर डिफेन्सने हवेत सर्व ड्रोन नष्ट केले, अशी माहिती परराष्ट्र मंत्रालयाच्या पत्रपरिषदेत कर्नल सोफिया कुरेशी यांनी शुक्रवारी दिली.

८ तारखेला भारताने सकाळी पाकिस्तानवर प्रतिहल्ला करीत लाहोर, सियालकोट आणि कराची येथील हवाई यंत्रणा नष्ट केली. किरकोळ गोळीबाराच्या घटना वगळता दिवसभर शांतता होती. पण, रात्री साडेआठनंतर पाकिस्तानने पश्चिम सीमेवरील ३६ ठिकाणांना लक्ष्य करीत हल्ले केले. मात्र, भारताने हल्ला निष्फळ करीत ड्रोन नष्ट केले. गुप्त माहिती गोळा करणे हा एक उद्देश होता. ढिगाऱ्यांची तपासणी केली जात होती. ते तुर्कीचे ड्रोन आहेत, असे सोफिया यांनी सांगितले. *(वृत्तसंस्था)*

### भारताचे चार जवान हुतात्मा

पाकिस्तानने नियंत्रण रेषेवरही जड कॅलिबर गन आणि सशस्त्र ड्रोनचा वापर करून गोळीबार केला. यामध्ये काही भारतीय लष्कराचे जवान मृत्युमुखी पडले आणि जखमी झाले. यात भारतीय लष्कराचे चार जवान हुतात्मा झाले आणि दोन शाळकरी मुलांना आपला जीव गमवावा लागला. पाकिस्तानने लष्करी आणि नागरी ठिकाणांना लक्ष्य करण्याचा प्रयत्न केला, परंतु भारताने जबाबदारीने प्रत्युत्तर दिले, असे परराष्ट्र सचिव विक्रम मिस्री म्हणाले.

### नागरी विमानांचा ढाल म्हणून वापर

पाकिस्तान नागरी विमानांचा वापर ढाल म्हणून करत आहे. हे आंतरराष्ट्रीय उड्डाणांसह नागरी विमानांसाठी सुरक्षित नाही. कराची आणि लाहोर दरम्यानच्या हवाई मार्गावर नागरी विमाने उड्डाण करत आहेत. भारतीय हवाई दलाने आंतरराष्ट्रीय नागरी विमानवाहू विमानांच्या सुरक्षिततेची खात्री करून, त्यांच्या प्रतिसादात खूप संयम दाखवला आहे, असे कुरेशी यांनी सांगितले.

भटिंडा जिल्ह्यात आढळलेली स्फोटक वस्तू



### प्रतिहल्ल्यात पाकिस्तानला जबर तडाखा

एकीकडे ड्रोनने हल्ला आणि दुसरीकडे नियंत्रण रेषेवर गोळीबार करीत पाकिस्तानने भारतीय सैन्याला कैचीत पकडण्याच प्रयत्न केला पण भारताने जोरदार प्रत्युत्तर देत पाकिस्तानला जबर तडाखा दिला. यामध्ये पाकिस्तानचे मोठे नुकसान झाले. पाकिस्तानी हल्ल्याला प्रत्युत्तर म्हणून, चार पाकिस्तानी हवाई संरक्षण स्थळांवर सशस्त्र ड्रोनने गोळीबार केला. यापैकी एक ड्रोन एडी रडार नष्ट करण्यात यशस्वी झाले.

## बलुचिस्तानच्या एक तृतीयांश भागावर बंडखोरांचा ताबा

**इस्लामाबाद, ९ मे**

देशाचे विभाजन होण्याची परिस्थिती उद्भवली असताना दहशतवाद्यांच्या बचावासाठी पाकिस्तान युद्धासाठी उतावीळ झाला आहे. भारताच्या सीमावर्ती भागातील नागरी वस्तीत गोळीबार आणि ड्रोन हल्ले करून पाकिस्तान युद्धबंदीचे सर्रास उल्लंघन करीत असताना दुसरीकडे बलुचिस्तान मात्र त्यांच्या हातातून निसटत चालल्याचे चित्र आहे. गुरुवारी रात्री बलुच लिबरेशन आर्मीने पाकिस्तानी लष्कराच्या अनेक चौक्यांवर हल्ला केला, यात १५ पेक्षा अधिक सैनिक मारले गेले. बलुचिस्तानची राजधानी क्वेटा, कलात, मस्टंग, कच्छी आणि मंगोचेर शहरांवर कब्जा मिळवल्याचा दावा बलुचने केला आहे. एक तृतीयांश भाग आपल्या ताब्यात असल्याचे बलुचने म्हटले आहे.

**चौक्या सोडून पाक सैनिक पळाले, हल्ल्यात १५ ठार**

**देशाचे विभाजन होणार : शाहीद अब्बासी**

पाकिस्तानचे माजी पंतप्रधान शाहीद खाकान अब्बासी यांनी प्रसार माध्यमांशी बोलतानवा सांगितले की, बलुचिस्तानवर आता लष्कर आणि सरकारचे नियंत्रण राहिलेले नाही. लष्कर प्रमुख असीम मुनीर यांचा बलूच बंडात १५०० नागरिक सहभागी असल्याचा दावा खोटा आहे. तेथील स्थिती एवढी वाईट आहे की, मंत्री सुरक्षेशिवाय बाहेर पडू शकत नाही. आता अनेक भाग बलुचच्या ताब्यात असल्याने देश विभाजनाच्या दिशेने जात आहे. *(वृत्तसंस्था)*

# सिंधू जल करारात हस्तक्षेप नाही

### जागतिक बँकेच्या अध्यक्षांनी स्पष्ट केली भूमिका



**न्यूयॉर्क, ९ मे**

पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर भारत सरकारने सिंधू जल करार तात्पुरता थांबवण्याचा निर्णय घेतला, त्यावर आक्षेप घेत पाकिस्तानने जागतिक बँकेसह आंतरराष्ट्रीय संघटनांकडे तक्रार करून यात हस्तक्षेप करण्याची मागणी केली होती. यावर बोलताना जागतिक बँकेचे अध्यक्ष अजय बंगा म्हणाले, सिंधू जल करारासंदर्भात आम्ही हस्तक्षेप करणार नाही. दोन्ही देशांनी त्यावर आवश्यक तो तोडगा काढावा. संधी निर्माण करणाऱ्या संस्थेपलीकडे आमची कोणतीही भूमिका नाही.

एका आंतरराष्ट्रीय वृत्तवाहिनीला दिलेल्या मुलाखतीत सिंधू करारावर भाष्य करताना बंगा म्हणाले, भारत सरकारने करार पूर्णतः निलंबित केलेला नाही. हा करार सध्या तात्पुरत्या थांबलेल्या स्थितीत आहे. मूळ सिंधू जल कराराच्या चौकटीत निलंबनाची तरतूदच नाही. हा करार रद्द केला जाऊ शकतो किंवा नवीन कराराच्या माध्यमातून त्याची जागा घेतली जाऊ शकते, पण त्यासाठी दोन्ही देशांचा परस्पर सहमतीने निर्णय आवश्यक आहे. पाकिस्तानची तक्रार आणि भारताने दिलेल्या स्पष्टीकरणाची शहानिशा केली आहे, त्यात भारताने हा करार तात्पुरता थांबविला आहे, पूर्णतः निलंबित केलेला नाही, त्यामुळे जागतिक बँक तुर्तास तरी हस्तक्षेप करणार नाही. *(वृत्तसंस्था)*

### जागतिक बँक निर्णय देणारी संस्था नाही



जागतिक बँक ही कोणताही निर्णय देणारी संस्था नाही. जर भारत आणि पाकिस्तान यांच्यात मतभेद झाले, तर जागतिक बँक केवळ सुविधादाता म्हणून काम करते, तसेच तटस्थ तज्ज्ञ अथवा मध्यस्थी न्यायालय नियुक्त करण्याच्या प्रक्रियेसाठी मदत करते. दोन सार्वभौम देशांमध्ये हा करार सुरू ठेवायचा की नाही, हे त्यांच्या निर्णयावर अवलंबून असल्याचे बंगा म्हणाले.

# सीमेवर सात घुसखोरांना कंठस्नान

**जम्मू, ९ मे**

गोळीबार सुरू असताना घुसखोरी करण्याचा प्रयत्न करणाऱ्या सात घुसखोरांना सीमा सुरक्षा दलाने ठार केले आहे. जम्मू क्षेत्रातील आंतरराष्ट्रीय सीमेवरून ते घुसखोरी करण्याच्या प्रयत्नात होते.

एकीकडे दोन्ही बाजूंनी तुफान गोळीबार सुरू असताना सांबा सेक्टरमधील आंतरराष्ट्रीय सीमेवरून दहशतवाद्यांचा एक गट घुसखोरी करण्याचा प्रयत्न करीत असल्याचे कॅमेऱ्यामध्ये दिसून आले. दुसऱ्या बाजूने पाकिस्तानी सैन्य त्यांना कव्हरींग फायर देत होते. टप्प्यात येताच भारतीय तोफा गरजल्या. पाठोपाठ जवानांनी अचूक वेध घेत सातही घुसखोरांना ठार केले. तसेच पाकिस्तानचे धंदार लष्करी ठाणे नष्ट करण्यात आले. *(वृत्तसंस्था)*

## महत्त्वाचे

### इंदूर ठरले भारतातील पहिले भिकारीमुक्त शहर

**इंदूर :** इंदूर हे देशातील पहिले भिकारीमुक्त शहर असल्याचे अधिकाऱ्यांनी म्हटले आहे. प्रशासनाने मोहीम सुरू करण्यापूर्वी एक वर्षापूर्वी शहरातील रस्त्यांवर सुमारे ५,000 भिकारी होते, असे त्यांनी सांगितले. 'इंदूर हे देशातील पहिले भिकारीमुक्त शहर बनले आहे,' असे जिल्हा दंडाधिकारी आशिष सिंह यांनी गुरुवारी प्रसार माध्यमांना सांगितले. भिकाऱ्यांना रोजगार शोधण्यात मदत करून त्यांचे पुनर्वसन करण्यात आले, तर भिक्षा मागणाऱ्या मुलांना शाळांमध्ये दाखल करण्यात आले, असे ते म्हणाले. भिक्षा मागण्याच्या निर्मूलनासाठी आम्ही सुरू केलेली मोहीम स्वतःच एक आदर्श बनली आहे. केंद्रीय सामाजिक न्याय आणि सक्षमीकरण मंत्रालय आणि जागतिक बँकेच्या पथकानेही याला मान्यता दिली आहे, असे सिंह पुढे म्हणाले.

### एसटीच्या नव्या बसेस हायब्रीड इंधनावर चालणार

**मुंबई :** महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ दरवर्षी पाच हजार याप्रमाणे पुढील पाच वर्षांमध्ये २५ हजार बसेस घेण्यात येणार आहेत. सन २०२५-२६ पासून उर्वरित २० हजार बसेस या पर्यावरण पूरक अशा सी. एन. जी. व एल. एन. जी. सारख्या इंधनाबरोबर डिझेल इंधन हायब्रीड करून चालणाऱ्या असतील. डिझेल इंधनाचा वापर केवळ आपत्कालीन परिस्थितीत केला जाईल, जेणेकरून बस प्रवाशांची गैरसोय होणार नाही, अशी माहिती परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी दिली. पर्यावरण पूरक इंधनाच्या संदर्भात बोलावलेल्या एसटी अधिकारी व संबंधित इंधन पुरवठादार संस्थांच्या बैठकीमध्ये ते बोलत होते. सरनाईक म्हणाले, एसटीकडे बहुतेक सर्व बसेस डिझेल इंधनावर चालणाऱ्या आहेत. महामंडळाच्या एकूण खर्चा पैकी सुमारे ३४ टक्के खर्च हा इंधनावर होतो. दररोज सुमारे १० लाख ७० हजार लिटर इतके डिझेल लागते.

## आयपीएल एका आठवड्यासाठी स्थगित



**नवी दिल्ली, ९ मे**

भारत आणि पाकिस्तानमधील लष्करी तणाव वाढल्यानंतर इंडियन प्रीमियर लीग (आयपीएल) २०२५ एका आठवड्यासाठी स्थगित करण्यात आली आहे.

धर्मशाळा येथे गुरुवारी पंजाब किंग्ज व दिल्ली कॅपिटल्स यांच्यातील सामना महत्त्वपूर्ण तांत्रिक बिघाडामुळे मध्यंतरी रद्द करण्यात आल्यानंतर ही घोषणा करण्यात आली आहे.

भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने (बीसीसीआय) चालू टाटा आयपीएल २०२५ चे उर्वरित सामने तत्काळ एका आठवड्यासाठी स्थगित करण्याचा निर्णय घेतला आहे. संबंधित अधिकारी आणि भागधारकांशी सल्लामसलत करून परिस्थितीचे व्यापक मूल्यांकन केल्यानंतर स्पर्धेचे नवीन वेळापत्रक आणि ठिकाणांबाबतची माहिती एका आठवड्यानंतर योग्य वेळी जाहीर केले जातील, असे बीसीसीआयच्या मीडिया सल्लागारांनी म्हटले आहे.

**(सविस्तर वृत्त शेवटच्या पानावर)**

### युद्धाने समस्या सुटणार नाही : महबुबा मुफ्ती

**श्रीनर, ९ मे**

भारत आणि पाकिस्तान हल्ल्यात दोन्ही बाजूंचे नागरिक बळी पडत आहेत. मुले, महिला मारली जात आहे. दोन्ही देशांना माझी विनंती आहे की, हल्ले बंद करावे. युद्ध हे प्रत्येक गोष्टीचा उपाय नाही. या संकटकाळात लष्करी स्थापनाऐवजी राजकीय हस्तक्षेप आवश्यक असल्याचे माजी मुख्यमंत्री व पीपल्स डेमॉक्रॅटिक पार्टीच्या अध्यक्षा महबुबा मुफ्ती यांनी म्हटले आहे.


प्रसार माध्यमांशी बोलताना त्या म्हणाल्या, तणावपूर्ण परिस्थितीमुळे सीमावर्ती भागातील लोक, विशेषतः महिला आणि मुले बेघर होत आहेत आणि भयभीत आहेत. जम्मू आणि काश्मीरमधील लोक किती काळ हा त्रास सहन करतील, असा सवाल देखील मुफ्ती यांनी विचारला. त्यामुळे दोन्ही देशांनी ही परिस्थिती नियंत्रणात आणण्याचा प्रयत्न करावा, असे आवाहन केले आहे. *(वृत्तसंस्था)*

# ऑपरेशन सिंदूर देशाच्या सुरक्षेसाठी आवश्यक आणि अपरिहार्य पाऊल!

### सरसंघचालकांनी केले सशस्त्र दलांचे अभिनंदन

**नागपूर, ९ मे**

पहलगामच्या भ्याड दहशतवादी हल्ल्यानंतर पाकिस्तान पुरस्कृत दहशतवाद्यांवर आणि त्यांच्या समर्थक परिसंस्थेविरुद्ध भारतीय लष्कराने केलेल्या ऑपरेशन सिंदूरच्या माध्यमातून निर्णायक कारवाई करण्यात आली. त्याबद्दल भारत सरकार आणि सशस्त्र दलांच्या नेतृत्वाचे राष्ट्रीय स्वयंसेवक संघाने अभिनंदन केले आहे. पाकिस्तानमध्ये दहशतवाद्यांवर, त्यांच्या पायाभूत सुविधांवर आणि समर्थन यंत्रणेवर केली जात असलेली लष्करी कारवाई ही देशाच्या सुरक्षेसाठी एक आवश्यक आणि अपरिहार्य पाऊल असल्याचे सरसंघचालक डॉ. मोहनजी भागवत यांनी म्हटले आहे.



भारतीय सीमेवरील धार्मिक स्थळे आणि नागरी वस्त्यांवर पाकिस्तानी सैन्याने केलेल्या हल्ल्यांचा रा. स्व. संघाने निषेध केला आहे. तसेच हिंदू पर्यटकांच्या क्रूर हत्याकांडातील पीडित कुटुंबांना आणि संपूर्ण देशाला न्याय मिळवून देण्यासाठी करण्यात येणाऱ्या कारवाईमुळे संपूर्ण देशाचा स्वाभिमान आणि धैर्य वाढल्याचे सरसंघचालकांनी सांगितले. राष्ट्रीय संकटाच्या या काळात संपूर्ण देश तन, मन आणि धनाने सरकार आणि सशस्त्र दलांसोबत ठामपणे उभा आहे असेही त्यांनी सांगितले. सर्व देशवासीयांना सरकार आणि प्रशासनाने दिलेल्या सर्व माहितीचे पूर्ण पालन करण्याचे आवाहन रा. स्व. संघाकडून करण्यात आले आहे. सरसंघचालक म्हणाले, 'या प्रसंगी, आपले नागरी कर्तव्य बजावताना, सामाजिक एकता, समरसता आणि सौहार्द बिघडवण्याचे देशविरोधी शक्तींचे कोणतेही षड्यंत्र यशस्वी होऊ देणार नाही याबाबत आपण सावधगिरी बाळगली पाहिजे.

**लष्कर, नागरी प्रशासनाला सहकार्य करण्यास तयार राहावे**

सर्व देशवासीयांना विनंती आहे की त्यांनी लष्कर आणि नागरी प्रशासनाला आवश्यकतेनुसार सर्वतोपरी सहकार्य करण्यास तयार राहून आणि राष्ट्रीय एकता आणि सुरक्षा राखण्यासाठी सर्व प्रयत्नांना बळकटी देऊन आपली देशभक्ती प्रदर्शित करावी, असे आवाहनही सरसंघचालक डॉ. मोहनजी भागवत आणि सरकार्यवाह दत्तात्रेय होसबळे यांनी केले आहे. *(वृत्तसंस्था)*

# भारत-पाकिस्तान युध्दाच्या पार्श्वभूमीवर विठ्ठल-रुक्मिणी मंदिरास पोलिसांचा कडेकोट बंदोबस्त

### भाविकांच्या तपासणीसह वाहनांचीही चौकशी

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर,दि.९ मे -**

भारत-पाकिस्तान मधील युद्धजन्य तणावाच्या परिस्थिती नंतर खबरदारी म्हणून येथील विठ्ठल मंदिराच्या सुरक्षेत पोलीस विभागाकडून मोठी वाढ करण्यात आली आहे.

जम्मू काश्मीरमधील पहलगाम येथे पाकिस्तानी दहशतवाद्यांनी भारतीय पर्यटकांवर बेछुटपणे गोळीबार केला होता. या भ्याड हल्ल्यात २७ ते २८ पर्यटक ठार झाले होते. लवकरच या भ्याड हल्ल्याचा बदला घेतला जाईल आणि पाकिस्तानला त्यांची जागा दाखवली जाईल असे वक्तव्य भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केले होते. हा बदला घेण्यासाठी भारतीय लष्कराच्या तिन्ही दलांना त्यांनी पूर्णपणे निर्णय घेण्याचे अधिकार दिले होते. त्यानुसार भारतीय लष्कराने ऑपरेशन सिंदूरची आखणी केली होती. या ऑपरेशन मध्ये पाकिस्तानातील आणि भारत - पाक सीमेवरील पाकिस्तानी दहशतवाद्यांच्या तळावर हल्ले करून दहशतवाद्यांचे कंबरडे म ोडले होते. भारतीय लष्कराच्या या हल्लयामुळे पाकिस्तानचे लष्कर देखील घाबरले होते. जगापुढे आपली उरलीसुरली इज्जत जाऊ नये म्हणून पाकिस्तानी लष्कराने गुरुवारी (ता.८) संध्याकाळी भारताच्या काही भागावर ड्रोन आणि मिसाईलचे केविलवाणे हल्ले केले होते. या केविलवाण्या हल्ल्यांना भारतीय लष्कराने चोख प्रतिउतर देऊन त्यांच्या ड्रोन मिसाईल आणि फायटर जेट विमाने जमीनदोस्त केली. भारतीय लष्कराच्या चोख प्रतिउत्तरामुळे पाकिस्तानला मोठी अद्दल घडवली. दरम्यान भारत आणि पाकिस्तान या दोन्ही देशात सध्या युद्धजन्य परिस्थिती निर्माण झाली आहे. या पार्श्वभूमीवर देशामध्ये सर्वत्र सतर्कता बाळगण्याचे आदेश गृह विभागाकडून जारी करण्यात आले आहेत. त्यामुळे साहजिकच येथील विठ्ठल मंदिरात देखील कडेकोट बंदोबस्त ठेवण्यात आलेला आहे. मंदिरात येणाऱ्या प्रत्येक भाविकांची कसून तपासणी होत आहे. या शिवाय मंदिराकडे येणाऱ्या वाहनांची देखील चौकशी पोलीस विभागामार्फत सुरू आहे. मंदिर परिसरातील सर्व संशयास्पद गोष्टींची तपासणी, भाविकांकडील बॅगांची तसेच पर्स तपासणी पोलीस विभागामार्फत सुरू करण्यात आली आहे. एकंदर विठ्ठल मंदिर सुरक्षेच्या दृष्टीने पोलिसांचा वाढता पहारा पंढरपुरात दिसून येत आहे.



## मुंबई-हैदराबाद एक्स्प्रेसवर दगडफेक



सोलापूर : मुंबई-हैदराबाद एक्स्प्रेस या रेल्वेवर केम-जेऊर दरम्यान भाळवणीजवळ शुक्रवारी रात्री अज्ञातांकडून प्रवाशांवर दगडफेक करण्यात आली. या दगडफेकीत दोन प्रवासी जखमी झाल्याचे वृत्त असून त्यांच्यावर कुर्डूवाडी येथे प्रथमोपचार करण्यात आले.

## महत्त्वाचे...

### प्रभात कुमार व प्रशांत बुरडे बनले डीजी! ४ पोलीस अप्पर महासंचालकाच्याही बदल्या

**तभा वृत्तसेवा । जमीर काझी**
**मुंबई, दि. ९ मे -**

महाराष्ट्र पोलीस दलात अधिकाऱ्यांचे प्रलंबित बढती व बदल्यांचे वारे वाहू लागले आहे.जेष्ठ आयपीएस अधिकारी प्रभात कुमार व प्रशांत बुरडे यांना महासंचालक (डीजी) पदावर शुक्रवारी पदोन्नती देण्यात आली.तर अन्य ४ अप्पर महासंचालक दर्जाच्या अधिकाऱ्यांच्या बदल्या करण्यात आल्या. प्रभात कुमार यांना सध्या कार्यरत असलेल्या नागरी हक्क संरक्षण विभागाच्या संचालक पदावर तर बुरडे यांना लोहमार्ग विभागाचे प्रमुख पद पदोन्नत करून बढती देण्यात आली. खात्यामध्ये वरील दोन्ही पदे ही 'साईड ब्रँच' समजली जातात. गृह विभागाच्या वतीने पदोन्नतीचे आदेशाबरोबरच एडीजी दर्जाच्या आणि चार अधिकाऱ्यांच्याही बदल्यांचे आदेश जारी करण्यात आले. त्यामध्ये पोलीस मुख्यालयातील नियोजन व समन्वय विभागाचे सुनील रामानंद यांची राज्य गुन्हा अन्वेषण शाखेत (सीआयडी) बदली करण्यात आली आहे. तर पोलीस प्रशिक्षण व खास पथकाचे प्रमुख राजकुमार व्हटकर यांची राज्य राखीव दलात (एसआरपी) हलवण्यात आले. त्यांच्या जागी प्रशासन विभागाचे के एम प्रसन्ना यांची बदली केली आहे तर रेल्वेचे अप्पर महासंचालक प्रवीण साळुंखे यांची महामार्ग सुरक्षा विभागात बदली करण्यात आली आहे.


प्रभात कुमार


प्रशांत बुरडे

**'त्या' पोस्टिंगवरील बदल्यांना कधी मुहूर्त?**

राज्यातील अनेक महत्त्वाचे ठिकाणच्या आयुक्त, सहआयुक्त, आयजी, उपायुक्त आणि जिल्हा पोलीस अधीक्षक दर्जाच्या यंदा मोठ्या प्रमाणात बदल्या होणार आहेत. त्याला कधी 'मुहूर्त' मिळतो? याकडे सर्वांचे लक्ष लागून राहिले आहे. मोक्याच्या ठिकाणी बदली मिळावी, यासाठी काही आयपीएस अधिकाऱ्यांकडून आपापल्या पद्धतीने 'फिल्डिंग' लावली जात आहे.

### लोकसेवा आयोग परीक्षेत सोलापूरची वैष्णवी गायकवाड राज्यात प्रथम



**सोलापूर, दि. ९ मे-**

महाराष्ट्र राज्य लोकसेवा आयोगाच्या वतीने घेण्यात आलेल्या अभियांत्रिकी सेवा परीक्षा २०२३ चा निकाल आज जाहीर झाला. महाराष्ट्र स्थापत्य अभियांत्रिकी सेवा परीक्षेत सोलापूरची कन्या वैष्णवी राम गायकवाड ही मुलीत राज्यात प्रथम आली आहे. मराठा सेवा संघाचे राम गायकवाड यांची वैष्णवी कन्या आहे. या यशाबद्दल तिचे सर्वत्र कौतुक होत आहे.

### मुंबईतील नालेसफाईच्या कामात मोठा गोलमाल!

**तभा वृत्तसेवा । विशेष प्रतिनिधी**
**मुंबई दि. ९ मे-**

देशाची आर्थिक राजधानी असलेल्या मुंबईतील नालेसफाईचे काम दरवर्षीप्रमाणे यंदाही वादाच्या भोवऱ्यात सापडले आहे. नालेसफाईच्या कामात जवळपास ४० टक्के गोलमाल करण्यात आला असल्याचे कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय)च्या झाले आहे दस्तूर खुद्द राज्य सरकारमधील माहिती व तंत्रज्ञान मंत्री आणि मुंबई उपनगराचे पालकमंत्री आशिष शेलार यांनी केला आहे. नालेसफाईच्या कामाचे पाहणी केल्यानंतर क्षेपणाभूमीवर टाकण्यात येणाऱ्या गाळाचे एआय ने केलेल्या विश्लेषणात तब्बल ४०% फेरफार झाल्याचे उघड झाले असून ही धक्कादायक माहिती आज उपनगर पालकमंत्री शेलार यांनी घेतलेल्या आढाव्यात उघड झाली. त्यामुळे याबाबत तातडीने पालिका आयुक्तांनी डेटा ॲनालिसीस करा आणि कंत्राटदाराकडून १०० टक्के अपेक्षित काम करुन घ्या, आयुक्तांनी रस्त्यावर उतरून पहाणी करा, असे निर्देश दिले. उपनगर पालकमंत्री ॲड आशिष शेलार यांनी कालपासून मुंबई उपनगरातील नालेसफाईच्या कामाची पाहणी करण्यास सुरुवात केली आहे. आज सकाळी घाटकोपर बस डेपो शेजारी असणाऱ्या लक्ष्मी नगर नाल्यापासून पाहणी दौऱ्याला सुरुवात केली. त्यानंतर त्यांनी ए.पी. आय नाला, उषा नगर नाला, माहुल नाला, माहुल खाडी परिसर आणि खारु खाडी येथील कामाची पाहणी केली. या वेळी आमदार मिहिर कोटेचा, माजी गटनेते भालचंद्र शिरसाट, प्रभाकर शिंदे, विरोधी पक्षनेते रवीराजा, भाजपाचे पदाधिकारी विनायक कामत, माजी नगरसेविका रितू तावडे, संबंधित विभागाचे अधिकारी आणि स्थानिक कार्यकर्ते उपस्थित होते. मुंबईतील नालेसफाईमध्ये निघणाऱ्या गाळाचे मापन हे तंत्रज्ञानाच्या मदतीने व्हावे अशी गेली अनेकवर्षे भाजपाचे नेते ॲड आशिष शेलार करीत होते आजही त्यांनी याबाबत अधिकाऱ्यांना विचारणा केली. तर यावर्षी महानगरपालिकेच्या माध्यमातून खच्या वापराने गाळ मोजणी आणि इतर कामांच्या मॅपींगला सुरुवात झाली असल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले. तसेच कशा पद्धतीने हे मॅपिंग केले जाते याची विचारणा केल्यानंतर अधिकाऱ्यांनी काही व्हिडीओ दाखवले. या बाबतीत अधिक माहिती घेतल्यानंतर असे निदर्शनास आले की, प्रत्येक ट्रिपमधून नालेसफाईचा जो गाळ जातो, तो गाळ ज्या ठिकाणी पडतो, याचे जे व्हिडिओ येतात त्याला खच्या माध्यमातून स्कॅन केले जाते.

**'एआय' कडून गाळात ४० टक्के फेरफार झाल्याची पोलखोल**

## पाहिजेत

सोलापूर, पश्चिम महाराष्ट्र आणि मराठवाड्यासह महाराष्ट्रातील लोकप्रिय **दैनिक सोलापूर तरुण भारत** साठी सोलापूर **शहरात कॅम्पेनिंग** करण्यासाठी दहावी, बारावी, पदवीपर्यंत शिक्षण झालेले २० युवक पाहिजेत. आकर्षक मानधन दिले जाईल. इच्छुकांनी ७ दिवसांत अर्जासह खालील पत्त्यावर कार्यालयात समक्ष भेटावे अथवा खालील क्रमांकावर संपर्क साधावा.

**संपर्क: ९८८११९१४४३**

**पत्ता- १९/२०, दैनिक तरुण भारत कार्यालय, होटगी रोड, सोलापूर.**

# सायबर गुन्हे टाळण्यासाठी परिणामकारक काम करणार

### मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे प्रतिपादन

**तभा वृत्तसेवा । विशेष प्रतिनिधी**
**मुंबई, दि. ९ मे -**

सायबर सुरक्षेसाठी देशातील अत्याधुनिक सुविधा महाराष्ट्रात आहेत. यामाध्यमातून सायबर गुन्हे, सायबर फसवणूक व मानवी तस्करीपासून लोकांना वाचविण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत.या पुढील काळातही अधिक परिणामकारपणे काम करणार असल्याचे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गुरुवारी केले.

महाराष्ट्र सायबरच्या आर्टिफिशियल इंटिलिजन्स बॉट व सायबर जागरुकता माहितीपट या नाविन्यपूर्ण नागरिक केंद्रीत उपक्रमांचे अनावरण सह्याद्री अतिथिगृहात त्यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी महाराष्ट्र सायबरचे अतिरिक्त पोलीस महासंचालक यशस्वी यादव, उपमहानिरीक्षक संजय शिंत्रे, अधीक्षक हेमराजसिंग राजपूत, अभिनेता शरद केळकर, अभिनेत्री अमिषा पटेल आदी यावेळी उपस्थित होते. यावेळी सायबर सुरक्षा विषयक माहितीपट दाखविण्यात आला. मराठी आणि हिंदी भाषेत असलेल्या या माहितीपटात अभिनेते शरद केळकर, अभिनेत्री अमिषा पटेल यांनी काम केले आहे. या माध्यमातून सायबर गुन्हेगारी, सायबर फसवणूक संबंधी जनजागृती करण्यात येणार आहे. तसेच महाराष्ट्र सायबरच्या कमांड अँड कंट्रोल सेंटरच्या कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित चॅट बॉटचे सादरीकरण करण्यात आले. हा चॅटबॉट महाराष्ट्र सायबरच्या १९४५ या हेल्पलाईनशी जोडले गेले आहे. या चॅटबॉटमध्ये सायबर गुन्हे, तक्रार कशी करावी, यासंबंधीची माहिती मिळणार आहे. मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले की, सायबर फसवणुकीसंबंधीचे कॉल्स मोठ्या प्रमाणात येत असतात. त्या सर्वांना उत्तर देणे आवश्यक आहे. त्यामुळे अशा कॉल्सना उत्तरे देणे व नागरिकांना माहिती मिळण्यासाठी चॅटबॉट व माहितीपट महत्त्वाचे ठरणार आहे. सायबर गुन्हे घडण्यापूर्वीच रोखण्यासाठी जनजागृती आवश्यक आहे. अशा कामात अभिनेते शरद केळकर व अभिनेत्री अमिषा पटेल यांच्यासारख्यांनी सहभाग घेतल्यामुळे नागरिकांपर्यंत चांगला संदेश जाईल. नोकरीच्या निमित्ताने परदेशात नेऊन विक्री करण्यासारख्या घटना रोखण्यासाठीही यापुढील काळात जनजागृती करावी. मानवी तस्करीमध्ये लोकांना वाईट पद्धतीने वागविले जाते. त्यामुळे यासारखे अमानुष प्रकार बंद करण्यासाठी जनजागृती उपक्रम महाराष्ट्र सायबरने हाती घ्यावा, अशी सूचनाही मुख्यमंत्री फडणवीस यांनी केली.

अमिषा पटेल म्हणाल्या की, डिजिटायझेशनच्या या युगात सायबर गुन्हेगारीच्या घटनांना आळा घालणे आवश्यक आहे. त्यासाठी लोकांमध्ये जागृती महत्त्वाची आहे. त्यामुळे महाराष्ट्र सायबरने घेतलेला जनजागृतीचा उपक्रम आजच्या काळात महत्त्वाचे आहे.

**मानवी तस्करीतून तरुणाची सुटका**

महाराष्ट्र सायबरने नुकतेच नोकरीच्या निमित्ताने म्यानमार व लाओस या देशांमध्ये गुलाम म्हणून विकल्या गेलेल्या ६४ जणांना सुखरूप सोडवून आणले आहे तसेच पाच एजंटनाही अटक केली. मानवी तस्करीतून सुटका झालेल्या एका तरुणाने यावेळी त्याच्यावर आलेल्या प्रसंगाची माहिती दिली व महाराष्ट्र सायबरने वेळीच केलेल्या कारवाईमुळे सुटका झाल्याचे समाधान व्यक्त केले. या मोहिमेची माहिती पोलीस अधीक्षक राजपूत यांनी दिली.

## लक्ष्मण गायकवाड यांना मसाप जीवनगौरव, डॉ. गीताली यांना कार्यकर्ता पुरस्कार जाहीर

**तभा वृत्तसेवा,**
**पुणे, दि. ९ मे-**

महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या वतीने देण्यात येणारा ज्येष्ठ भाषा अभ्यासक आणि लेखिका डॉ. अंजली सोमण पुरस्कृत मसाप जीवनगौरव पुरस्कार प्रसिद्ध लेखक 'उचल्या'कार लक्ष्मण गायकवाड यांना जाहीर झाला आहे. २५,०००/- रु. आणि सन्मानपत्र असे पुरस्काराचे स्वरूप आहे. मसापचा डॉ. भीमराव कुलकर्णी कार्यकर्ता पुरस्कार डॉ. गीताली वि. मं. यांना जाहीर झाला असून ११,०००/- रु. आणि सन्मानपत्र असे पुरस्काराचे स्वरूप आहे. हे पुरस्कार मसापच्या २७ मे रोजी होणाऱ्या १२० व्या वर्धापनदिन समारंभात परिषदेच्या माधवराव पटवर्धन सभागृहात मसापचे अध्यक्ष डॉ. रावसाहेब कसबे यांच्या हस्ते प्रदान करण्यात येणार आहेत. परिषदेच्या विश्वस्त मंडळाचे अध्यक्ष डॉ. शिवाजीराव कदम, कार्यकारी विश्वस्त डॉ. पी. डी. पाटील, विश्वस्त यशवंतराव गडाख, उपाध्यक्ष डॉ. तानाजीराव चोरगे, राजीव बर्वे आणि विद्याधर अनास्कर यावेळी उपस्थित राहणार आहेत. अशी माहिती महाराष्ट्र साहित्य परिषदेचे कार्याध्यक्ष प्रा. मिलिंद जोशी यांनी दिली.

प्रा. जोशी म्हणाले, ''उचल्या'' ह्या त्यांच्या आत्मकथनाने लक्ष्मण गायकवाड यांना वेगळी ओळख मिळवून दिली १९८८ सालचा साहित्य अकादमी पुरस्कार उचल्या या त्यांच्या आत्मकथनाला मिळाला. त्यांनी आजवर आपल्या लेखनातून परिघाबाहेरील उपेक्षितांच्या व्यथा वेदना मांडून त्यांचा आवाज बुलंद केला आहे. त्यांच्या या योगदानाबद्दल त्यांना मसाप जीवनगौरव पुरस्काराने सन्मानित करताना परिषदेला समाधान वाटत आहे. डॉ. गीताली वि. मं. यांनी स्त्री मुक्तिच्या चळवळीत मोलाचे योगदान आजवर दिले आहे. स्त्रीवादी चळवळीला ५० वर्ष पूर्ण होत असताना डॉ. गीताली वि. मं. यांच्या कार्याचा डॉ. भीमराव कुलकर्णी कार्यकर्ता पुरस्कार देऊन गौरव करताना परिषदेला आनंद होत आहे.





## महावितरणच्या संचालकपदी सचिन तालेवार रूजू

**मुंबई, दि. ९ मे-**

महावितरण कंपनीचे संचालक (प्रकल्प) म्हणून सचिन तालेवार यांनी बुधवारी (दि. ७) कार्यभार स्वीकारला. त्यांची या पदावर थेट भरती प्रक्रियेतून निवड झाली आहे. याआधी ते इंदूर येथील मध्यप्रदेश पश्चिम क्षेत्र विद्युत वितरण कंपनीचे संचालक (तांत्रिक) म्हणून कार्यरत होते. श्री. तालेवार गेल्या २८ वर्षांपासून महावितरणमध्ये विविध पदांवर कार्यरत आहेत.

श्री. तालेवार मूळचे नागपूर जिल्ह्याचे असून त्यांचे शालेय शिक्षण छिंदवाडा (मध्यप्रदेश) येथे झाले आहे. विद्युत अभियांत्रिकी पदवी संपादन केल्यानंतर श्री. तालेवार १९९७ मध्ये तत्कालिन महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळामध्ये कनिष्ठ अभियंता म्हणून चंद्रपूर येथे रूजू झाले. पदोन्नतीने सहायक अभियंता म्हणून कार्यरत असताना सन २००६ मध्ये सरळ सेवा भरतीद्वारे त्यांची कार्यकारी अभियंता म्हणून निवड झाली. या पदावर त्यांनी वर्धा, नागपूर व जालना येथे काम केले आहे. दरम्यान महावितरणकडून त्यांची गूडगाव येथील मॅनेजमेंट डेव्हलपमेंट इन्स्टिट्यूटमधील (एमडीआय) एनर्जी मॅनेजमेंटच्या पोस्ट ग्रॅज्यूएशन डिप्लोमा इन बिझीनेस मॅनेजमेंट (पीजीडीएम) अभ्यासक्रमासाठी निवड झाली होती. सन २००७-०८ मध्ये हा अभ्यासक्रम पूर्ण केला आहे. त्यानंतर सन २०१६ मध्ये झालेल्या सरळसेवा भरतीमध्ये सचिन तालेवार यांची अधीक्षक अभियंता म्हणून निवड झाली. या पदावर लातूर येथे काम केले. तर सन २०१८ मध्ये सरळसेवा भरतीद्वारे त्यांची मुख्य अभियंता म्हणून निवड झाली. पुणे परिमंडलाचे मुख्य अभियंता म्हणून त्यांनी जून २०१८ ते डिसेंबर २०२२ पर्यंत काम केले. बदलीद्वारे छत्रपती संभाजीनगर परिमंडलाचे मुख्य अभियंता म्हणून कार्यरत असताना मे २०२३ मध्ये श्री. तालेवार यांची इंदूर येथील मध्यप्रदेश पश्चिम क्षेत्र विद्युत वितरण कंपनीचे संचालक (तांत्रिक) म्हणून निवड झाली. या कंपनीत ते दोन वर्षांपासून कार्यरत होते. त्यानंतर महावितरणचे संचालक (प्रकल्प) म्हणून नुकत्याच झालेल्या थेट भरती प्रक्रियेत त्यांची निवड झाली आहे.

**सौर ऊर्जा प्रकल्पांच्या सर्व योजनांना गती देणार**



'महावितरणच्या ग्राहकांना आणखी दर्जेदार वीजपुरवठा करण्यासाठी सुधारित वितरण क्षेत्र योजनेसह (आरडीएसएस) विविध योजनांमधून पायाभूत वीजयंत्रणेच्या विस्तारीकरण व सक्षमीकरणाची कामे सुरू आहेत. या कामांसोबतच प्रामुख्याने सौर ऊर्जा प्रकल्पांच्या सर्व योजनांना आणखी गती देत कामे लवकर पूर्ण करण्यात येईल', असे श्री. तालेवार यांनी सांगितले.

## स्कूल बसमधून विद्यार्थ्यांच्या सुरक्षित प्रवासासाठी नियमावलीत सुधारणा आवश्यक

### परिवहन मंत्री प्रताप सरनाईक

**तभा वृत्तसेवा। विशेष प्रतिनिधी**
**मुंबई, दि. ९ मे-**

शालेय विद्यार्थ्यांच्या सुरक्षित प्रवासास परिवहन विभागाने सर्वोच्च प्राधान्य दिले आहे. स्कूल बसमधून शालेय विद्यार्थ्यांचा प्रवास अधिक सुरक्षित व सुखावह झाला पाहिजे, यासाठी नियमावलीत आवश्यक सुधारणा केल्या जातील, असे प्रतिपादन परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी गुरुवारी केले.

यशवंतराव चव्हाण सभागृह येथे स्कूल बस असोसिएशन व पालक असोसिएशन यांच्या प्रतिनिधींची बैठकीत ते बोलत होते. यावेळी परिवहन आयुक्त विवेक भीमनवार यांच्यासह परिवहन विभागाचे वरिष्ठ अधिकारी, असोसिएशनचे प्रतिनिधी उपस्थित होते.

मंत्री सरनाईक म्हणाले, स्कूल बसमधून विद्यार्थी वाहतूक करणाऱ्या वाहनचालकांनी नियमांचे काटेकोर पालन करावे. विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेशी कोणतीही तडजोड केली जाणार नाही. नियमावलीत सुधारणा करताना वाहनचालक आणि पालक संघटनांच्या भावना आणि अडचणींचाही विचार केला जाईल. नियमांचे पालन हे फक्त कायद्याच्या भीतीपोटी नव्हे, तर विद्यार्थ्यांच्या सुरक्षेच्या भावनेतून व्हावे.

स्कूल बस वाहतूक नियमावलीत सुधारणा करताना कोणावर अन्याय होणार नाही, असे सांगून सरनाईक म्हणाले, स्कूल बस वाहतूक क्षेत्राशी आपण अनेक वर्षे जोडलेलो आहे, त्यामुळे या क्षेत्रातील अडचणी ज्ञात आहेत. नियमाचे पालन न करणाऱ्यांना कोणतेही संरक्षण दिले जाणार नाही. २०११ च्या नियमावलीनुसार सध्या ४० हजार स्कूल बसेस राज्यभरात आपली सेवा देत आहेत. परंतु या व्यतिरिक्त ५० ते ६० हजार अनाधिकृत स्कूल बसेस विद्यार्थ्यांची धोकादायक पद्धतीने ने-आण करत असल्याच्या अनेक तक्रारी या बैठकीत स्कूल बस चालक-मालक संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी केल्या आहेत. पुढील ३ महिन्यांमध्ये या अधिकृत स्कूल बस चालक- मालकांनी संबंधित प्रादेशिक मोटर वाहन कार्यालयात दंडात्मक रक्कम भरून नियमावली नुसार आपली स्कूल बस अधिकृत करून घ्यावी. अन्यथा त्यांच्यावर कारवाई केली जाईल. तसेच ३ महिन्यानंतर ज्या प्रादेशिक परिवहन विभागांमध्ये अशा प्रकारच्या अनधिकृत स्कूल बसेस आढळतील त्या प्रादेशिक परिवहन कार्यालयाच्या अधिकाऱ्यांना देखील कठोर कारवाईला समोर जावे लागेल! असे मंत्री सरनाईक यांनी सांगितले. परिवहन आयुक्त भीमनवार म्हणाले, स्कूल बस धोरण करणारे महाराष्ट्र हे पहिले राज्य आहे.

या धोरणातील त्रुटी दूर केल्या जातील. आजच्या बैठकीत स्कूल बस असोसिएशन व पालक असोसिएशन यांनी मांडलेल्या सूचनांचा धोरणातील नियम सुधारणावेळी विचार केला जाईल.




## मालेगाव बॉम्बस्फोट खटल्याचा निकाल आता ३१ जुलैला

**मुंबई, दि. ९ मे-**

मालेगावमध्ये २००८ साली झालेल्या स्फोटाच्या खटल्याचा सत्र न्यायाल्याकडून आज देण्यात येणारा निकाल आता ३१ जुलै पर्यंत लांबणीवर टाकण्यात आला आहे. तब्बल १७ वर्षांपूर्वी घडलेल्या या घटनेबाबत १९ एप्रिल रोजी मुंबई सत्र न्यायालयातील विशेष एनआयए कोर्टाने निकाल राखून ठेवला होता. साध्वी प्रज्ञा, समीर कुलकर्णी, रमेश उपाध्याय, अजय राहिरकर, सुधाकर चतुर्वेदी, सुधाकर दिव्वेदी यांच्यावर आरोपपत्र दाखल झाले आहे. मालेगावातील एका धार्मिक स्थळाबाहेर २००८ मध्ये बॉम्बस्फोट झाला होता. या स्फोटात ६ जणांचा मृत्यू व १०१ जण जखमी झाले होते. या स्फोटाच्या खटल्याचा निकाल तब्बल १७ वर्षांनी गुरूवारी येणार होता. १ लाखापेक्षा जास्त पाने असल्याने अभ्यास करायला वेळ लागणार आहे. त्यामुळे या खटल्याचा निकालासाठी आता ३१ जुलैची पुढील तारीख देण्यात आली आहे.

**खटल्याची पार्श्वभूमी अशी**

मालेगाव शहरात २००८ साली झालेल्या बॉम्बस्फोटाच्या खटला एनआयए कोर्टाचे न्यायाधीश एल. के. लाहोटी यांच्यासमोर सुरु आहे. या खटल्यात सरकारी वकिलांनी ३२३ साक्षीदारांचे साक्षीपुरावे नोंदवले आहे. त्यापैकी ३४ साक्षीदार फितूर झाले आहेत. या खटल्यात साध्वी प्रज्ञा सिंह ठाकूर, लेफ्टनंट कर्नल प्रसाद पुरोहित, निवृत्त मेजर रमेश उपाध्याय, अजय राहिरकर, सुधाकर द्विवेदी उर्फ स्वामी अमृतानंद, सुधाकर चुतर्वेदी आणि समीर कुलकर्णी यांच्याविरोधात हत्येशी संबंधित दहशतवाद विरोधी कायदा आणि युएपीए अंतर्गत खटला चालला. या खटल्यात श्याम साहु, प्रवीण टकल्की, रामजी कालसंग्रा आणि संदीप डांगे हे आरोपी फरार घोषित करण्यात आले आहेत.

## पाणी पुरवठा व स्वच्छता कंत्राटी कर्मचाऱ्यांचा आकृतीबंध तयार करणार

### पाणीपुरवठा व स्वच्छतामंत्री गुलाबराव पाटील

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ९ मे-**

राज्यातील पाणी पुरवठा व स्वच्छता विभागातील कर्मचारी यांना न्यायालयाचे आदेशानुसार सेवेत कायम करणेची मागणी राज्याचे पाणी पुरवठा व स्वच्छता मंत्री गुलाबराव पाटील यांच्याकडे भेटून करण्यात आली. याबाबत मुंबई येथे विशेष बैठकीचे आयोजन करून कंत्राटी कर्मचारी यांचा आकृतीबंध तयार करण्यात येणार असल्याचे पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री गुलाबराव पाटील यांनी सांगितले.

सोलापूर येथील हॉटेल बालाजी सरोवर येथे मंत्री गुलाबराव पाटील आले असता राज्य कृती समितीचे कार्याध्यक्ष सचिन जाधव यांनी भेटून निवेदन देऊन विविध प्रश्न मांडले. या प्रसंगी उप मुख्य कार्यकारी अधिकारी अमोल जाधव, कार्यकारी अभियंता संजय धनशेट्टी, महाराष्ट्र जीवन प्राधीकरणचे कार्यकारी अभियंता प्रविण पाटील, उप अभियंता देशपांडे, संघटनेचे खजिनदार शंकर बंडगर, सचिन सोनवणे, महादेव शिंदे प्रमुख उपस्थित होते. कृती समितीचे अध्यक्ष रमाकांत गायकवाड, कार्याध्यक्ष सचिन जाधव, उपाध्यक्ष ऋषीकेश शिलवंत, उपाध्यक्ष बंडू हिरवे यांच्या वतीने निवेदन दिले .

गेल्या १० ते २० वर्षापर्यंत कार्यरत कंत्राटी कर्मचारी असून त्यांच्या अनुभवाचा व कामकाजाचा उपयोग पाणी पुरवठा स्वच्छता विभागाला झाले आहे.सदर कर्मचारी यांना कायमस्वरूपी सेवेत समाविष्ठ करण्या बाबत उच्च न्यायालय यांनी आदेश दिले आहेत. सर्व कर्मचारी यांना कायमस्वरूपी सेवेत समाविष्ट करून घेण्यात यावे, तसेच सर्व कर्मचारी यांचे मानधन समान काम समान काम वेतनानुसार वाढविण्यात यावे . कर्मचारी यांना शासन सेवेत कायम करण्यासाठी आपले स्तरावरून योग्य ती कार्यवाही व्हावी, अशी मागणी मंत्री गुलाबराव पाटील यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे .




**कायम करण्यासाठी आकृतीबंध हा पहिला टप्पा**

पाणी पुरवठा व स्वच्छता विभागातील कर्मचारी यांना न्यायालयाचे आदेशानुसार सेवेत कायम करण्यासाठी पहिल्या टप्प्यात कंत्राटी कर्मचारी यांचा आकृतीबंध तयार करणार असून याबाबत दोन बैठका घेण्यात आले आहेत. बीआरसी व सीआरसी यांचा पगार वाढ केला आहे. त्याच धर्तीवर जिल्हा स्तरावर कार्यरत कर्मचारी यांचा देखील पगारवाढ करणे बाबत बैठक घेण्यात आली आहे. पाणी पुरवठा व स्वच्छता विभागातील कर्मचारी यांचे प्रश्न मार्गी लावणार असल्याचे मंत्री गुलाबराव पाटील यांनी सांगितले.

**कंत्राटी कर्मचारी यांना कायम करा : कार्याध्यक्ष सचिन जाधव**

राज्यात जल जीवन मिशन व स्वच्छ भारत मिशन ग्रामीण अंतर्गत कंत्राटी कर्मचारी गेल्या २० वर्षापासून कायम आहेत. छत्रपती संभाजीनगरच्या मॅट न्यायालयाने कायम करण्याचा निर्णय दिला आहे. शासनाने अंमबलबजावणी करावी. आकृतीबंध तयार करावा. पद अस्तित्वात असेपर्यंत कर्मचारी यांना कायम करावे. पगार वाढ करावी, अशी मागणी कार्याध्यक्ष सचिन जाधव यांनी केली आहे.



वर्तमान परिस्थितीत पाकिस्तानने आक्रमक धोरण न अवलंबता उपलब्ध सर्वच राजनयिक पर्यायांचा विचार केला पाहिजे. तरच या दोन्ही अण्वस्त्र सज्ज देशांमधील तणाव कमी करता येऊ शकेल आणि क्षेत्रात शांती बहाल होऊ शकेल.
**नवाज शरीफ**, पाकिस्तानचे माजी पंतप्रधान


# तरुण भारत

न मे कर्मफले स्पृहा

सोलापूर, शनिवार दि. १० मे २०२५




हा नवा भारत आहे आणि शत्रूच्या घरात घुसून त्याला नेस्तनाबूत करतो हे भारतीय सेनादल आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात भारताने केलेल्या जबरदस्त प्रतिकारामुळे सिद्ध झाले आहे.
**डॉ. मेधा कुलकर्णी**, राज्यसभा खासदार



# भारत-पाक तणावाशी आमचा संबंध नाही

## अमेरिका युद्धापासून दूर राहणार : अमेरिकेचे उपाध्यक्ष व्हान्स

**न्यूयॉर्क, ९ मे**

भारत आणि पाकिस्तानमधील वाढत्या तणावादरम्यान अमेरिका युद्धापासून दूर राहणार असून आम्ही अशा युद्धात सहभागी होणार नाही . मूलभूतपणे हे आमचे काम नाही. अमेरिका भारत व पाकिस्तानवर नियंत्रण ठेवू शकत नसली तरी, दोन अण्वस्त्रधारी शेजारी देशांना तणाव कमी करण्यास प्रोत्साहित करू शकते, असे उपराष्ट्रपती जे. डी. व्हान्स यांनी फॉक्स न्यूजला दिलेल्या मुलाखतीत म्हटले.



दोन अण्वस्त्रधारी देशांमधील संघर्षाबद्दल आम्हाला चिंता आहे, असे ट्रम्प आधीच म्हणाले होते, असे व्हान्स यानी सांगितले. व्हान्स यांनी अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प व परराष्ट्र मंत्री मार्को रुबियो यांच्या मतांशी सहमती दर्शविली.

अमेरिका तणाव लवकरात लवकर कमी करू इच्छितो. आम्ही या देशांवर नियंत्रण ठेवू शकत नाही. मूलभूतपणे, भारताचे पाकिस्तानशी काही संबंध आहेत. पाकिस्तानने भारताला प्रत्युत्तर दिले आहे. आपण जे करू शकतो ते म्हणजे या लोकांना तणाव कमी करण्यासाठी प्रोत्साहित करण्याचा प्रयत्न करणे. परंतु आपण अशा युद्धात अडकणार नाही जे मुळात आमचे काम नाही आणि अमेरिकेचा त्यावर नियंत्रण ठेवण्याच्या क्षमतेशी त्याचा काहीही संबंध नाही, असे उपराष्ट्रपती जे. डी. व्हान्स म्हणाले. अमेरिका भारतीयांना तसेच पाकिस्तानींना शस्त्रे खाली ठेवण्यास सांगू शकत नाही. म्हणून आम्ही राजनैतिक मार्गांनी या गोष्टी पाठपुरावा करत राहणार आहोत. हे एका व्यापक प्रादेशिक युद्धात किंवा देव करो, अणुयुद्धात रूपांतरित होणार नाही अशी आमची अपेक्षा आहे, परंतु निश्चितच आम्हाला या गाष्टींबद्दलची काळजी आहे, असेही व्हान्स म्हणाले. व्हान्स पहिल्या अधिकृत भारत दौऱ्यावर असताना २२ एप्रिल रोजी जम्मू आणि काश्मीरमधील पहलगाममध्ये दहशतवाद्यांनी २६ लोकांची हत्या केली. (वृत्तसंस्था)




# युद्धसदृश स्थितीमुळे अधिकाऱ्यांच्या सुट्ट्या रद्द

**मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांचा आदेश**

## राज्यातील सुरक्षा आणि सज्जतेचा आढावा

**मुंबई, ९ मे**

भारत-पाकिस्तान युध्दसदृष्यस्थितीच्या पृष्ठभूमीवर राज्यातील महत्वाच्या पदांवर विशेषतः आरोग्य, आपत्ती व्यवस्थापन इत्यादी विभागांतील सर्व वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या सुट्ट्या रद्द करण्यात आल्या आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी याबाबतचे आदेश दिले. तर, प्रत्येक जिल्हाधिकारी कार्यालयांना आपत्कालीन फंड आजच देणार, ज्यातून काही तातडीच्या साहित्याची खरेदी करायची असतील तर ती तत्काळ करण्याच्या सुचनाही त्यांनी दिल्या.

भारत आणि पाकिस्तानातील तणावाच्या पृष्ठभूमीवर महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शुक्रवारी पोलिस आणि प्रशासकीय यंत्रणेकडून राज्यातील एकूणच सुरक्षा व्यवस्था आणि सज्जतेचा आढावा घेतला. त्यानंतर मुख्यमंत्र्यांनी प्रशासनाला सदर आदेश दिले. यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे उपस्थित होते.




सुरक्षा व्यवस्थेबाबतची राज्यातली स्थिती जाणून घेण्याकरता आयोजित या आढावा बैठकीला प्रभारी मुख्य सचिव राजेशकुमार, राज्याच्या पोलिस महासंचालक रश्मी शुक्ला, मुंबई पोलिस आयुक्त देवेन भारती, मुंबई महापालिका आयुक्त भूषण गगराणी, नागरी सुरक्षाचे अतिरिक्त पोलिस महासंचालक प्रभातकुमार, गृहविभागाच्या प्रधान सचिव राधिका रस्तोगी, गुप्तवार्ता विभागाचे अतिरिक्त पोलिस महानिरीक्षक शिरीष जैन, मुंबई आणि मुंबई उपनगर जिल्हाधिकारी उपस्थित होते.

बैठकीत मुख्यमंत्र्यांनी प्रत्येक जिल्ह्यात मॉकड्रिल करा आणि जिल्हा स्तरावर वॉर रुम स्थापित करा, ब्लॅक आऊटवेळी हॉस्पिटलसोबत समन्वय यंत्रणा उभी करा, टार्गेट होऊ नये म्हणून लाईट बंद केले जातात, त्यामुळे पर्यायी विद्युत व्यवस्थेद्वारे यंत्रणा सुरू ठेवून, गडद रंगाचे पडदे अथवा गडद रंगाच्या काचा वापरून त्याचवेळी बाहेरून लाईट दिसणार नाही, अशी व्यवस्था करा. ब्लॅकआऊट म्हणजे काय आणि अशावेळी काय करावे, यांचे व्हिडिओ विद्यार्थी, नागरिकांपर्यंत पोहोचवा. व्यापक जनजागरण करा, केंद्र सरकारच्या 'युनियन वॉर बुक' चे सखोल अध्ययन करीत सर्वांना त्याची माहिती द्या, प्रत्येक जिल्ह्यात पोलिसांच्या सायबर सेलने समाजमाध्यमांवर देखरेख ठेवत पाकिस्तानला मदत करणारे हॅण्डल ओळखून त्यावर कारवाई करा. शत्रूला मदत करणारी अथवा चुकीची माहिती कुणी प्रसारित करीत असेल तर त्यावर कारवाई करा, असे निर्देश दिलेत. (तभा वृत्तसेवा)

# मोदींचे नाव घेण्याची तुमची हिंमत नाही

## पाकिस्तानच्या खासदारांचा पंतप्रधान शरीफ यांच्यावर हल्लाबोल



**नवी दिल्ली, ९ मे**

भारतीय लष्कराने पाकिस्तानवर जबरदस्त क्षेपणास्त्र तसेच हवाई हल्ले करीत त्या देशातील नागरिकांची पळता भुई थोडी केली आहे. एकीकडे भारतीय सेनादल पाकिस्तानी सैन्याची दाणादाण उडवत असताना दुसरीकडे खुद्द पाकिस्तानच्या खासदारांनी स्वत:च्याच देशाचे पंतप्रधान शाहबाज शरीफ यांच्यावर हल्लाबोल केला आहे.


भारताने केलेल्या जोरदार हल्ल्यात पाकिस्तानचे पंतप्रधान शाहबाज शरीफ यांच्या घरापासून केवळ २० किलोमीटर अंतरावर मोठा स्फोट झाला. त्यानंतर तातडीने पाकिस्तानच्या पंतप्रधानांना बंकरमध्ये हलवण्यात आले. लोकांना धीर आणि दिलासा देण्याऐवजी आपले पंतप्रधान बंकरमध्ये लपून बसल्याचे कळताच पाकिस्तानचे खासदार संतप्त झाले. त्यांनी पाकी संसदेतून पंतप्रधान शाहबाज शरीफ यांच्यावर शाब्दिक हल्लाबोल केला. भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदींचे नाव घ्यायलाही शरीफ यांची हिंमत होत नाही एवढे ते मोदींना घाबरतात, असा जबरदस्त हल्ला पाकिस्तान तेहरिक ए इन्साफ पक्षाचे खासदार शाहबाज अहमद यांनी पाकिस्तानी पंतप्रधानांवर चढवला. एकीकडे भारत आणि पाकिस्तान यांच्यात युद्ध सुरू असताना पंतप्रधान शाहबाज शरीफ यांच्या भूमिकेवर त्यांच्याच देशातील नेत्यांनी प्रश्न उपस्थित केला आहे. (वृत्तसंस्था)

### खासदार उल-रहमान यांचाही हल्लाबोल



पाकिस्तानमधील जमियत उलमा इस्लाम पक्षाचे अध्यक्ष आणि खासदार फजल उल-रहमान यांनी देखील संसदेत भाषण करताना पंतप्रधान शाहबाज शरीफ यांच्या सरकारविरुद्ध आपला संताप व्यक्त केला आहे. देश युद्धाच्या उंबरठ्यावर असून संसदेत कोणीही जबाबदार व्यक्ती आज संसदेत नाही, म्हणून मी देखील संसदेतून बाहेर पडत आहे, असे फलज उल रहमान यांनी म्हटले.

### शाहबाज शरीफ यांच्या बोलण्यात दम नव्हता



भारताने पाकिस्तानच्या हद्दीत घुसून नऊ दहशतवादी तळांवर हल्ले केल्यानंतर पाकिस्तानचे पंतप्रधान शाहबाज शरीफ यांनी देशाला संबोधित केले. भारताला या हल्ल्याची किंमत चुकवावी लागेल, असे शाहबाज शरीफ यांनी म्हटले होते. भारताच्या हल्ल्यात २६ नागरिक शहीद झाले, ज्यामध्ये लहान मुलांचाही सहभाग होता, असे शरीफ यांनी सांगितले. आम्ही पाकिस्तानी रक्ताच्या प्रत्येक थेंबाचा बदला घेऊ, असेह शरीफ यांनी म्हटले. मात्र, शरीफ यांच्या देहबोलीवरून पाकिस्तानी नागरिकांकडून प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहेत. कारण, पंतप्रधान शरीफ यांच्या आवाजात मुळीच दम नव्हता, आणि आत्मविश्वासही ढासळलेला दिसत होता.



भारताच्या पश्चिम सीमेवर पाकिस्तानसोबत उभा संघर्ष पेटला असताना भारतीय जवान पूर्वेकडील सीमेवर डोळ्यात तेल घालून पहारा देत आहेत

# पाकिस्तानने दहशतवादाला पाठिंबा देणे बंद करावे : मार्को रुबियो

**नवी दिल्ली, ९ मे**

अमेरिकेला भारत पाकिस्तान दरम्यानचा तणाव शक्य तितक्या लवकर कमी करायचा आहे. पाकिस्तानने दहशतवादी गटांना कोणताही पाठिंबा देणे बंद करण्यासाठी ठोस पावले उचलण्याचे आवाहन अमेरिकेचे परराष्ट्र सचिव मार्को रुबियो यांनी केले आहे.



परराष्ट्र सचिव रुबियो यांनी भारताचे परराष्ट्र मंत्री एस. जयशंकर आणि पाकिस्तानचे पंतप्रधान शेहबाज शरीफ यांच्याशी स्वतंत्रपणे चर्चा केली आणि तणाव त्वरित कमी करण्याच्या गरजेवर भर दिला. जयशंकर यांच्याशी झालेल्या त्यांच्या संभाषणात, रुबियो यांनी भारत आणि पाकिस्तान यांच्यातील थेट चर्चेला अमेरिकेचा पाठिंबा असल्याचे मत व्यक्त केले. रुबियो यांनी भारतपाकिस्तान संवाद सुधारण्यासाठी सतत प्रयत्नांना प्रोत्साहन दिले. त्यांनी पहलगाममधील दहशतवादी हल्ल्याबद्दल शोक व्यक्त केला आणि दहशतवादाविरुद्धच्या लढाईत भारतासोबत काम करण्याच्या अमेरिकेच्या वचनबद्धतेची पुष्टी केली. शरीफ यांच्याशी झालेल्या संभाषणात, रुबियो यांनी पाकिस्तानने दहशतवादी गटांना कोणताही पाठिंबा देणे बंद करण्यासाठी ठोस पावले उचलण्याचे आवाहन पुन्हा केले. रुबियो यांनी जयशंकर आणि शरीफ यांच्याशी झालेल्या संभाषणात तणाव कमी करण्याची गरज अधोरेखित केली आहे, असे परराष्ट्र विभागाचे प्रवक्ते टॅमी ब्रूस म्हणाल्या. ही लष्करी कारवाई आहे की युद्ध की हिंसाचार. हे सर्व थांबले पाहिजे. हा उपाय नाही कारण तो कधीही संपत नाही. हे पिढ्यानपिढ्या स्पष्टपणे सिद्ध झाले आहे असे परराष्ट्र सचिव व अमेरिकेच्या संदेशात म्हटले आहे. रुबियो यांनी दोन्ही देशांमध्ये मध्यस्थी करण्याचा प्रस्ताव दिला आहे का असे विचारले असता, ब्रूस म्हणाल्या की, आम्ही तपशीलांबद्दल बोलणार नाही. हे निश्चितच आमचे धोरण आहे. भारत आणि पाकिस्तानला जबाबदार तोडगा काढण्यासाठी अमेरिका सतत आग्रह करत आहे व दोन्ही देशांच्या सरकारांशी अनेक पातळ्यांवर संपर्कात आहे. हल्लेखोरांना जबाबदार धरले जावे अशी अमेरिकेची इच्छा आहे आणि त्यासाठीच्या कोणत्याही प्रयत्नांना अमेरिका पाठिंबा देत आहेत, असे ब्रूस म्हणाल्या. हा मुद्दा अनेक दशकांपासून आहे.

# लेहमधील सर्व शाळा ९, १० मे रोजी बंद

**लेह/जम्मू, ९ मे**

भारत आणि पाकिस्तानमधील सध्याच्या तणावाच्या पृष्ठभूमीवर लेह प्रशासनाने शुक्रवारी जिल्ह्यातील सर्व शाळा ९ आणि १० मे रोजी बंद राहतील अशी घोषणा केली आहे, असे अधिकाऱ्यांनी सांगितले.

भारत आणि पाकिस्तानमधील तणाव वाढल्याने दोन्ही देशांमधील तणाव वाढला असून गुरुवारी रात्री भारताने जम्मू, पठाणकोट, उधमपूर आणि इतर काही ठिकाणी क्षेपणास्त्रे आणि ड्रोनने लष्करी तळांवर हल्ला करण्याचा पाकिस्तानी सैन्याचा प्रयत्न निष्फळ ठरवला.

लेह जिल्ह्यातील सर्व सरकारी आणि खाजगी शाळा पुढील दोन दिवस बंद राहतील, असे लेहचे उपायुक्त संतोष सुखदेवा म्हणाले. सध्याची परिस्थिती लक्षात घेता हे पाऊल उचलण्यात आले आहे. सर्वांना सतर्क राहण्याचे आणि कोणत्याही आपत्कालीन परिस्थितीत ११२ वर संपर्क साधण्याचे आवाहन उपायुक्तांनी केले आहे. (वृत्तसंस्था)

# घाबरू नका, सरकार तुमच्या पाठिशी

## ● गोळीबारात जखमी नागरिकांना नायब राज्यपालांनी दिला धीर

**जम्मू, ९ मे**

भारताच्या ऑपरेशन सिंदूर आणि लाहोरमधील हवाई संरक्षण यंत्रणेच्या विध्वंसामुळे युद्धासाठी उतावीळ झालेला पाकिस्तान सूर्य मावळताच सीमावर्ती भागात सातत्याने गोळीबार करीत आहे. भारतीय सैनिकही त्याच क्षमतेने त्यांना प्रत्युत्तर देत आहे.

गुरुवारी रात्री पूंछ, जम्मू, सांबा, उरीसह अनेक भागात पाकच्या सैन्याने केलेल्या गोळीबारात दोन मुलांची मृत्यू आणि अनेक जण जखमी झाले. जम्मू-काशमीरचे नायब राज्यपाल मनोज सिन्हा यांनी शुक्रवारी रुग्णालयात जावून जखमींची भेट घेतली आणि त्यांना सरकार पाठीशी असल्याचा धीर दिला. पाकिस्तानी सैन्याने केलेल्या गोळीबाराने सीमावर्ती भागात झालेल्या नुकसानीची पाहणी आणि तेथील सुरक्षेचा आढावा घेण्यासाठी नायब राज्यपाल मनोज सिन्हा शुक्रवारी जम्मू येथे पोहोचले. त्यांनी गोळीबार झालेल्या ठिकाणी जावून पाहणी केली, तसेच या भागातील रिक्षेचा आढावा घेतला. त्यानंतर जम्मू येथील शासकीय रुग्णालयात गेले, जिथे त्यांनी जखमी नागरिकांची भेट घेऊन त्यांच्या प्रकृतीची चौकशी केली. यावेळी सिन्हा म्हणाले, सरकारचे नागरिकांच्या सुरक्षेला प्राधान्य आहे, सीमावर्ती भागातील नागरिकांना सुरक्षित ठिकाणी स्थानांतरित करण्यात आले. सरकार पूर्णपणे नागरिकांच्या पाठीशी आहे, सुरक्षा बल युद्धबंदीचे उल्लंघन करणाऱ्यांना चोख प्रत्युत्तर देत आहे.



# पाकिस्तानने पीडित असल्याचा कांगावा करू नये

## निकी हॅले यांचे पाकिस्तानला खडे बोल

**वॉशिंग्टन, ९ मे**



पहलगाममध्ये दहशतवाद्यांनी हल्ला करून निष्पाप नागरिकांचा बळी घेतला. त्यानंतर प्रत्युत्तर देण्याचा भारताला पूर्ण अधिकार आहे. पाकिस्तानने आता हल्ला पीडित आहोत वगैरे कार्ड खेळू नये, उगाच कांगावा करून जगाचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न करू नये अशा शब्दात अमेरिकेच्या नेत्या निकी हॅले यांनी पाकिस्तानला खडे बोल सुनावले.

निकी हॅले यांनी त्यांच्या समाज माध्यम खात्यावर लिहिलेल्या पोस्टमध्ये म्हटले की, दहशतवाद्यांनी हल्ला करून निष्पाप नागरिकांचा बळी घेतला. त्याला प्रत्युत्तर देण्याचा भारताला अधिकार आहे. पाकिस्तानने पीडित आहोत असा कांगावा करू नये. दहशतवादी कारवायांना तुम्ही पाठिंबा दिला म्हणून तुम्हाला कुणी माफ करणार नाही. भारताने जे केले ते योग्यच आहे, असे हॅले यांनी पाकिस्तानला सुनावले. (वृत्तसंस्था)

# भारताची हवाई कवच 'एअर डिफेन्स सिस्टिम'

## ड्रोन, क्षेपणास्त्रांना हवेतच नष्ट केल्याने टळली जीवित, मालमत्तेची हानी टळली



**नवी दिल्ली, ९ मे**

एअर डिफेन्स सिस्टीम म्हटले की आठवते ते इस्त्रायलची आयर्न डोम यंत्रणा. आजूबाजूला सर्व शत्रु देश ड्रोन आणि क्षेपणास्त्रांचा सतत मारा करीत असतानाही त्यांना हवेतल्या हवेत नष्ट करणारी यंत्रणा म्हणजे आयर्न डोम अर्थात पोलादी कवच. आठ तारखेच्या रात्री पाकिस्तानने भारताच्या पश्चिम सीमेवरील अनेक महत्वाच्या शहरांना लक्ष्य करीत शेकडो ड्रोन आणि क्षेपणास्त्रे सोडली. मात्र, भारताच्या एअर डिफेन्स यंत्रणेने ड्रोन आणि क्षेपणास्त्रे हवेतल्या हवेत नष्ट केल्याने मोठ्या प्रमाणात जीवित आणि वित्तहानी टळली.

भारताच्या जलद, समन्वित प्रतिसादाने त्याच्या हवाई संरक्षण परिसंस्थेचे सामर्थ्य सिद्ध केले आहे. जे मागील अकरा वर्षांत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली परिश्रमपूर्वक उभारण्यात आले. भारताच्या या कारवाईने पाकिस्तानच्या हवाई संरक्षण दलाचा पोळकपणाही उघडकीला आला. भारतीय हवाई दलाची इंटिग्रेटेड काउंटर-अनमॅन्ड एरियल सिस्टम ग्रिड, एस-४०० ट्रायम्फ सिस्टम्स, बराक-८ क्षेपणास्त्रे, आकाश जमिनीवरून हवेत मारा करणारी क्षेपणास्त्रे आणि डीआरडीओचे ड्रोन तंत्रज्ञान यांनी एकत्र येऊन एक हवाई ढाल तयार केली. जी पाकिस्तानच्या हल्ल्यांना टक्कर देऊन खंबीरपणे उभी राहिली.

भारत बचाव करून थांबला नाही. त्याने वेगाने आणि अचूकपणे प्रत्युत्तर दिले. ऑपरेशन सिंदूरमध्ये भारतीय सशस्त्र दलांनी पाकिस्तानी हद्दीत शिरून हल्ला केला. लाहोरमध्ये चीनने पुरवलेले एचक्यू -९ हवाई संरक्षण युनिट उद्ध्वस्त केले आणि प्रमुख रडार पायाभूत सुविधांचे नुकसान केले.

### सामरिक तयारीचे दशक

भारताने आपल्या सामरिक तयारीची पातळी केवळ एका रात्रीत गाठली नाही. २०१४ पासून मोदी सरकारने भारताच्या हवाई संरक्षण रचनेत सुधारणा केली आहे. महत्वाच्या घडामोडी पुढील प्रमाणे आहेत.

- भारतीय हवाई दलाने चीन-पाक सीमेवर तीन एस-४०० क्षेपणास्त्र युनिट्स सक्रिय केली.
- २०१८ मध्ये एस-४०० ट्रायम्फ स्क्वॉड्रनसाठी ३५,००० कोटींचा करार केला. यामधील तीन स्क्वॉड्रन आता चीन आणि पाकिस्तानच्या सीमेवर कार्यरत आहेत.
- इस्रायलबरोबर २०१७ मध्ये २.५ अब्ज डॉलर्सचा करार करण्यात आला. जमिनीवरून हवेत मारा करणारी बराक-८ ही मध्यम पल्ल्याची क्षेपणास्त्रे एमआर-सॅम तैनात करण्यात आली, ही क्षेपणास्त्रे आता भटिंडा सारख्या सीमावर्ती भागातील प्रदेशाचे संरक्षण करत आहेत.
- स्वदेशी आकाश क्षेपणास्त्र बॅटरीज आणि डीआरडीओद्वारा विकसित ड्रोन प्रतिरोधक प्रणाली.
- शत्रूचे यूएव्ही जॅम आणि अक्षम करण्यासाठी २०२४ मध्ये मॅन पोर्टेबल काउंटर ड्रोन सिस्टीम म्हणजे एमपीसीडीएस उभारण्यात आली.

(वृत्तसंस्था)

### हवाई क्षेत्र सुरक्षित

- **मोदी सरकारचा संरक्षणाबाबतचा दृष्टिकोन हा दिखाऊ नसून, एक लवचिक, बहुस्तरीय परिसंस्था निर्माण करण्याचा आहे.**
- **मोदींनी इस्रायलकडून ९.४ अब्ज एनआयएस क्षेपणास्त्र खरेदीला मंजुरी दिली.**
- **ऑपरेशन सिंदूरमध्ये दहशतवादी तळांना उद्धवस्त करण्यासाठी वापरण्यात आलेले दारूगोळा बंगळुरूत तयार करण्यात आला.**
- **ऑपरेशन सिंदूरमध्ये इस्रायली बनावटीचे हारोप ड्रोन तैनात**



### आधुनिक युद्धात भारतीय तंत्रज्ञानाचा उदय

ऑपरेशन सिंदूर मध्ये शत्रूच्या रडार यंत्रणेपासून लपून मारा करणाऱ्या २०२१ मध्ये मागवण्यात आलेले आणि भारतात उत्पादन झालेल्या आत्मघातकी ड्रोन ची कामगिरी सिद्ध झाली. या ड्रोनने एकाच वेळी विविध क्षेत्रांवर अचूक हल्ले करून पाकिस्तानच्या संरक्षण यंत्रणेला थक्क केले. याशिवाय, कराची आणि लाहोरमधील हवाई संरक्षण मालमत्तेला लक्ष्य आणि नष्ट करण्यासाठी इस्रायली बनावटीचे आणि आता ज्याची निर्मिती भारतात होते, असे हॅरॉप ड्रोन तैनात करण्यात आले होते. याने कराची आणि लाहोर मधील हवाई संरक्षणाच्या मालमत्तेचे लक्ष्य साधले. स्कॅल्प आणि हॅमर क्षेपणास्त्रांनी सुसज्ज राफेल लढाऊ विमानांच्या सामरिक तैनातीसह या संरक्षण सामुग्रीने आपले लक्ष्य अचूक भेदून आपले सामर्थ्य सिद्ध करण्याची भारताची क्षमता दाखवली.

# पाकिस्तानच्या गोळीबारात जुळ्या भावंडांचा मृत्यू

**जम्मू, ९ मे**

पाकिस्तानी सैन्याकडून सीमेवर गुरुवारी रात्री पुंछ भागात केलेल्या गोळीबारात २ निरागस बहीण आणि भाऊ यांचा जीव गेला. पाकिस्तानने नागरी वस्तीत केलेल्या तीन दिवसांत केलेल्या गोळीबारात १८ भारतीयांचा मृत्यू, तर ६0 पेक्षा अधिक जखमी झाल्याची माहिती स्थानीय प्रशासनाने दिली आहे.

पाकिस्तानच्या गोळीबारात मारले गेलेले ही भावंडे एकाचवेळी जन्माला आली. एकत्रच वाढली आणि आता दोघांनी एकत्रच या जगाचा निरोप घेतला. दोन्ही मुळे १२ वर्षांची होती. झोया आणि जैन असे या मृत भावंडांची नावे आहेत. या दोघांच्या मृत्यूमुळे कुटुंब उद्ध्वस्त झाले. मुलांना चांगले शिक्षण आणि आयुष्य मिळावे यासाठी ते आपले मूळ गाव कलानी चकथरूहून पुंछ शहरात आले. पण पाकच्या नापाक हेतूंमुळे त्यांच्या लाडक्या मुलांचा बळी गेला. दरम्यान भारतपाकिस्तान यांच्यातील संघर्ष पाहता जम्मू-काश्मीर प्रशासनाने सर्व सरकारी कर्मचाऱ्यांच्या आणि अधिकाऱ्यांच्या सुट्ट्या रद्द केल्या आहेत. जे आधीच रजेवर गेले आहेत त्यांना तसेच सर्व शासकीय रुग्णालयातील डॉक्टर, नर्सेस आणि अर्ध वैद्यकीय कर्मचाऱ्यांनाही तत्काळ कामावर हजर राहण्याचे आदेश दिलेत.

## अग्रलेख...

# निर्णायक धडा शिकवाच!

भारत आणि पाकिस्तान यांच्यात अखेर युद्धाला सुरुवात झाली आहे. या दोन देशांत ५४ वर्षांनंतर पहिल्यांदाच थेट युद्धाला तोंड फुटले आहे. याआधी १९७१ मध्ये भारत आणि पाकिस्तान यांच्यात युद्ध झाले होते. १९९९ मध्ये कारगिल युद्ध झाले होते, पण त्या युद्धाची व्याप्ती तेवढ्याच भागापुरती मर्यादित होती. त्या युद्धाच्या ज्वाळात त्यावेळी संपूर्ण पाकिस्तानातील जनता होरपळली नव्हती. यावेळी मात्र पाकिस्तानातील जनतेला आतापासून या युद्धाचे चटके बसू लागले आहेत. १९७१ च्या तसेच नंतर कारगिल युद्धात हाग्या मार खाल्ल्यानंतरही पाकिस्तानला शहाणपण येत नाही, याचे आश्चर्य वाटते. पाकिस्तानने आपल्या आततायीपणामुळे हे युद्ध ओढवून घेतले, भारतावर लादले, असे म्हटले तर ते चूक ठरू नये. त्याने आपली स्थिती 'आ बैल मुझे मार' अशी करून घेतली आहे. पाकपुरस्कृत दहशतवाद्यांनी पहलगाम येथे निर्दोष भारतीय पर्यटकांची हत्या केली. या घटनेनंतरही भारताने आपल्या मनावर दगड ठेवत जगाला संयमाचे दर्शन घडवले. मात्र या संयमाला भारताचा भेकडपणा समजण्याची चूक पाकिस्तानने केली. पहलगाम येथे पर्यटकांची हत्या दहशतवाद्यांनी केल्यामुळे भारताने पाकिस्तानातील दहशतवाद्यांच्या तळांवर हल्ला चढवला. यात अनेक अतिरेकी आणि त्यांचे पिलांटू मारले गेले. भारताने पाकिस्तानातील लष्करी तळांवर तसेच निवासी भागांना जाणीवपूर्वक लक्ष्य केले नाही, कारण भारताला पाकिस्तानविरुद्ध युद्ध करायचे नव्हते.

पहलगाम येथील दहशतवादी हल्ल्यात आपला सहभाग नसल्याचा दावा पाकिस्तान करत आहे. खरे म्हणजे ही त्याची पश्चातबुद्धी म्हणायला पाहिजे. पहलगाम येथील दहशतवादी हल्ल्यात आपला हात नसल्याच्या पाकिस्तानच्या दाव्यावर शेंबडे पोरही विश्वास ठेवणार नाही. दहशतवादी संघटना आणि पाकिस्तान या एकाच नाण्याच्या दोन बाजू म्हणायला पाहिजेत. भारताने आपली लष्करी कारवाई पाकिस्तानविरुद्ध केली नव्हती, तर पाकिस्तानातील दहशतवाद्यांविरुद्ध केली होती. त्यामुळे पाकिस्तानने भारताच्या सीमावर्ती भागात गोळीबार करण्याची गरज नव्हती. पाकिस्तान शांत राहिला असता तर दोन देशांतील युद्ध टळले असते. कारण भारत स्वतःहून पाकिस्तानवर हल्ला करणार नव्हता. आक्रमण करण्याची भारताची संस्कृती नसली तरी कोणी आक्रमण केले तर समोरच्याला सोडण्याचीही आपल्या देशाची संस्कृती नाही. गृहमंत्री अमित शाह यांनी भारताच्या या भूमिकेचा परिचय 'हम खूद होकर छेडेंगे नहीं, हमको छेडा तो छोडेंगे भी नहीं', या शब्दात करून दिला. भगवान श्रीकृष्ण हा भारताचा आदर्श वारसा आहे. सुरुवातीला कौरव आणि पांडव यांच्यात युद्ध होऊ नये म्हणून मध्यस्थी करणाऱ्या कृष्णाने नंतर पांडवांच्या बाजूने युद्धात भाग घेतला होता. एवढेच नाही तर युद्धभूमीवर आपलेच आप्तस्वकीय समोर पाहून गलितगात्र झालेल्या अर्जुनाला युद्ध करण्यासाठी गीताही सांगितली होती. युद्ध वा लढाई हा कोणत्याही समस्येवर पर्याय नसला तरी आवश्यक झाले तर ते करावेच लागते. युद्धाने कोणत्याही समस्येवर तोडगा निघू शकत नाही, हे सुभाषितवजा वाक्य ऐकायला चांगले वाटत असले तरी 'लातों के भूत बातों से नहीं मानते', ही सुद्धा वस्तुस्थिती आहे. पाकिस्तानला मुत्सद्देगिरीची भाषा समजत नाही तर बंदुकीच्या गोळीची भाषा समजते. पाकिस्तानी लष्कर आणि राज्यकर्त्यांनी आपल्या राजकीय स्वार्थासाठी पाकिस्तानातील जनतेला विनाशाच्या खाईत लोटले आहे.

अटलबिहारी वाजपेयींपासून नरेंद्र मोदींपर्यंत प्रत्येक पंतप्रधानाने पाकिस्तानसमोर मैत्रीचा हात केला, पण पाकिस्तानने भारताचा हा मैत्रीचा हात झिडकारून लावला. त्याची किंमत आता पाकिस्तानचे लष्कर आणि राज्यकर्त्यांसोबत सर्वसामान्य जनतेलाही चुकवावी लागत आहे. पाकिस्तानने भारताच्या सीमावर्ती भागातील निर्दोष लोकांवर केलेल्या गोळीबाराची मोठी किंमत पाकिस्तानला चुकवावी लागत आहे. भारताने पाकिस्तानवर जोरदार प्रतिहल्ला चढवला. आपले संरक्षण करण्याचा प्रत्येक देशाला हक्क असतो, तो त्याचा अधिकारही असतो. यासाठी त्याच्यावर जगातील कोणतीही महाशक्ती हरकत घेऊ शकत नाही. भारताने पाकिस्तानची राजधानी इस्लामाबाद, रावळपिंडी आणि लाहोरसह अन्य शहरांवर जोरदार हल्ला चढवला. यात पाकिस्तानच्या बाजूला अपरिमित हानी झाली. बाजवाड येथील लष्करी तळावरील हल्ल्याने तर पाकिस्तानाचे नाक कापले गेले. सर्वांत महत्त्वाचे पाकिस्तानात तसेच जगातही पाकिस्तानची नाचक्की झाली. जो देश आपल्या राजधानीचे रक्षण करू शकत नाही, त्याचे जगात हसे होणे स्वाभाविक आहे. पाकिस्तानने भारतातील सीमावर्ती भागातील जम्मू, श्रीनगर, पठाणकोट, जैसलमेर, बाडमेर, भूज, भटिंडा, जालंधर, चंदीगढ, लुधियाना, अमृतसर आणि कपूरथळा या शहरांवर एकाच वेळी हजारो ड्रोन तसेच क्षेपणास्त्रांचा हल्ला करण्याचा अयशस्वी प्रयत्न केला. भारताच्या एस ४०० आणि आकाश या क्षेपणास्त्रविरोधी यंत्रणांनी पाकिस्तानचा हा ड्रोन आणि क्षेपणास्त्र हल्ला निष्प्रभ केला. भारताच्या सुरक्षा यंत्रणांनी प्रत्युत्तरात पाकिस्तानवर असा काही जोरदार हल्ला चढवला की तेथील जनतेचे तर सोडा पण लष्करी अधिकाऱ्यांच्या तोंडचे पाणी पळाले, त्यांना शब्दश : मैदान सोडून पळावे लागले.

भारताच्या संयमाची परीक्षा घेण्याची घोडचूक पाकिस्तानने केली आणि त्याला त्याची जबर किंमत चुकवावी लागत आहे. भारताच्या लढाऊ विमानांनी पाकिस्तानच्या तळावर बॉम्बवर्षाव करत त्यांना भाजून काढले. भारताने पाकिस्तानची चार लढाऊ विमाने पाडली, भारतीय नौदलाच्या हल्ल्यात पाकिस्तानच्या कराची बंदराचे मोठे नुकसान झाले. खरं म्हणजे ही तर फक्त सुरुवात आहे, याचा शेवट कसा होणार ते लवकरच दिसणार आहे. भगवान कृष्णाने सांगितल्याप्रमाणे भारत नैतिक युद्ध लढत आहे. आजपर्यंत आपल्या देशाने स्वतःहून कधीही दुसऱ्या देशावर आक्रमण केले नाही, तर आपल्या देशाचे संरक्षण करण्यासाठी प्रत्युत्तरात कारवाई केली, हा इतिहास आहे. पाकिस्तानचा इतिहास याच्या नेमका उलट आहे. देशवासीयांचे तसेच देशाची एकता, अखंडता आणि सार्वभौमत्वासाठी युद्ध करण्यात काहीच गैर नसते. भारताने आता पाकिस्तानशी युद्ध सुरूच केले आहे, तर ते निर्णायक टप्प्यात पोहोचवूनच थांबले पाहिजे. स्वातंत्र्यप्राप्तीपासून भारताला भेडसावत असलेली पाकिस्तानची समस्या कायमस्वरूपी सोडवली पाहिजे. इस्रायलने हमासची जशी स्थिती केली, तशीच भारताने पाकिस्तानची करून टाकली पाहिजे. पाकिस्तानची वागणूक ही कुत्र्याच्या शेपटासारखी आहे. काहीही केले तरी अगदी नळीत घातले तरी कुत्र्याचे शेपूट वाकडेच असते. भारताने आतापर्यंत पाकिस्तानला खूप वेळा संधी दिली. देशातील जनतेचा दबाव असतानाही कठोर लष्करी कारवाई केली नाही. पण आताचे सरकार हे ५६ इंच छाती असलेल्या नरेंद्र मोदी यांचे आहे. याचे पाकिस्तानच्या लष्कराला तसेच राज्यकर्त्यांना भान राहिले नाही. पहलगाम येथे निष्पाप पर्यटकाची दहशतवाद्यांनी हत्या करून पाकिस्तानने आपल्या हाताने आपल्याच शवपेटीवर शेवटचा खिळा ठोकण्याची तयारी केली. भारताच्या आक्रमक हल्ल्यानंतर पाकिस्तानात गृहयुद्धाची स्थिती उद्भवली आहे. बलुच लिबरेशन आर्मीने पाकिस्तानी लष्कराच्या चौक्यांवर हल्ले चढवले आहेत. दुसरीकडे माजी पंतप्रधान इम्रान खानचे समर्थकही रस्त्यावर उतरले आहेत. इम्रान खानची सुटका करा, तरच आम्ही सरकारच्या बाजूने लढू असा इशारा त्यांनी दिला आहे. पाकिस्तानी राज्यकर्त्यांची स्थिती घर फिरले की घराचे वासे फिरतात तशी झाली आहे. पहलगाम येथील निर्दोष पर्यटकाची अतिरेक्यांच्या हातून हत्या करत पाकिस्तानने पहिली चूक केली. दुसरी चूक भारताच्या सीमावर्ती भागात गोळीबार करून आणि तेथील जनतेची हत्या करून केली आहे. पाकिस्तानच्या या गुन्ह्याला आता माफी नाही. पाकिस्तानने मधमाशाच्या पोळ्याला हात घातला आहे, त्यामुळे त्याला पळता भूई थोडी झाल्याशिवाय राहणार नाही. व्याप्त काश्मीरवर पाणी सोडून पाकिस्तानला आता भारतासमोर शरणागती पत्करण्याशिवाय पर्याय राहिला नाही.

---


## यंगिस्तान

# एक वोट की कीमत...

**जयेश शत्रुघ्न मेस्त्री**

"एक चुटकी सिंदूर की कीमत" पाकिस्तानला चुकवावी लागत आहे. आपल्या सैनिकांनी पहलगाममधील अतिरेकी हल्ल्याचा प्रतिशोध घेत पाकिस्तानमधील ९ दहशतवादी अड्डे नेस्तनाबूत केले. भारताने सामान्य जनता आणि पाक सैन्य यावर हल्ला चढवला नव्हता. मात्र डोकं गहाण ठेवलेल्या पाकिस्तानने सामान्य भारतीयांना लक्ष्य केले आणि भारताने प्रत्युत्तर म्हणून पाकिस्तानात दिवाळी साजरी करायला सुरुवात केली. आता युद्ध सुरू झाले आहे. पहलगाममध्ये जिहादी दहशतवाद्यांनी हिंदू पुरुषांना मारून आमच्या बहिणींचं कुंकू पुसलं. म्हणूनच या ऑपरेशनला सैन्याने 'ऑपरेशन सिंदूर' असं नाव दिलं. काही मूर्ख लोकांना हे नाव आवडलं नाही. पण अशा मूर्खांची आपल्या देशात कमी नाही. आज जे युद्ध सुरू आहे त्याचा अर्थ 'एक चुटकी सिंदूर की कीमत' असा आहे. पूर्वी पाकिस्तानने आपल्या आया-बहिणींचं कुंकू अनेकदा पुसलं होतं. मात्र तेव्हा आपली राजकीय इच्छाशक्ती अतिशय दुबळी होती. आपण आपलं मूळ तत्त्व विसरुन बसलो होतो. ज्या भगवद्गीतेला आपण आदर्श मानतो, त्याच पवित्र ग्रंथाचा आपल्याला विसर पडला होता. अर्जुनाला युद्धासाठी प्रवृत्त करणारा आपला देव आहे. वाटाघाटी, शांतीचे संदेश या सर्व गोष्टी कामी नाही आल्या तर शेवटी युद्ध करावं लागतं. 'युद्ध नको बुद्ध हवा' हे फेक नॅरेटिव्ह आहे. खरं पाहता, 'बुद्ध हवा असेल तर बुद्धाला नष्ट करू पाहणाऱ्यांशी युद्ध करावंच लागतं.' जवळजवळ आपल्या सर्वच देवी-देवतांच्या हातात शस्त्र आहे. ते शस्त्र आपल्या तत्कालीन नेत्यांनी काढून घेतलं होतं. आपल्याला भवानी तलवारीचा विसर पडला होता आणि या सर्व गोष्टी काँग्रेसी संस्कृतीने केल्या होत्या. मात्र आता काळ बदलला आहे. खुज्या वृत्तीचे राज्यकर्ते आता सत्तेवर बसलेले नाहीत. राष्ट्रभक्त संघटना राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या मुशीतून जन्माला आलेले देशभक्त नरेंद्र मोदी आता पंतप्रधान आहेत. त्यामुळे २०१४ पासून पाकिस्तानचे नापाक कारनामे थोडे मंदावले होते. सर्जिकल स्ट्राईक आणि एअर स्ट्राईकमुळे पाकला कळून चुकले होते की हे सरकार पूर्वीसारखे नाही. हे आपल्याकडे पुरावे मागत नाहीत तर थेट आत घुसून वार करणारे सरकार आहे.

कलम ३७० निष्प्रभ झाल्यानंतर पाकिस्तान बिथरला होता. पण त्याला मोठी कारवाई करता आली नव्हती. त्यानंतरही पाकचे अतिरेकी हल्ले सुरूच होते. मात्र पहलगाममधील हल्ल्याने कळस गाठला. या हल्ल्यानंतर मोदींनी सिंधू करार स्थगित केला, पाकिस्तानचे सोशल मीडिया हॅण्डल ब्लॉक केले म्हणून अनेक स्वयंघोषित पुरोगामी मंडळी मोदींवर



टीका करत होती. हल्ला कधी करणार म्हणून चिडवत होती. सकाळचा ९ वाजताचा भोंगाही बोंबलत होता. या लोकांना वाटतं की मोदी म्हणजे राहुल गांधी किंवा मनमोहनसिंह आहेत. नरेंद्र मोदी सरकारने व्यवस्थित नियोजन करून पाकविरुद्ध मोहीम उभारली आहे. एकीकडे युद्ध आणि दुसरीकडे पाकचा खरा चेहरा उघडा पाडणे अशा प्रकारची रणनीती मोदी सरकारने राबवली आहे. आज पाकिस्तानची अनेक शहरे उद्ध्वस्त होत आहेत. पाकिस्तानी जनता त्रस्त झाली आहे. तिथे गृहयुद्ध सुरू झाले आहे. बलुचिस्तान स्वतंत्र होण्याची मोहीम बळकट झाली आहे. अफगाणिस्तानची करडी नजर पाकवर आहे. चारही बाजूंनी पाकिस्तान घेरला गेला आहे. हे भारतीय सैन्याचं शौर्य आहेच. परंतु राजकीय इच्छाशक्ती नसेल तर काहीही होऊ शकत नाही. २६/११ च्या वेळी आपली काय अवस्था होती. पाक पुरस्कृत अतिरेक्यांनी मुंबईत हाहाकार माजवला, रक्ताचे पाट वाहिले परंतु आपले तत्कालीन पंतप्रधान मान खाली घालून उभे राहिले. त्यांनी प्रतिशोध घेतला नाही. प्रतिशोध घेण्याची कुवत त्यांच्याकडे नव्हती. आज मोदी सरकारने कुंकू पुसल्याचा प्रतिशोध घेतला. पीडितांच्या मनात प्रतिशोध घेतल्याचं समाधान आहे. भीमाने दुःशासनाची छाती फाडली आणि त्याच्या रक्ताने द्रौपदीच्या केसांना अभिषेक केला. नरेंद्र मोदी हे त्या महापराक्रमी भीमाचे वैचारिक वंशज आहेत. विचार करा, जर आज नरेंद्र मोदी हे पंतप्रधान नसते तर आपल्या शूरवीर सैन्याला शौर्य दाखवण्याची संधी मिळाली असती का? १९७१ च्या युद्धात भारतीय सैन्याने प्रचंड पराक्रम गाजवला. परंतु इंदिरा गांधींना भारताचा फायदा करून घेता आला नाही. आपण जिंकूनही आपल्या पदरात काहीच पडले नाही. उलट ज्या बांगलादेशला आपण स्वातंत्र्य मिळवून दिले, तोच आज आपल्याविरुद्ध जाऊ लागला आहे. म्हणूनच या देशावर अशा नेत्याचे राज्य असले पाहिजे ज्याच्या कुळात देशभक्ती आहे, ज्याच्या रंध्रात राष्ट्रप्रेम आहे आणि असा नेता आपल्याला लाभला आहे. आज हा दिवस पाहायला मिळतोय कारण आपण योग्य ठिकाणी मतदान केलं, वोट केलं.

आपलं सैन्य पाकिस्तानला योग्य तो धडा शिकवेल. परंतु भारतीय म्हणून, हिंदू म्हणून आपली जबाबदारी आणखी वाढली आहे. कारण मी मागच्या "भारतात असलेल्या पाकिस्तानचं काय करायचं?" या लेखात म्हटलं त्याप्रमाणे आपल्याला भारतात असलेल्या पाकिस्तानशी आणि त्यांच्या समर्थकांशी वैचारिक संघर्ष करावा लागणार आहे. यासाठी आपण तयार राहिलं पाहिजे. ही इको-सिस्टिम मोदींना व आपल्या सैन्याला बदनाम करण्याचा प्रयत्न करेल. जाप्रमाणे इस्रायलवर अस्त्र उभारले जाते, हाच प्रयोग आपल्या बाबतीतही घडू शकतो. पॅलीवूड हे नाव 'पॅलेस्टाईन' आणि 'हॉलीवूड'वरून घेण्यात आले आहे. ही एक चुकीची माहिती प्रदर्शित करणारी धूर्त मोहीम आहे जी इस्रायलशी झालेल्या संघर्षादरम्यान वापरली गेली. यामध्ये पॅलेस्टिनींवर झालेल्या खोट्या अत्याचाराचे व्हिडीओ व फोटो जगभरात सोशल मीडियाच्या रूपाने प्रदर्शित करण्यात आले. २००० मध्ये मुहम्मद अल-दुर्राह यांच्या हत्येनंतर हा शब्द प्रचलित झाला. हा शब्द इस्रायली लोकांनी वापरायला सुरुवात केली. थोडक्यात खोटी रडारड करून व्हिक्टिम कार्ड खेळणे म्हणजेच पॅलीवूड. गुजरात दंगलीमध्ये मोदींविरुद्ध अशीच नीती वापरली होती.

मोदींना राक्षस ठरवण्यासाठी सगळी डावी इको-सिस्टिम कामाला लागली होती. मात्र भारतीय जनतेने नरेंद्र मोदींनाच आपल्या हृदयाच्या सिंहासनावर बसवलं आणि आज आपण ताठ मानेने जगत आहोत. ही आहे एका व्होटची किंमत... आपण मतदान करताना योग्य बटण दाबलं म्हणून ३७० हटवलं गेलं, वक्फ सुधारणा कायदा लागू झाला, तिहेरी तलाक कायदा अस्तित्वात आला, एअर स्ट्राईक-सर्जिकल स्ट्राईक झालं, आपण मतदान करताना योग्य बटण दाबलं म्हणून ऑपरेशन सिंदूर यशस्वी झालं. 'एक चुटकी सिंदूर की कीमत' पाकिस्तानला चुकवावी लागली कारण आपल्याला 'एक वोट की कीमत' कळली आहे. एका व्होटचे मूल्य किती आहे पाहा. १५ लाख खात्यात जमा झाल्याची भावना वेळोवेळी जागृत होते. म्हणूनच यापुढे मतदान करताना ही 'कीमत' आपल्याला लक्षात ठेवायची आहे आणि आपण ज्यांना व्होट केलं त्यांच्या विरुद्ध फेक नॅरेटिव्ह चालवणाऱ्यांच्या विरुद्ध वैचारिक मोहीम उभी करून आपल्याला ही कीमत अदा करायची आहे.

भारतीय सैन्याला प्रचंड यश लाभो!

पाकिस्तानरुपी राक्षसाचा संहार होवो!

हर हर महादेव! जय भवानी, जय शिवाजी!

writerjayeshmestry@gmail.com

---

## वेध

**हेमंत सालोडकर**

# शिबिरांतून विकसित भारताचे संस्कार

सध्या शाळांच्या परीक्षा होऊन सुट्या लागल्या आहेत. काही शाळांचे निकालही लागले आहेत. अशात दरवर्षीप्रमाणे शाळांमध्ये आणि वस्त्या-वस्त्यांमध्ये लहान मुलांमध्ये संस्कार रुजावे यासाठी शिबिरांचे आयोजन मोठ्या प्रमाणात घेण्यात येत आहेत. प्रत्येक शहरातील वस्त्यांमध्ये घरोघरी फिरून सहा-सात वर्षांपर्यंतचे मुले-मुली आहेत का, याचा शोध घेऊन वस्तीतील मंदिरात किंवा कुणाच्या मोठ्या घरी संस्कार शिबिरे होत आहेत. येथे लहान मुलांना गाणी, गोष्टी, योग, चित्रकला, हस्तकला, पर्यावरण संरक्षण, स्वदेशी व आत्मनिर्भरता, सामाजिक जाणीव, नागरी कर्तव्य अशा अनेक विषयांचे शिक्षण दिले जाते. यातूनच विद्यार्थ्यांवर बालपणापासून संस्कार बिंबविले जातात. दरवर्षी होणाऱ्या संस्कार शिबिरांतून भविष्यातील जबाबदार नागरिकांची पिढी घडावी असा उद्देश असतो. लहान वयापासूनच मुलांवर चांगले संस्कार केले तर मुले दुसरीकडे कुठेही गेले तरी आपल्या वागणुकीतून इतरांवर आपली छाप सोडत असतात आणि आम्ही इतरांपेक्षा सरस असल्याचा ठसा उपस्थितांवर उमटतो. लहान मुले कोणतीही गोष्ट लवकर शिकतात. त्यामुळे त्यांच्यावर योग्य संस्कार केल्यास त्यांच्यात चांगले परिवर्तन घडू शकते आणि हीच पिढी पुढे १२-१३ वर्षांनंतर संस्कारशील तरुण-तरुणी म्हणून देशाचा नावलौकिक करू शकतात. सध्या लहान मुले मोबाईलच्या आहारी गेल्याची सर्वांचीच तक्रार असते. अगदी तीन वर्षांचा मुलगाही किती सराईतपणे मोबाईल हाताळतो, असे त्याचे पालकच कौतुकाने सांगतात. पण त्याच्या तल्लख बुद्धीचा उपयोग चांगल्या कामासाठी केला तर तोच मुलगा पुढे देशाच्या तंत्रज्ञानासाठी कामी येईल. असे अनेक विद्यार्थी घडले तर देश तंत्रज्ञानात जगात पुढे राहील. मोबाईलचा वापर वाईटापेक्षा चांगल्या कामासाठीही करता येतो, हे अशा विद्यार्थ्यांच्या उदाहरणांवरून दिसून येईल.

संस्कार म्हणजे चांगले आहे, त्याला अधिक चांगले करणे होय. घरचे सर्व लोक जेवायला बसण्यापूर्वी त्याची सर्व तयारी करण्याची जबाबदारी मुलाला दिली तर त्याला नीटनेटकेपणाची सवय लागेल. जेवण झाल्यानंतर अन्न उचलणे, जेवणाची जागा स्वच्छ करणे यातून स्वच्छतेचा संस्कार त्याच्यावर होईल. घर, घराशेजारील परिसर स्वच्छ ठेवण्याचा संस्कार लहान वयापासूनच मुलांच्या अंगवळणी पडतो. या सवयी तो इतरही ठिकाणी गेला तरी कायम राहतील आणि त्यातून त्याचे वेगळेपण नक्कीच दिसेल. संस्कार शिबिरातून गाणे, गोष्टी, योगसाधनेतून मुलांची स्मरणशक्ती वाढेल. स्मरणशक्ती वाढविण्यासाठी वेगळ्या शिकवण्या लावायची गरज पालकांना पडणार नाही. मोठ्यांबरोबर मुलगा बाजारात गेला तर त्याला चार-पाच भाज्यांची नावे लक्षात ठेवायला सांगून त्यातून त्याची स्मरणशक्ती वाढवता येईल. चित्रकला, हस्तकला यामधून हाताला चांगले वळण लागून आपले काम उत्कृष्टच झाले पाहिजे, हा संस्कारही त्यांच्या मनावर रुजेल. घरातील प्रत्येक वस्तू त्या त्या जागेवरच राहिली पाहिजे. म्हणजे दुसऱ्या कुणाला ती वस्तू हवी असल्यास पटकन सापडेल. यातून हातचे काम लगेच करण्याचा संस्कारही मुलांवर बिंबवता येईल. शिबिरांतून पर्यावरण रक्षणाची शिकवण देताना त्यांना मातीशी खेळण्याची संधी मिळाली तर यातून अनेक कृषितज्ज्ञ देशाला मिळतील. लहानपणी झाडाला पाणी, खते देणे यातून तो निसर्गाशी जोडला जाईल. पाण्याचे महत्त्वही त्याला लहानपणापासूनच समजेल. पुढच्या काही वर्षांनंतर मातीवर, शेतीवर अनेक प्रयोग करून प्रगतिशील शेतकरी म्हणून त्याचा नावलौकिक होईल. शेतात चांगले पीक घेतले तर देश अन्नधान्याने सुजलाम् सुफलाम् बनवतील. त्यामुळे आपल्याला इतर देशांतून अन्नधान्य आयात करण्याची गरज पडणार नाही. संस्कार शिबिरात भारतीय संस्कृतीसंबंधी शिकवण देण्यात आली तर विद्यार्थी पाश्चात्त्य संस्कृतीचे अंधानुकरण करणार नाही तसेच भारतीय पद्धतीने स्वतःचा, आई-वडिलांचा, भाऊ-बहिणीचा वाढदिवस कसा साजरा करतात, याचे प्रात्यक्षिक देण्यात यावे. संस्कार शिबिरात आपली मुले काय शिकतात, हे पाहण्यासाठी शेवटच्या दिवशी सर्व शिबिरार्थींना एकत्र बोलावून त्याचे प्रात्यक्षिक दाखवले तर पालकांचेही समाधान होते. अशा संस्कार शिबिरात वेगवेगळ्या जाती-धर्माची मुले एकत्र येत असल्याने त्यांच्यात सामाजिक बंधुभाव निर्माण होतो. म्हणजेच संस्कार शिबिरातून लहानपणापासूनच मुलांवर सामाजिक, कौटुंबिक प्रबोधन, पर्यावरण संरक्षण, स्वदेशीचे महत्त्व अर्थात् आत्मनिर्भरता आणि नागरी कर्तव्य रुजवले आणि अशीच शिबिरे सतत होत गेली तर भारत देश पुढील २०-२५ वर्षांत विकसित राष्ट्र म्हणून उदयास येईल आणि हेच संस्कार शिबिरांचे यश राहील.

९८५०७५३२८१

---

## मुंबई वार्तापत्र

# हतबल चाणक्य!

**नागेश दाचेवार**

महाराष्ट्राच्या राजकारणातील मातब्बर, भीष्माचार्य, जाणता राजा, चाणाक्ष नेते आणि चाणक्य अशा अनेक बिरुदावलीने ओळखले जाणारे शरद पवार हे आता काल-परवा म्हणजे, सहा महिन्यांअगोदर विधानसभा निवडणुकीच्या मैदानात बाह्या खोचून तयार होते; आणि सहाच महिन्यांत अचानक असं काय घडलं की, तेल लावलेला हा पहेलवान इतका हतबल झाला? महाराष्ट्राचा तथाकथित चाणक्य हा यावेळी इतका हतबल का झाला, असा प्रश्न आता सर्वत्र आश्चर्याने केला जात आहे.

तसे कुटिल कारस्थानं करण्याची, जिथे-तिथे काड्या करण्याची, मैदान सोडून पळण्याची ही चाणक्य साहेबांची जुनीच सवय आहे. पहिले काँग्रेस फोडून तत्कालीन मुख्यमंत्री वसंतदादा पाटलांचे सरकार पाडले आणि स्वतः मुख्यमंत्री झाले. त्यानंतर १९९९ मध्ये पुन्हा भाजपा-सेना युतीचं सरकार येऊ नये यासाठी ज्या काँग्रेसमधून बाहेर पडून शड्डू ठोकला होता, त्यांच्यासोबतच सरकार स्थापन केले. पुन्हा तसाच थोडा वेगळा दगाबाजीचा प्रयोग म्हणजे भाजपाचं सरकार येऊ नये आणि आपण सत्तेत आलो पाहिजे म्हणून शिवसेनेला फूस लावून तीन पक्ष मिळून सरकार स्थापन करण्यात आले. अशी कटकारस्थानं शरद पवार हे सातत्याने महाराष्ट्राच्या राजकारणात करीत आले आहेत. त्याचवेळी २०१४ साली याच पहेलवानाने माढाच्या मैदानातून पळदेखील काढला होता. यावेळी मात्र कोणतीही चाणक्य खेळी वगैरे नव्हती. माढातून पराभव होण्याची गुप्त माहिती अंतर्गत सर्व्हेतून मिळाल्याने या भीष्माचार्याने अब्रू वाचविण्यासाठी आता निवडणूक लढणार नाही म्हणत, तेथून काढता पाय घेतला होता. त्यावेळी शरद पवारांना वाऱ्याची दिशा कळते, असा खोचक टोला नरेंद्र मोदी यांनी लगावला होता.

पंतप्रधानांनी २०१४ मध्ये म्हटलेल्या वाक्याची पुनरावृत्ती करण्याची वेळ आता २०२५ मध्ये आली आहे. पवारांना आपलं आणि आपल्या मुलीचं पुढचं राजकीय भवितव्य धोक्यात दिसायला लागलं आहे की काय? त्यामुळेच अचानक पवार चिंतेत पडल्याचे दिसत आहेत. आत्ता कालपरवापर्यंत जे सख्खे काका आपल्या मुलीच्या आंधळ्या प्रेमासाठी पुतण्या अजित पवारांचा राजकीय बळी द्यायला निघाले होते, ते आता अचानक पुतण्यासमोर शरणागती पत्करताना दिसत आहेत.



एक दिवसअगोदर शरद पवारांनी दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेस एकत्र येण्यासंबंधी सुतोवाच केले. दोन्ही पक्षांतील नेते एकाच विचारधारेचे आहेत. आमच्यातील काहींना वाटते आपल्या क्षेत्रांत विकास कामे व्हावीत यासाठी सत्तेसोबत गेलं पाहिजे असं मत आहे तर काहींचा विरोध आहे. त्यामुळे एकत्र यायचे की नाही हा निर्णय पक्षातील नव्या पिढीने, सुप्रिया सुळेंनी घ्यायचा आहे या प्रक्रियेत मी नाही, असे वक्तव्य केले. आता अचानक पवारांना पुतण्या अजित पवार यांच्यासोबत जाण्याची उपरती कशी काय झाली, असा प्रश्न निर्माण झाला आहे. ज्या पुतण्याला पाडण्यासाठी, पुतण्याच्या बायकोला पाडण्यासाठी शर्थीचे प्रयत्न केले. पुतण्याचा पक्ष संपविण्यासाठी निवडणूक आयोगात आणि न्यायालयात याचिका दाखल केली. पुतण्याचे सदस्यत्व संपविण्यासाठी विधानसभाध्यक्षांकडे अपात्रतेचे पत्र देण्यात आले. आता पक्ष सोडून गेलेल्यांना कोणत्याही परिस्थितीत परत घेणार नाही, असे अप्रत्यक्षपणे अजित पवारांना उद्देशून राणाभीमदेवी घोषणा लोकसभा निवडणुकीवेळी दस्तुरखुद्द शरद पवारांनी केली होती. त्याच पुतण्यासोबत जाण्याची भाषा आता अचानक पवार बोलायला लागले, याचे आश्चर्य आहे. बरं, हे सगळं सांगत असताना या प्रक्रियेत मी नाही हे आवर्जून सांगणाऱ्या पवारांच्या शब्दाबाहेर मुलगी सुप्रिया कधीपासून गेली? म्हणजे मुलगी बापाला विचारणार नाही, ती परस्पर निर्णय घेईल, जो पक्ष वाचविण्यासाठी मुलीच्या स्वाधीन करण्यासाठी, मुलीला त्या पक्षाचं सर्वेसर्वा करण्यासाठी जंगजंग पछाडणारा बाप हे सगळं घडत असताना बसून गपगुमान उघड्या डोळ्याचा धृतराष्ट्र बनून बघत बसेल, ही बाब पचनी पडण्यासारखी आहे?

दोन्ही पक्ष एकत्रित येणे म्हणजे मूळ राष्ट्रवादीत दुसरा गट विलीन करणे. आता मूळ राष्ट्रवादी अजित पवारांकडे आहे. त्यामुळे सुप्रियाताईला त्यांचा शरद पवार गट राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये विलीन करून अजित पवारांच्या नेतृत्वात काम करावं लागेल आणि पक्षाचे सर्वेसर्वा हे अजित पवार असतील. त्यांचे निर्णय गपगुमान ताईंना आणि पर्यायाने ताईंच्या वडिलांना ऐकावे लागतील. बाकीच्यांची अर्थात रोहित पवार, जितेंद्र आव्हाडांच्या परिस्थितीची तर कल्पनाच करवल्या जात नाही. त्यामुळे महाराष्ट्राच्या चाणक्यावर, जाणता राजावर इतकी शरणागती पत्करण्याची, हतबल होण्याची, लाचारी पत्करण्याची वेळ का आली असावी, हा खरा प्रश्न आहे.

आपल्या पश्चात मुलीचे राजकीय भवितव्य सुरक्षित करण्याचा एका हतबल बापाचा हा प्रयत्न आहे की आपला दिल्लीतला बंगला सुरक्षित करण्याची पुढच्या वर्षीची ही तयारी आहे? कारण पुढच्या वर्षी २ एप्रिल २०२६ ला पवारांच्या राज्यसभा सदस्यत्वाचा कालावधी संपत आहे आणि पवारांसह आणखी केंद्रीय मंत्री रामदास आठवले, उबाठाच्या प्रियांका चतुर्वेदी, शरद पवार गटाच्या फौजिया खान, काँग्रेसच्या रजनी पाटील आणि भाजपाचे भागवत कराड, धैर्यशील पाटील या सहा जणांचा कालावधी संपणार आहे. त्यामुळे पुढल्या वर्षी सात जागांसाठी निवडणूक झाली तर राज्यसभेवर निवडून जाण्यासाठी एका सदस्याला विधानसभा सदस्यांची किमान ३७ मतं लागतील. आजघडीला मविआकडे केवळ एक सदस्य सहज निवडून येण्याइतके संख्याबळ आहे. मात्र, यात ठाकरेंचे सर्वाधिक २० सदस्य, त्यापाठोपाठ काँग्रेसचे १६ आहेत आणि राष्ट्रवादीचे केवळ १० विधानसभा सदस्य आहेत. त्यामुळे आता सर्वाधिक सदस्य असणारे लोक आपला दावा सोडणार नाही आणि मग ऐनवेळेवर आपली गोची होईल, याची भीती शरद पवारांना वाटतेय का? त्यामुळे शरद पवार हतबल होऊन शरणागती पत्करत असावेत का? कारणं काहीही असोत, पण पवारांनी केलेल्या वक्तव्यातून एका थकलेल्या बापाची व्यथा उद्धृत होत आहे.

९२७०३३३८८६

---

### आता 'नापाक' व्याप्त काश्मीर 'पाक' करूनच घ्या

कारगिल युद्धाच्या वेळी दर्शविलेली सहिष्णुता आता दाखवू नका. नापाक व्याप्त काश्मीर पाक (पवित्र) झाल्याशिवाय आता थांबू नका. दि. ६ मे २०२५ च्या मध्यरात्री 'ऑपरेशन सिंदूर' झाल्याची बातमी सकाळी दूरचित्रवाणीवर पाहिली आणि भारताच्या तिन्ही सैन्यदलांबद्दल, भारत सरकारबद्दल असलेला अभिमान द्विगुणित झाला. २२ एप्रिलला पहलगाम येथे घडवून आणलेल्या दुर्दैवी प्रसंगाच्या वेळी ज्यांचे हकनाक प्राण गेले त्यांच्याबद्दल वाईट वाटत होतेच. पण त्यानंतर एका मराठी म्हणीचीही आठवण होत होती, 'जे होतं ते चांगल्यासाठीच..'

दि. ६ मे च्या रात्री ते सिद्ध झालं. मात्र सामान्य नागरिक म्हणून एक विचार सतत भेडसावत आहे की, नेहमीप्रमाणे सहिष्णुता दाखवून आपण हिंदू आहोत हे सिद्ध करणार का? सामान्यतः मनुष्य लोकेषणा, वित्तेषणा, पुत्रेषणा यामध्ये अडकलेला असतो. सरकार चालवणारे मनुष्यच असतात. त्यामुळे लोकेषणा या अंतर्गत येणारी आंतरराष्ट्रीय एषणा, म्हणजे आंतरराष्ट्रीय दबाव, त्यांना वरील अपेक्षित कारवाई करण्यापासून प्रतिबंध करेल का, असा प्रश्न पडला. त्याचबरोबर आपण काय करू शकतो ? शारीरिक क्षमता नसल्यामुळे प्रत्यक्ष लढाईत सहभागी होऊ शकत नाही. धनाने सहभागी होण्याची सोय नाही. कारण त्यासाठी राष्ट्राचे आर्थिक धोरण ठरविताना भरपूर धनाची व्यवस्था केली जाते, असे वायुदलातील अधिकाऱ्याने सांगितल्यामुळे धनाने सहभागी होण्याचा मार्ग उपलब्ध नाही म्हणून मनाने सहभागी होणे, म्हणजे व्यक्त होणे एवढा एकच पर्याय शिल्लक राहतो. आता एकच मागणी आहे की, कारगिल युद्धाच्या वेळी दाखविलेली सहिष्णुता आता दाखवू नका. 'नापाक' व्याप्त काश्मीर 'पाक' (पवित्र) काश्मीर झाल्याशिवाय थांबू नका.

**वर्षा दामले**/९९२१५३२०३८

### युद्धजन्य परिस्थितीत राजकीय पक्षांची जबाबदारी

सध्या देशात निर्माण झालेल्या युद्धजन्य परिस्थितीच्या पृष्ठभूमीवर आपण सर्व भारतीयांनी एकजूट दाखवण्याची गरज आहे. अशा संवेदनशील वेळी राजकीय पक्षांनी जबाबदारीने आणि संयमाने वागणं अपेक्षित आहे. लोकशाहीमध्ये विरोधी मत व्यक्त करण्याचे स्वातंत्र्य आहे, पण जेव्हा देशाच्या सुरक्षेचा आणि जवानांच्या जीवनाचा प्रश्न निर्माण होतो, तेव्हा पक्षभेद विसरून राष्ट्रहितासाठी एकसंध भूमिका घेणं अत्यावश्यक ठरतं. माध्यमांमध्ये राजकीय पक्षांच्या काही निष्काळजी व उत्तेजक विधानांमुळे जनतेमध्ये संभ्रम निर्माण होतो व शत्रुराष्ट्रांना चुकीचा संदेश जातो.

राजकीय नेत्यांनी आपल्या वक्तव्यांमध्ये संयम बाळगावा, समाज माध्यमांवर कोणतीही अपुरी किंवा अपप्रचार करणारी माहिती शेअर करू नये आणि जनतेमध्ये विश्वास व शांती राखण्यासाठी प्रयत्न करावेत. या काळात पक्षीय राजकारण न करता, सरकारच्या आणि लष्कराच्या निर्णयांना पाठिंबा देणं ही खरी देशभक्ती ठरेल. म्हणूनच विनंती आहे की सर्व राजकीय पक्षांनी आणि त्यांच्या नेत्यांनी युद्धजन्य परिस्थितीत फक्त राजकीय नफा-तोटा न पाहता, देशाच्या एकात्मतेसाठी जबाबदारीने वागावं हेच राष्ट्रप्रेम शिकवते.

**हृषीकेश हरदास**/वर्धा

## वाचक पत्रे

### मानवता आणि सतर्कता यांचा सुंदर मेळ

सहा मेच्या रात्री ऑपरेशन सिंदूर झाले आणि पाकिस्तानचे नऊ लष्करी तळ उद्ध्वस्त करण्यात आली. त्याला कोणी युद्ध म्हणाले, कोणी हल्ला मानले

परंतु आदर्श म्हणजे काय याचेच ते खऱ्या अर्थाने पालन होते हे समजून घेणे अगत्याचे आहे. हनुमंतांनी रावणाला जाळले नाही तर फक्त त्याची लंका

जाळली आणि म्हणूनच भारतीय लष्कराने हनुमंताच्या भूमिकेतून कार्य केले आणि जो अमानुष हल्ला झाला होता त्याचे संरक्षणात्मक उत्तर दहशतवाद्यांना दिले तेसुद्धा व्याप्त काश्मीरवर हल्ला करून, म्हणजेच आदर्श जगाला दाखून दिला हा यातून बोध घेणे गरजेचे वाटते. मानवता आणि सतर्कता यांचा सुंदर मेळ या ऑपरेशन सिंदूरमधून बघायला मिळाला. पण त्यावर सुद्धा असंबद्ध भाषणं पत्रकार परिषदेतून करायला काही राजकीय मंडळी चुकली नाहीत हेच या देशाचे दुर्दैव आहे. पण काहीही असो, हा हिशेब देशाला विजयाकडे नेणारा ठरतो हे विसरून चालणार नाही.

**अमोल करकरे**/९९६७९२७६१७

### मोदींचे हात बळकट करा

पहलगाम हल्ल्याचा बदला म्हणून भारताने पाकिस्तानातील ९ दहशतवादी तळ उद्ध्वस्त केली. त्यानंतर पाकिस्ताननेही युद्धाच्या आवेशात हल्ले सुरू केले आहे. तेव्हा भारत सरकारला पाठिंबा म्हणून सर्व राज्य सरकारांनी फुकट योजना बंद कराव्या. कारण युद्ध किती काळ चालेल याचा आजच अंदाज घेता येणार नाही व युद्धात खूप जास्त खर्च होत असतो.

युद्धाचे वेळी व युद्धानंतर पैशाची मोठ्या प्रमाणात गरज भासत असते. तसेच विदेशात जाणाऱ्या पर्यटकांनी त्यांचा प्रवास थांबवावा. विदेशातला प्रवास म्हणजे मोठ्या प्रमाणावर डॉलरचा खर्च होत असतो. युद्धात व युद्धानंतर डॉलरची देखील आवश्यकता भासणार आहे. भारतातील सर्व नागरिकांनी मोदींचे हात बळकट करण्याकरिता सहकार्य करावे.

**जयंत ओक**/९७६४६४८३८३

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल अॅड्रेस
tbedit2016@gmail.com
तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास **९८५०७५३२८१** या व्हॉट्स अॅप क्रमांकावर पाठवावा.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## महत्वाचे...

# राज्यात ठिकठिकाणी आज 'मंदिर मुक्तिदिन'

**तभा वृत्तसेवा । विशेष प्रतिनिधी**
**मुंबई, दि.१० मे:**

राष्ट्र सेवा दलामार्फत महाराष्ट्रात शनिवारी १० मे रोजी मंदिर मुक्तिदिन म्हणून साजरा होत आहे. विठ्ठल मंदिरं आणि इतर ठिकाणी मान्यवरांच्या उपस्थितीत भाविकांना फुलं, पेढे देऊन आनंद साजरा करण्यात येणार आहे.

राष्ट्रसेवा दल आणि इतर संघटनांनी या कार्यक्रमाचं आयोजन केले असून मुंबई, नवी पेठ( पुणे), हडपसर, (पुणे), मालेगांव, कोल्हापूर, सातारा, चिपळूण, पंढरपूर, धुळे, सिन्नर, सासवड( पुणे ) आणि इतर ठिकाणी हा मंदिर मुक्तिदिन साजरा होत आहे. मंदिरात मागास, दलित समाजाला प्रवेश नव्हता विठ्ठल ही महाराष्ट्राची देवता. विठ्ठल मंदिर सर्वांसाठी खुलं व्हावं, यासाठी साने गुरुजींनी १ मे १९४७ रोजी उपोषण सुरू केले होते. सेनापती बापट, क्रांतीसिंह नाना पाटील, कर्मवीर भाऊराव पाटील, स्वामी केवलानंद सहजानंद भारती, काकासाहेब बर्वे, आचार्य अत्रे या लोकनेत्यांच्या सहभागामुळं विठूराया मुक्तीची

चळवळ महाराष्ट्रभर पोहोचली. मध्यवर्ती कायदे मंडळाचे अध्यक्ष दादासाहेब मावळंकर यांनी यात हस्तक्षेप केला. अखेर पुजारी, बडवे हादरले आणि त्यांनी माघार घेतली. दलितांना मंदिरात प्रवेश मिळाला. त्यामुळे १० मे हा दिवस मंदिर मुक्तिदिन म्हणून साजरा होतोय, अशी माहिती अशोक शिंदे, दीपक सोनावणे, राम कोंडाळकर, मनोज खराडे, महादेव पाटील यांनी दिली.

# मोहोळमधील २२ हजार शेतकऱ्यांना ५९ कोटींचा पिक विमा मंजूर

## माजी आमदार यशवंत माने यांच्या पाठपुराव्याला यश

**शेतकरी संख्या व त्यांना मिळालेली रक्कम**

| तालुका | शेतकरी संख्या | पिक विमा रक्कम (लाख) |
|---|---|---|
| मोहोळ | ८,८५६ | २२ कोटी ९ लाख |
| उत्तर सोलापूर | १२,५१९ | ३४ कोटी ८१ लाख |
| पंढरपूर | ९५१ | २ कोटी २९ लाख |

**तभा वृत्तसेवा,**
**मोहोळ, दि. ९ मे -**

खरीप हंगाम २०२३-२४ मध्ये भरलेल्या विविध पिकांच्या विम्यापोटी ५९ कोटी १९ लाख रुपयाचा पिक विमा मंजूर झाला असून, येत्या आठवड्यात हे पैसे २२ हजार ३२६ शेतकऱ्यांच्या खात्यावर वर्ग होणार असल्याची माहिती मोहोळचे माजी आमदार यशवंत माने यांनी दिली.



या संदर्भात अधिक माहिती अशी की, शेतकऱ्यांसाठी एक रुपयात पीक विमा ही योजना शासनाने राबविली होती. त्या माध्यमातून मोहोळ, उत्तर सोलापूर व पंढरपूर या मोहोळ विधानसभा मतदार संघातील २२ हजार ३२६ शेतकऱ्यांनी खरीप हंगामातील कांदा, सोयाबीन, तूर, उडीद या पिकांचा विमा भरला होता. पिक विमा भरल्यानंतर त्या शेतकऱ्यांनी पिक विमा कंपनीला फोन करून कळविले होते. त्यानुसार कंपनीचे प्रतिनिधी व कृषी सहाय्यक यांनी प्रत्यक्ष सर्वे केला होता. त्यानुसार हा पीक विमा मंजूर झाला आहे. चालू वर्षी पाऊस नसल्याने अनेक शेतकऱ्यांनी उसाचे पीक मोडून टाकले, त्यामुळे त्यांची मोठी आर्थिक कोंडी झाली होती, तर शेतकऱ्यांचे पूर्ण आर्थिक नियोजन कोलमडले होते. मात्र या ५९ कोटी १९ लाख रुपयांच्या पिकविम्या मुळे शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे. सर्वात जास्त विमा उत्तर सोलापूर तालुक्यातील शेतकऱ्यांनी तर सर्वात कमी विमा पंढरपूर तालुक्यातील शेतकऱ्यांनी भरला होता.

दरम्यान पीक विमा भरल्यानंतर अनेक शेतकऱ्यांनी माजी आमदार यशवंत माने यांच्याकडे पीक विम्याचे पैसे मिळाले नसल्याच्या तक्रारी केल्या होत्या. त्या तक्रारीची दखल घेत माजी आमदार माने यांनी उपमुख्यमंत्री अजित पवार व तत्कालीन कृषिमंत्री दादा भुसे यांच्याकडे माजी आमदार राजन पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पाठपुरावा केला होता. त्याला यश प्राप्त होऊन २२ हजार ३२६ शेतकऱ्यांना ५९ कोटी १९ लाख रुपयांचा पिक विमा मंजूर झाला आहे. यामुळे शेतकऱ्यांत आनंदाचे वातावरण आहे.



# चंद्रभागाबाई यलगुलवार ज्युनिअर कॉलेजचा ९५.३२ टक्के निकाल

**सोलापूर, दि. ९ मे-**

पुणे बोर्डाचा २०२५ चा (एच.एस.सी) परीक्षेचा निकाल नुकताच जाहीर झाला. या परीक्षेत चंद्रभागाबाई यलगुलवार ज्युनिअर कॉलेजने घवघवीत यश संपादन केले. महाविद्यालयातील गिरगेल पवित्रा ओमप्रकाश या विद्यार्थिनी ७१.८३ % गुण मिळवून महाविद्यालयात प्रथम आली,चव्हाण प्रसाद बाळासाहेब ७०.६७ % मिळवून द्वितीय तर वाघमारे शीलरत्न करूण ६६.५० % गुण मिळवून हा विद्यार्थी तिसऱ्या क्रमांकाने उत्तीर्ण झाला. महाविद्यालयातील दिव्यांग विद्यार्थ्यांचा निकाल शंभर टक्के लागला असून,१००% निकालाची परंपरा दिव्यांग विद्यार्थ्यांनी टिकून ठेवली. यंदाही महाविद्यालयाने उज्वल यशाची परंपरा राखली आहे.महाविद्यालयाचा विक्रमी निकाल लागला असून मिळालेल्या यशाबद्दल संस्थेचे संस्थापक अध्यक्षप्रकाशजी यलगुलवार, जनरल सेक्रेटरी के.डी.पाटील व शशीभूषण यलगुलवार, उपाध्यक्ष अनुगीता पवार तसेच ज्युनियर कॉलेजचे विभाग प्रमुख डॉ. किशोर देशपांडे, प्राचार्य सीमा श्रीगोंदेकर-यलगुलवार यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे व मार्गदर्शन करणाऱ्या प्राध्यापकांचे अभिनंदन केले.


# सनातन राष्ट्र शंखनाद महोत्सव १७ मे पासून

## सनातन संस्थेचे संस्थापक सच्चिदानंद परब्रह्म डॉ. जयंत आठवले यांचा ८३ वा जन्मोत्सव

### देशविदेशांतून २५ हजार तर सोलापूर जिल्ह्यातून १२०० जणांची उपस्थिती

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ९ मे-**

सनातन संस्थेचे संस्थापक सच्चिदानंद परब्रह्म डॉ. जयंत आठवले यांचा ८३ वा जन्मोत्सव आणि संस्थेच्या रौप्य महोत्सवी वर्षाचे औचित्य साधून 'विश्वकल्याणार्थ रामराज्यासमान सनातन राष्ट्रा'चा शंखनाद करण्यासाठी गोव्यात दि. १७ ते १९ मे या कालावधीत 'सनातन राष्ट्र शंखनाद महोत्सवा'चे ऐतिहासिक आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती सनातन संस्थेचे हिरालाल तिवारी यांनी पत्रकार परिषदेत दिली.



राष्ट्र आणि धर्म रक्षणासाठी समर्पित संत, महंत, हिंदुत्वाचे शिलेदार, विचारवंत, केंद्रीय मंत्री, काही राज्यांचे मुख्यमंत्री, तसेच २५ हजारांहून अधिक साधक, धर्मप्रेमी हिंदू यांची उपस्थिती हे या महोत्सवाचे वैशिष्ट्य आहे. सोलापूर जिल्ह्यातून १२०० हून अधिक हिंदू या महोत्सवाला उपस्थित रहाणार आहेत. हा दिव्य शंखनाद हा रामराज्याच्या दिशेने टाकलेले पुढचे पाऊल राहणार आहे. भारतीय सैन्यदलाने पाकिस्तानकडून भारताच्या १५ ठिकाणांवर हल्ल्याचा प्रयत्न हाणून पाडला आणि पाकिस्तानात घुसून त्याला प्रत्युत्त दिले या सर्व निर्णायक लष्करी कारवाईचे सनातन संस्थेच्या वतीने स्वागत करतो. संपूर्ण हिंदू समाज ह भारतीय सैन्याबरोबर एकजुटीने उभा आहे. सच्चिदानंद परब्रह्म डॉ. आठवले यांच्या मार्गदर्शनाखाली गेली २५ व सनातन संस्था आदर्श आणि संस्कारी पिढी घडवण्यासाठी अथक प्रयत्न करत आहे. या रौप्य महोत्सवी वर्षानिमित्त देशात रामराज्य स्वरूप 'सनातन राष्ट्रा'साठी सामूहिक संकल्प केला आहे.

पत्रकार परिषदेस प्रज्ञापूरी ज्ञानपीठ अक्कलकोटचे पिठासन धमाधिकारी प्रसाद पंडित, 'आर्ट ऑफ लिव्हिंग' चे साधक पुरुषोत्तम सग्गम, अधिवक्ता मुकुंद कुलकर्णी, हिंदु जनजागृती समितीचे राजन बुणगे आदी उपस्थित होते.

**महोत्सवासाठी हे मान्यवर राहणार उपस्थित**

या महोत्सवाला 'आर्ट ऑफ लिव्हिंग'चे संस्थापक गुरुदेव श्री श्री रविशंकरजी, पतंजली योगपीठाचे संस्थाप् प.पू. योगऋषि स्वामी रामदेवजी, श्रीराम जन्मभूमी तीर्थक्षेत्र न्यासाचे कोषाध्यक्ष प.पू. स्वामी गोविंददेव गिरिज 'सनातन बोर्ड'चे प्रणेते पूज्यश्री देवकीनंदन ठाकूर महाराज, केंद्रीय ऊर्जा राज्यमंत्री श्रीपाद नाईक, उत्तर प्रदेश मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, गोव्याचे मुख्यमंत्री प्रमोद सावंत, छत्तीसगडचे मुख्यमंत्री विष्णुदेव साय, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, भाजपचे आ. टी. राजासिंह, तसेच काशी-मथुरा येथील मंदिरांचा खटला लढवणारे अधिवक्ता विष्णू जैन आदींसह मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

# अनेक परीक्षा एकाच वेळी आल्याने टेट परीक्षा पुढे ढकलण्याची मागणी



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ९ मे**

मे महिन्याच्या शेवटच्या टप्प्यात महाराष्ट्र लोकसेवा आयोगासह केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या परीक्षा पूर्वनियोजित आहेत. अशातच राज्यातील महत्त्वाच्या विद्यापीठांच्या देखील सत्र परीक्षा याच कालावधीत होत आहेत. असे असतानाही शिक्षक भरतीसाठी होणारी अभियोग्यता व बुद्धिमत्ता चाचणी २०२५ ही परीक्षा देखील २४ मे ते पाच जून या कालावधीत होत आहे. विविध घटकांमध्ये असलेल्या असमन्वयाचा फटका मात्र शेकडो उमेदवारांना बसण्याची शक्यता आहे. अनेक स्पर्धा परीक्षा एकाच कालावधीत येत असल्याने शिक्षक भरतीसह अधिकारी होण्याचे स्वप्न पाहणाऱ्या उमेदवारांसमोर नक्की, कोणती परीक्षा द्यायची? असा प्रश्न उपस्थित झाला आहे.

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाची राज्य सेवा मुख्य परीक्षा २७ ते २९ मे या कालावधीत आहेत. तर आयोगामार्फत अराजपत्रित गट-क ही परीक्षा एक जून दरम्यान आहे. यांसह केंद्रीय लोकसेवा आयोगाची नागरी पूर्व परीक्षा देखील मे महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात आहे. या सर्व परीक्षा पूर्वनियोजित आहेत, मात्र असे असतानाही महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेने राज्यातील सर्व स्थानिक स्वराज्य संस्था आणि खासगी व्यवस्थापनाच्या शाळांमध्ये पवित्र या संगणकीय प्रणालीद्वारे शिक्षक भरतीकरिता शिक्षकअभियोग्यता व बुद्धीमत्ता चाचणी २०२५ (टेट) ही परीक्षा २४ मे ते पाच जून या कालावधीत आयोजित केली आहे. या परीक्षेसाठी अर्ज प्रक्रिया सुरू झाली आहे. परंतु, अनेक उमेदवार हे मुळातच राज्य लोकसेवा आयोग आणि केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या परीक्षांची तयारी करत आहेत. अशातच हे उमेदवार शिक्षक भरतीच्या परीक्षेची देखील तयारी करतात. परंतु, आता या परीक्षा एकाच कालावधीत आल्याने उमेदवार संभ्रमात पडले आहेत.

> राज्य परीक्षा परिषदेने टेट परीक्षेचा अर्ज भरताना त्यात, उमेदवार अन्य स्पर्धा परीक्षा देत असतील तर, त्याचे प्रवेशपत्र अपलोड करण्यात यावे, असे सांगितले आहे. त्यासाठी १४ मे पर्यंतची मुदत दिली आहे. परंतु, मुळातच स्पर्धा परीक्षांचे प्रवेशपत्र हे परीक्षेअगोदर सात दिवस उपलब्ध होते. असे असताना हे उमेदवार प्रवेशपत्र कसे अपलोड करणार, याचा विचार करावा
>
> **-संदीप कांबळे, अध्यक्ष**
> **युवा शैक्षणिक व सामाजिक न्याय संघटना**

> महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचे अनेक परीक्षा प्रलंबित आहेत. राज्य सेवा मुख्य परीक्षा आणि अभियोग्यता व बुद्धिमत्ता चाचणी परीक्षा या दोन्ही परीक्षा एकाच कालावधीत असल्याने उमेदवारांना एक परीक्षा देण्यापासून वंचित राहावे लागणार आहे. त्यामुळे राज्य सरकारकडून टेट परीक्षा पुढे ढकलण्यात यावे .
>
> **- प्रशांत शिरगुर, राज्य उपाधक्ष,**
> **स्पर्धा परीक्षा तथा पवित पोर्टल शिक्षक भरती संघटना**

**PANDIT DEENDAYAL UPADHYAY DENTAL COLLEGE**
**19/1, KEGAON -SOLAPUR**
Ph.No. 0217- 2500440, 2500441 Fax No.0217 – 2500613
Email : pdudentalcollege@rediffmail.com, Web site: www.pdudentalcollege.co.in

**WANTED**
Application are invited, in the prescribed format from the eligible candidates for the following posts-
**Professor, Associate Professor (Reader), Asist. Professor (Lecturer) & Tutor**
Requisite Qualification, Experience, Other details and prescribed application format are available on College Website www.pdudentalcollege.co.in
**Last date of application is 28/05/2025**
Sd/-
Executive Director / Principal

वारस प्रमाणपत्र मिळणेचा अर्ज
दि.कि.अर्ज नं.४७/२०२५
नि.५

**जाहीर प्रसिध्दीकरण**

**बार्शी येथील मे. सि. ज. ज्यु. डि. साहेब यांचे कोर्टात**

१) **श्री. श्रीहरी उत्तरेश्वर भोसले,** उ.वय - ४३ वर्षे, धंदा - वकीली व शेती, रा. रउळगांव ता. बार्शी जि. सोलापूर
२) **श्री. दत्तप्रसाद उत्तरेश्वर भोसले,** उ.वय- ४७ वर्षे, धंदा- शेती, रा. सदर
३) **लिला सिध्देश्वर सांगुळे,** उ.वय- ५५ वर्षे, धंदा- घरकाम, रा. झाडी ता. बार्शी जि. सोलापूर
४) **शिला राजेंद्र जगताप,** उ.वय- ५३ वर्षे, धंदा- घरकाम, रा. उंडेगांव ता. बार्शी, जि. सोलापूर
५) **माधवी संतोष पाटील,** उ.वय- ५१ वर्षे, धंदा- घरकाम, रा. खडकलगांव ता. बार्शी जि. सोलापूर
६) **गोकर्णा बाळासाहेब डिसले,** उ.वय-४५ वर्षे, धंदा- घरकाम, रा. जवळगांव ता. बार्शी जि. सोलापूर
— **अर्जदार**

**विरुध्द**

**कोणी नाही** --- **सामनेवाला**

**अर्ज- बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ कलम २ अन्वये**
**यात अर्जदार कळवितो ते खालीलप्रमाणे**

यातील अर्जदार नं. १ ते ६ यांचे वडिल उत्तरेश्वर वसुदेव भोसले यांचा मृत्यु दि. १०/०१/२०२१ रोजी राहत्या घरी मौजे रऊळगावं येथे झालेला आहे. तसेच अर्जदार यांची आई पुष्पा उत्तरेश्वर भोसले यांचा मृत्यु दि.२९/०७/२०२४ रोजी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रूग्णालय धाराशिव येथे झालेला आहे. मयत कै. उत्तरेश्वर वसुदेव भोसले व कै. पुष्पा उत्तरेश्वर भोसले यांचे अर्जदार नं. १ ते ६ हे वारस असल्याने त्यांचा सांभाळ व मृत्युनंतर अंत्यविधी वगैरे सर्वकाही अर्जदाराने केले आहे. मयत कै. उत्तरेश्वर वसुदेव भोसले व कै. पुष्पा उत्तरेश्वर भोसले यांना अर्जदार नं. १ ते ६ शिवाय इतर कोणीही वारस नाही.

त्याअर्थी, वर नमुद अर्जदार यांचे शिवाय मयत कै. उत्तरेश्वर वसुदेव भोसले व कै. पुष्पा उत्तरेश्वर भोसले यांना इतर कोणाचा कसल्याही प्रकारे वारस हक्क हितसंबंध असल्यास त्यांनी सदर नोटीस प्रसिध्द झालेपासून ३० दिवसांचे आत अगर नेमलेली तारीख दि. ०९/०७/२०२५ रोजी या कामी मे. कोर्टात सकाळी ११.०० वा हजर राहून कागदपत्रानिशी आपले म्हणणे अगर हरकत द्यावी अथवा कोणाचेही काही म्हणणे/हरकत न आल्यास सदरील अर्जदारांना सदरील कै. उत्तरेश्वर वसुदेव भोसले व कै. पुष्पा उत्तरेश्वर भोसले याचे वारस प्रमाणपत्र देण्यात येईल, कळावे. हे जाहीर प्रकटन दिला. ता. ०७/०५/२०२५

सही/- क. लिपीक — कोर्टाचा शिक्का — सही/- सहा. अधिक्षक, दिवाणी न्यायालय क. स्तर, बार्शी

**जाहीर नोटीस**

सोलापुरातील तमाम लोकांस जाहीर नोटिसीने कळविण्यात येते की, डि. व सब डि. सोलापूर पैकी शहर सोलापूर महानगरपालिका हद्दीतील भवानी पेठ येथील धोत्रीकर वस्ती झोपडपट्टीमधील झोपडी नं. ८१ यांसी मिळकत क्र. १२१३८००५९८ असून याचे क्षेत्र ६०० चौ. फूट इतके असून यात संपूर्ण पत्रा शेड असलेले दोन खोली व बाथरूम आहे.

वर नमूद संपूर्ण झोपडी घरजागा ही लक्ष्मीबाई धानप्पा नलगेशी यांच्या मालकीची व कब्जे वहिवाटीची होती. त्यांचे दिनांक १०/०८/२०१० रोजी निधन झाले आहे. तसेच त्यांचे पती धानप्पा भिमय्या नलगेशी हे दि. २२/०२/१९७९ रोजी निधन झाले आहे. कै. लक्ष्मीबाई धानप्पा नलगेशी यांचे १. हणमंतु धानप्पा नलगेशी (मुलगा) २. राधिका रमेश चिंता (मुलगी) या नात्याने कायदेशीर वारसदार आहे. हणमंतु धानप्पा नलगेशी यांनी वारसा हक्कानुसार सो.म.पा.च्या व ग.व.सु. विभागात त्यांच्या नावाची नोंद वर नमूद झोपडी जागेवर करणेकामी वारस प्रतिज्ञापत्र लिहून दिले आहे. सदर मिळकत ही निर्वेध व निजोखमी असल्याची व ती त्यांनी यापूर्वी कोणासही विक्री, ट्रान्सफर, गहाण, दान, टाच, लिज अथवा अन्य मार्गाने गुंतविलेली नाही अशी हमी त्यांनी आमच्या अशिलांना दिलेली आहे. तरी सदरहू मिळकतीवर जर कोणाचा वारस, मालकी हक्क, हितसंबंध, कब्जा, गहाण, दान, लिज, लिन, इजमेंट राईट, कोर्टाची टाच, वित्त संस्थेचा बोजा अगर इतर बँकेचा बोजा वगैरे कांही असल्यास सदर नोटीस प्रसिध्द झालेपासून ५ (पाच) दिवसांचे आत खालील दिलेल्या पत्यावर समक्ष भेटून आपल्या हरकती, तक्रारी लेखी स्वरूपात नोंदवाव्यात. जर वरील मुदतीत कोणाची हिला हरकत न आल्यास आमचे अशिल हणमंतु धानप्पा नलगेशी यांचे नावाची नोंद करतील म्हणून ही जाहीर नोटीस देण्यात येत आहे.

ही जाहीर नोटीस दिली तारीख : ०९/०५/२०२५

सही/-
ॲड. एच.जे. राजपूत
बी.कॉम., एमएसडब्ल्यु, एलएल.बी,
अ-३९, शिवगंगा नगर भाग-१,
जुळे सोलापूर, सोलापूर
मो.नं. ९६२३५२२७८९
अशिलातर्फे ॲडव्होकेट

दिवाणी किरकोळ अर्ज नं. ३२/२०२५
नि.६

**जाहीर प्रसिध्दीकरण**

**बार्शी येथील मे. अतिरिक्त जिल्हा न्यायाधिश साहेब यांचे न्यायालयात**

**माधव सोनाजी कुलकर्णी,** वय २० वर्षे, धंदा- पुरोहित, रा. धनगरगल्ली, कसबा कसबा पेठ, बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर — **अर्जदार**

**विरुध्द**

**महाराष्ट्र सरकार** --- **सा.वाला**

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की. ज्याअर्थी, यातील अर्जदार हा अज्ञान रुक्मीण सोनाजी कुलकर्णी हा तिचा भाऊ असून तो हिंदू ब्राम्हण या समाजाचा आहे. अर्जदार याचा वडिल सोनाजी पांडूरंग कुलकर्णी हा दि.०२/१२/२०१९ रोजी बार्शी येथे मयत झालेला असून तो अज्ञान मुलीचा वडिल होता. तसेच अज्ञान मुलीची आई जयश्री सोनाजी कुलकर्णी हिने पतीचे मृत्यूपश्चात प्रशांत गोविंद जोशी रा. उन्नतीनगर कोलखेड अकोला याचेशी दुसरा पुनर्विवाह केला होता. सदर अज्ञानाचे आईचे पूर्नविवाहानंतरचे नांव जयश्री प्रशांत जोशी असे नांव झालेले होते. अज्ञान मुलीची आई जयश्री ही दि. ०८/०५/२०२० रोजी नागपूर येथे मेडिकल कॉलेज, आणि हॉस्पीटल, नागपूर येथे मयत झालेली आहे. सदर अज्ञान मुलगी ही यातील अर्जदार यांचेकडे राहणेस आहेत त्यांचे पालनपोषण अर्जदार हा करीत असून त्याचेशिवाय या अज्ञान मुलीला दुसरे कोणी जवळचे सांभाळ करणेकरीता नातेवाईक नाहीत म्हणून या न्यायालयात सदर अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी, यातील अर्जदार अज्ञान रूक्मीण सोनाजी कुलकर्णी हिचा पाल्यांचा पालक म्हणून पालकत्व प्रमाणपत्र देण्याबाबत कोणाची काही हरकत असल्यास सदर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाचे आत वकीलामार्फत अगर स्वतः मे. कोर्टात नेमलेल्या तारखेस म्हणजे दि. १८/०६/२०२५ रोजी अगर त्यापूर्वी हजर होऊन म्हणणे मांडावे. सदर मुदतीत कोणाचीही तक्रार न आल्यास मे. कोर्ट पुढील योग्य तो हुकूम करतील याची नोंद घ्यावी, हे प्रसिध्दीकरण माझ्या सहीने व मे. न्यायालयाचे सही शिक्क्यानिशी दिले. ता. ०७/०५/२०२५

सही/- क. लिपीक — कोर्टाचा शिक्का — सही/- अधिक्षक, मे. अति. जिल्हा न्यायालय, बार्शी ता. बार्शी, जि. सोलापूर

दिवाणी किरकोळ अर्ज नं. १४/२०२५
नि.नं. ८

**जाहीर समन्स/नोटीस**

**बार्शी येथील मे. जिल्हा अति. व सत्र न्यायाधिश सो. यांचे कोर्टात**

**ओमप्रकाश दगडू सुतार (पांचाळ),** वय - २९ वर्षे, धंदा - मजूरी, रा.मु.पो. सारोळे, ता. बार्शी, जि. सोलापूर — **अर्जदार**

**विरुध्द**

**सौ. आशा ओमप्रकाश सुतार (पांचाळ),** वय २७ वर्षे, धंदा घरकाम, द्वारा - शरद केशव पांचाळ, मु. पो. पाटोदा, ता. जि. धाराशिव (उस्मानाबाद) — **सामनेवाली**

ज्या अर्थी, यातील अर्जदार यांनी, त्यांचा अज्ञान मुलगा - श्रवण याचा ताबा मिळणेसाठी, त्याची आई म्हणजेच अर्जदाराची पत्नी सामनेवाली - सौ. आशा ओमप्रकाश सुतार (पांचाळ), रा. वर नमूद केलेप्रमाणे यांचे विरुध्द बार्शी येथील या मे. कोर्टात सदर नंबरचा अर्ज दाखल केलेला आहे. सदर अर्जाचे कामी त्यांना वर नमूद पत्त्यावर नोटीस काढली परंतू ते हजर नसलेने, बजावणी झाली नाही. त्यांचा सध्याचा पत्ता, ठाव ठिकाणा माहित नसलेने, त्यांना पूर्वीचेच सदर पत्त्यावर, सदर जाहीर नोटीस काढलेली आहे. तेंव्हा त्यांना या जाहीर समन्स/नोटीसने कळविण्यात येते की, त्या अर्थी, सदर जाहीर समन्स/नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाचे आत किंवा नेमली ता. १२/६/२०२५ रोजी, सदरकामी हजर राहून, आपले म्हणणे वा हरकत लेखी स्वरूपात पुराव्यानिशी दाखल करावी. मुदतीत तुमची हरकत वा म्हणणे आले नाही तर, तुम्हांस कांही सांगणे नाही, असे समजून, तुमचे गैरहजेरीत पुढील चौकशी होऊन न्यायनिर्णय होईल. कळावे हे जाहीर समन्स/नोटीस मे. कोर्टाचे सहीशिक्क्यानिशी दिली असे. ता.५/५/२०२५

कोर्टाचा शिक्का — सही/- सहाय्यक अधिक्षक, मा. जिल्हा अति. व सत्र न्यायाधिश साहेब, बार्शी, ता. बार्शी

**जाहीर नोटीस**

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, **मिळकतीचे वर्णन :-** डि ।। व सब डि।। सोलापूर पैकी तालुका उत्तर सोलापूर पैकी शहर सोलापूर महानगरपालिका नवीन हद्दवाढ भागातील कुमठे येथील आदित्य रिजेन्सीमधील बिनशेती खुली प्लॉट जागा यांसी गट नंबर ३२१/२/अ, ऑनलाईन उताऱ्याप्रमाणे गट नं.३२१/२/अ यापैकी प्लॉट नं. ६० यांसी क्षेत्र ११९.५२ चौ.मी. किंवा १.१९.५२ आर.चौ.मी. इतके असून यांसी चतुःसिमा : पुर्वेस रस्ता, पश्चिमेस प्लॉट नं. ५१, दक्षिणेस प्लॉट नं. ५९, उत्तरेस प्लॉट नं. ६१.

येणेप्रमाणे चतुःसिमेतील खुली प्लॉट जागा ही शांतेश राजशेखर पासोडे, रा. सोलापूर यांच्या मालकी व कब्जे वहिवाटीची असून सदर खुली प्लॉट जागा त्यांनी आमचे अशिलांना कायम खुष खरेदीने देण्याचे ठरवून इसारापोटी रक्कम स्विकारुन, रितसर इसारा पावतीचा दस्त लिहून देऊन, सदर खुली प्लॉट जागा ही निर्वेध व निजोखमी असल्याची व ती त्यांनी यापूर्वी कोणासही विक्री, ट्रान्सफर, गहाण, दान, टाच, लिज अथवा अन्य मार्गाने गुंतविलेली नाही. अशी हमी त्यांनी आमच्या अशिलांना दिलेली आहे.

तरी सदरहू खुली प्लॉट जागेवर जर कोणाचा मालकी हक्क, हितसंबंध, कब्जा, गहाण, दान, लिज, इजमेंट राईट कोर्टाची टाच, वित्त संस्थेचा बोजा अगर इतर बँकेचा वगैरे काही तक्रार असल्यास सदर नोटीस प्रसिध्द झालेपासून सात (०७) दिवसांच्या आत खालील दिलेल्या पत्त्यावर आपल्या हरकती, तक्रारी, लेखी स्वरुपात कळविण्यात यावे. जर वरील मुदतीत कोणाचेही हरकत व लेखी तक्रार नमूद पत्त्यावर न आल्यास आमचे अशिल सदरहू मिळकत निर्वेध व निजोखमी असल्याचे ग्राहय धरुन सदर खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. तद्नंतर कोणाचीही कसल्याही प्रकारची तक्रार अगर हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक असणार नाही, याची नोंद घ्यावी.

ही जाहीर नोटीस दिली ता. ०९/०५/२०२५.

सही/-
ॲड. आर.एच. परदेशी,
एम.कॉम., एलएल.बी.
ऑ. २-क, बुधवार पेठ,
कस्तुरबा मार्केटजवळ, सोलापूर.
मो. नं.९८२२८०७८७९
अशिलातर्फे ॲडव्होकेट

**Hon. Balasaheb Thackeray Agribusiness and Rural Transformation (SMART) Project**
**E-TENDER NOTICE NO: 2025 DOAWB 1178856**
**Supply, Installation, Commissioning and Testing of Fully Automatic Rice Mill (3TPH)**
The Government of Maharashtra is implementing the World Bank-funded SMART Project. **Vidarbha Baliraja Farmer Producer Company Ltd. At Sakoli, Ta- Sakoli, Dist- Bhandara** is one of the beneficiaries under the project and inviting online bids on **https://mahatenders.gov.in** for above mentioned Machinery. The bid document is also available on the project website **www.smart-mh.org**, in tender and procurement section. The last date for submission of online bid is **26/05/2025 up to 2.00 PM.** Any updates or notices shall be published on aforementioned websites only.
**District Implementation Unit, SMART Project, Dist. -Bhandara**

केनरा बैंक Canara Bank
सिंडिकेट Syndicate
**ARM Branch,** Canara Bank Building, Hampankatta, Balmatta Road, Mangaluru - 575001.
**(A GOVERNMENT OF INDIA UNDERTAKING)**

**विक्री सूचना**

सिक्युरिटायझेशन आणि वित्तीय मालमत्तेचे पुनर्निर्माण आणि सुरक्षा व्याज अंमलबजावणी कायदा, 2002 अंतर्गत जंगम आणि स्थावर मालमत्तेच्या विक्रीसाठी ई-लिलाव विक्री सूचना, सिक्युरिटी इंटरेस्ट (अंमलबजावणी) नियम, 2002 च्या नियम 8 (6) आणि 9 (1) च्या तरतुदीसह वाचली जाते. सर्वसाधारणपणे जनतेला आणि विशेषतः कर्जदारांना, गहाणखतदारांना आणि जामीनदारांना सूचना देण्यात येत आहे की खाली वर्णन केलेल्या जंगम आणि स्थावर मालमत्ता सुरक्षित कर्जदाराकडे गहाण ठेवलेल्या/चार्ज केलेल्या, ज्याचा भौतिक ताबा कॅनरा बँकेच्या अधिकृत अधिकाऱ्याने घेतला आहे, त्या 30/05/2025 रोजी जसे आहे तिथे आहे, जसे आहे जे आहे आहे आणि जे काही आहे ते या स्वरूपात विकल्या जातील. 30/04/2025 रोजी 37,26,26,514.98 (रुपये सदतीस कोटी सव्वीस लाख सव्वीस हजार पाचशे अठ्याण्णव पैसे फक्त) देयता अधिक पुढील व्याज 01/05/2025 पासून करारानुसार व्याजदराने देय तारखेपर्यंत, आनुषंगिक खर्च, इतर शुल्क आणि खर्च इ. मेसर्स शिवप्रियदर्शिनी कास्टिंग्ज प्रायव्हेट लिमिटेड कडून, मेसर्स शिवप्रियदर्शिनी कास्टिंग्ज प्रायव्हेट लिमिटेड कडून, त्याचे व्यवस्थापकीय संचालक श्री. अण्णासाहेब सदाशिव चौगुला यांच्या प्रतिनिधित्वाखाली. ज्ञात भार असल्यास, जंगम आणि अचल मालमत्तेचे तपशील आणि संपूर्ण वर्णन.

**मालमत्ता १: मालमत्ताधारकाचे नाव : M/s. शिवप्रियदर्शिनी एंटरप्रायजेस**

| Lot No. | मालमत्तेचे वर्णन | राखीव किंमत | बयाणा रक्कम ठेव |
|---|---|---|---|
| Lot 1. | होनागाचा प्लॉट क्रमांक 48-A म्हणून ओळखल्या जाणाऱ्या जमिनीचा तो सर्व तुकडा होनागाच्या गावातील काकती होबळी, बेळगाव तालुका, बेळगाव जिल्हा, मापानुसार 2121.89 चौ.मी. जमीन आहे दि. 08/11/2013 च्या विक्री करारानुसार 9642/13-14 आणि त्यावर बांधकाम केलेली औद्योगिक इमारत (1989 चौ.मी.) कर्नाटक औद्योगिक क्षेत्र विकास मंडळ, बंगलोरच्या दिनांक 03/11/1997 च्या ताबा प्रमाणपत्रानुसार) त्याच्याशी संलग्न असलेल्या मार्ग आणि पाण्याच्या सर्व सुविधा हक्कांसह. सीमा : पूर्व : प्लॉट क्रमांक 48/B, पश्चिम : 60 रुंद रस्ता, उत्तर : प्लॉट क्रमांक 47/A-2, दक्षिण : प्लॉट क्रमांक 49/A. | रु. 3,14,57,000.00 | रु. 31,45,700.00 |
| Lot 2. | होनागा औद्योगिक क्षेत्र होनागा, काकती तालुका आणि जिल्हा बेळगाव येथे स्थित RS No 536 मधील KIADB, बेळगाव येथील प्लॉट क्रमांक 48A येथे असलेल्या औद्योगिक इमारतीमध्ये स्थापित उपकरणे, कारखाना आणि यंत्रसामग्री यासह सर्व गृहीत धरलेल्या जंगम मालमत्ता. | रु. 42,21,000.00 | रु. 4,22,100.00 |

**Lot No. 1 ची विक्री फक्त तेव्हाच केली जाईल जेव्हा Lot 2 मधील वस्तूंसाठी वेगळी वैध बोली प्राप्त झाली आणि ती यशस्वी झाली. तथापि, पक्ष Lot 1 आणि Lot 2 दोन्हींसाठी बोली लावू शकतात आणि दोन्ही वस्तू घेऊ शकतात.**

**मालमत्ता २: मालमत्ताधारकाचे नाव : M/s. शुभम इंडस्ट्रीज (भागीदारी फर्म)**

| Lot No. | मालमत्तेचे वर्णन | राखीव किंमत | बयाणा रक्कम ठेव |
|---|---|---|---|
| 1 | मालमत्ता (समोरील भाग कार्यालय आणि मागील बाजू औद्योगिक शेड/गोदाम असलेली) प्लॉट क्रमांक 49/A (भाग) R.S.No.536 KIADB होनागा येथे स्थित 900 चौ.मी. क्षेत्रफळाचा औद्योगिक क्षेत्र होनागा, बेळगाव, सर्व सुविधाजनक मार्ग आणि पाण्याच्या जोडणीसह. सीमा : पूर्व : प्लॉट क्रमांक 49/B, पश्चिम : 60 रुंद रस्ता, उत्तर : प्लॉट क्रमांक 49A चा भाग, दक्षिण : प्लॉट क्रमांक 50A. | रु. 1,05,06,000.00 | रु. 10,50,600.00 |

अर्नेस्ट मनी डिपॉझिट 29/05/2025 रोजी किंवा त्यापूर्वी संध्याकाळी 5.00 वाजता जमा करावी. अधिक माहितीसाठी श्री. रंजन केळकर, अधिकृत अधिकारी एआरएम शाखा, कॅनरा बँक बिल्डिंग, हंपंकट्टे, बालमट्टा रोड, मंगळूरू (फोन क्रमांक 0824-2863367,9482010646, 0824-2440469) यांच्याशी संपर्क साधा. ई-मेल आयडी : cb6296@canarabank.com किंवा/किंवा पीएसबी अलायन्स प्रा.एल लिमिटेड), (संपर्क क्रमांक 7046612345/ 6354910172/ 8291220220/ 9892219848/8160205051, ईमेल : Support.BNKNET@psballiance.com).

दिनांक : 09/05/2025
ठिकाण : मंगळूरु
सही/-
अधिकृत अधिकारी, कॅनरा बँक

# भारतीय खेळाडूंचा सशस्त्र दलांना अढळ पाठिंबा







♦ **नवी दिल्ली, ९ मे**

पहलगाम येथे झालेल्या क्रूर दहशतवादी हल्ल्यानंतर संपूर्ण देश हादरला आहे व दुःखात आहे, या हल्ल्यात २६ जणांचा बळी गेला आहे, तेव्हा भारतातील अव्वल खेळाडू ऑपरेशन सिंदूरमध्ये सहभागी असलेल्या सशस्त्र दलांना अढळ पाठिंबा देण्यासाठी एकत्र आले आहेत.

**आमचे योद्धे खंबीरपणे उभे : रोहितचा संदेश**

भारतीय क्रिकेट संघाचा कर्णधार रोहित शर्मा याने समाज माध्यमावर सामायिक केलेला हृदयस्पर्शी संदेश देशभरात पसरला आहे. प्रत्येक क्षणाबरोबर, घेतलेल्या प्रत्येक निर्णयासोबत मला आपल्या भारतीय सैन्याचा, भारतीय वायुसेनेचा व भारतीय नौदलाचा खूप अभिमान वाटतो. आपले योद्धे आपल्या देशाच्या अभिमानासाठी उभे आहेत, असे त्याने लिहिले आहे त्याने नागरिकांना सतर्क राहण्याचे आणि चुकीची माहिती पसरवण्याचे टाळण्याचे आवाहन केले.

आपल्या सीमांचे इतक्या ताकदीने रक्षण केल्याबद्दल आणि जम्मूवरील ड्रोन हल्ला निष्फळ केल्याबद्दल आपल्या शूरवीरांचे कौतुक केले आहे. भारत खंबीरपणे उभा आहे. जय हिंद, असे भारताचा माजी क्रिकेटपटू शिखर धवन याने ट्विट केले.

**सैनिकांचे सदैव ऋणी : कोहली**

पश्चिम सीमेवर तणाव वाढत असताना, अनिश्चिततेने ग्रासलेल्या देशात भारताचा माजी कर्णधार विराट कोहली एक संघटित करणारा आवाज म्हणून उदयास आला आहे.

या कठीण काळात आपल्या देशाचे रक्षण करण्यासाठी आपण आपल्या सशस्त्र दलांसोबत एकजुटीने उभे आहोत आणि त्यांना सलाम करतो. आपल्या महान राष्ट्रासाठी त्यांनी आणि त्यांच्या कुटुंबियांनी दिलेल्या बलिदानाबद्दल त्यांच्या अतूट शौर्याबद्दल आणि त्यांच्या कुटुंबियांनी दिलेल्या बलिदानाबद्दल आम्ही त्यांच्या वीरांचे कायमचे ऋणी आहोत, असे विराट कोहलीने आपल्या संदेशात म्हटले आहे. आपल्या देशाचे रक्षण करणाऱ्या आपल्या शूर भारतीय सशस्त्र दलांच्या पाठीशी आपण सर्वजण उभे राहूया. आम्ही नेहमीच तुमच्यासोबत आहोत, असे भारताचा माजी यष्टिरक्षक पार्थिव पटेल म्हणाला.

**भारत तुमच्यासोबत उभा : सिंधू**

भारतीय सशस्त्र दलातील शूर पुरुष आणि महिलांना - तुमचे धाडस, शिस्त आणि बलिदान हे आपल्या राष्ट्राचा आत्मा आहे. ऑपरेशन सिंदूरसारख्या क्षणांमध्ये, आपल्याला आपल्या तिरंग्याला उंच फडकवणाऱ्या मूक शक्ती व निस्वार्थ सेवेची आठवण येते. भारत तुमच्यासोबत उभा आहे. जय हिंद, असे दोन वेळची ऑलिम्पिक पदक विजेती बॅडमिंटनपटू पी. व्ही. सिंधू हिने पोस्ट केले.

**सेहवागची पाकिस्तानवर टीका**

भारतीय लष्करी तळांवर लक्ष्यित हल्ल्यांनंतर भारत आणि पाकिस्तानमध्ये तणाव वाढत असताना, माजी भारतीय क्रिकेटपटू वीरेंद्र सेहवागने पाकिस्तानच्या कृतींवर जोरदार टीका केली आहे. पाकिस्तानने शांत राहण्याची संधी असताना युद्ध निवडले आहे. पाकिस्तानच्या हेतू आणि हेतूंचा निषेध करतो. आमचे सैन्य सर्वात योग्य पद्धतीने उत्तर देईल, असे सेहवागने म्हटले आहे.

**नागरिकांनी एकजूट राहावे : नीरज चोप्रा**

ऑलिम्पिक सुवर्णपदक विजेता भालाफेकपटू नीरज चोप्रा यानेही सशस्त्र दलांना पाठिंबा दर्शवला आणि नागरिकांना या कठीण काळात जबाबदारीने वागण्याचे आणि देशाच्या रक्षकांसोबत एकजूट राहण्याचे आवाहन केले. एकता व्यक्त करताना भारताचे माजी क्रिकेटपटू प्रज्ञान ओझा, हरभजन सिंग आणि कृष्णमाचारी श्रीकांत यांनी भारतीय सैन्याबद्दल कृतज्ञता आणि समर्थनाचे संदेश देखील पोस्ट केले. ◀(वृत्तसंस्था)

# तणावामुळे आयपीएल आठवड्यासाठी स्थगित

**नवी दिल्ली, ९ मे -**

भारत आणि पाकिस्तानमधील लष्करी तणाव वाढल्यानंतर इंडियन प्रीमियर लीग (आयपीएल) २०२५ एका आठवड्यासाठी स्थगित करण्यात आली आहे. संबंधित अधिकारी आणि भागधारकांशी सल्लामसलत करून परिस्थितीचे व्यापक मूल्यांकन केल्यानंतर स्पर्धेचे नवीन वेळापत्रक आणि ठिकाणांबाबतची माहिती एका आठवड्यानंतर योग्य वेळी जाहीर केले जातील, असे बीसीसीआयच्या मीडिया सल्लागारांनी म्हटले आहे.




धर्मशाळा येथे गुरुवारी पंजाब किंग्ज व दिल्ली कॅपिटल्स यांच्यातील सामना महत्त्वपूर्ण तांत्रिक बिघाडामुळे मध्यंतरी रद्द करण्यात आल्यानंतर ही घोषणा करण्यात आली आहे. भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने (बीसीसीआय) चालू टाटा आयपीएल २०२५ चे उर्वरित सामने तत्काळ एका आठवड्यासाठी स्थगित करण्याचा निर्णय घेतला आहे.

बहुतेक फ्रॅन्चायझींनी आपल्या खेळाडूंच्या चिंता आणि भावना व्यक्त केल्यानंतर व प्रसारक, प्रायोजक तसेच चाहत्यांच्या मतांनंतर सर्व प्रमुख भागधारकांशी योग्य सल्लामसलत केल्यानंतर आयपीएल गव्हर्निंग कौन्सिलने हा निर्णय घेतला आहे. बीसीसीआय आपल्या सशस्त्र दलांच्या ताकद आणि तयारीवर पूर्ण विश्वास ठेवत असताना, बोर्डाने सर्व भागधारकांच्या सामूहिक हितासाठी कार्य करणे शहाणपणाचे मानले,'' असे निवेदनात पुढे म्हटले आहे. धर्मशाळा येथे पंजाब किंग्ज आणि दिल्ली कॅपिटल्स यांच्यात सामना सुरू होता, केवळ दहा षटके खेळली होती तेव्हा अचानक फ्लडलाइट्स बंद झाले. सुरुवातीला असे वाटत होते की लाईट्समध्ये काही तांत्रिक समस्या आहे, त्यामुळे काही वेळात सामना सुरू होईल, परंतु नंतर कळले की तो रद्द करण्यात आला आहे. यानंतर, शुक्रवारी त्याची स्थगिती अधिकृतपणे जाहीर करण्यात आली. शुक्रवारी सकाळी बीसीसीआयने आयपीएल सध्यासाठी पुढे ढकलल्याची घोषणा केली. बीसीसीआय पुढील आठवड्यात एक आढावा बैठक घेणार आहे. त्या काळात परिस्थितीचा आढावा घेतला जाईल. यानंतर पुढील रणनीती ठरवली जाईल. म्हणजे जर भारत आणि पाकिस्तानमधील सध्याचा तणाव एका आठवड्यात कमी झाला तर आयपीएलचे सामने सुरू होतील.

## महत्त्वाचे

### नीरज चोप्रा क्लासिक पुढे ढकलली

**बंगळुरू** : आगामी २४ मे रोजी बंगळुरू येथील श्री कांतीरवा स्टेडियममध्ये होणारी नीरज चोप्रा क्लासिक स्पर्धा शुक्रवारी पुढील सूचना मिळेपर्यंत पुढे ढकलण्यात आली आहे. खेळाडू, भागधारक आणि व्यापक समुदायाच्या हिताला सर्वोच्च प्राधान्य देऊन



काळजीपूर्वक विचार आणि सल्लामसलत केल्यानंतर हा निर्णय घेण्यात आल्याचे आयोजकांनी म्हटले आहे. आम्ही खेळाच्या एकात्मतेच्या शक्तीवर विश्वास ठेवतो. परंतु, या महत्त्वाच्या क्षणी, राष्ट्रासोबत खंबीरपणे उभे राहणे सर्वात महत्त्वाचे आहे. या क्षणी आमचे सर्व कृतज्ञता आणि विचार केवळ आमच्या सशस्त्र दलांबद्दल आहेत, जे आमच्या राष्ट्रासाठी आघाडीवर आहेत, असे जागतिक ॲथ्लेटिक्स गोल्ड लेबल स्पर्धेच्या आयोजन समितीने दिलेल्या निवेदनात म्हटले आहे. एनसी क्लासिकसाठी सुधारित वेळापत्रक योग्य वेळी जाहीर केले जाणार आहे.

### कबड्डीत महाराष्ट्राला रौप्यपदक

**राजबीर** : हरयाणाने कबड्डीतील हुकुमत कायम राखत सातव्या खेलो इंडिया युवा क्रीडा स्पर्धेत महाराष्ट्राला नमवित सुवर्णपदक पटकावले. ३९-२८ गुणांनी हरयाणाने बाजी मारली. राजबीर क्रीडा संकुलात विजयाचा चौकार झळकवित महाराष्ट्राने अंतिम फेरीत मजल मारली होती. अपेक्षेप्रमाणे अंतिम मुकाबला बलाढ्य हरयाणाविरूध्द महाराष्ट्राच्या कबड्डीपटूंनी चिवट झुंज दिली. पहिल्या फेरीत २२ -१७ गुणांनी महाराष्ट्राने आक्रमण करीत आपले आव्हान कायम राखले होते. उत्तरार्धात हरयाणाच्या यशस्वी चढ्या आणि बचावात अपयश आल्याने महाराष्ट्राची पिछेहाट होत राहिली. लोणमुळे पिछाडी वाढत गेल्याने मनोबल खचलेल्या महाराष्ट्राला रौप्य पदकावर समाधान मानावे लागले. गतवेळी कांस्य पदक संपादन केले होते.

### सबालेन्का, केनिन पुढील फेरीत



**रोम** : इटालियन ओपन २०२५ टेनिस स्पर्धेत बेलारूसच्या आर्यना सबालेन्काने पोटापोवाला सरळ सेटमध्ये हरवले. आता पुढील फेरीत तिची लढत सोफिया केनिनशी होणार आहे. २७ वर्षीय सबालेन्काने मियामी आणि माद्रिदमध्ये १००० मालिका विजयांसह गत चार स्पर्धांमध्ये अंतिम फेरी गाठली आहे. शुक्रवारी झालेल्या सामन्यात आर्यना सबालेन्काने ॲनास्तासिया पोटापोवाला हरवून इटालियन ओपनच्या तिसऱ्या फेरीत प्रवेश केला. गत वर्षी पराभूत झालेल्या अंतिम फेरीत आणि सध्याच्या जागतिक क्रमवारीत पहिल्या स्थानावर असलेल्या सबालेन्काने फोरो इटालिको येथे एका तासाहून अधिक वेळात रशियन पोटापोवाला हरवले. अमेरिकेच्या सोफियाने आणखी एका रशियन खेळाडू ॲनास्तासिया पावल्युचेन्कोवाला ६-३, ६-० असे सरळ सेटमध्ये हरवले. पुरुषांच्या स्पर्धेत कार्लोस अल्काराझने पहिल्या रोम जेतेपदासाठी आपला प्रयत्न सुरू केला आहे. त्याचा सामना तिसरा मानांकित खेळाडू सर्बियन पात्रताधारक दुसान लाजोविचशी सेंटर कोर्टवर होणार आहे.



# एनजी, भंडारी, मॉडेल व गॅरी कर्स्टन संघाचे विजय

**आत्मन आर्यन १४ वर्षाखालील क्रिकेट स्पर्धा**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ९ मे-**

आत्मन आर्यन १४वर्षांखालील क्रिकेट स्पर्धेत एनजी अकॅडमी, भंडारी स्पोर्टस, मॉडेल अकॅडमी आणि गॅरी कर्स्टन या संघांनी विजय मिळविले.

सुयश गुरुकुल येथे सुरू झालेल्या या स्पर्धेचे उद्घाटन आत्मन आर्यन अकॅडमीचे मॅनेजर अनिकेत यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी अक्षय हावळे, प्रसाद शावंतूल आदी उपस्थित होते. पंच म्हणून अशोक डोंबाळे, अनिल सलगर व किरण डिग्गे यांनी काम पाहिले.

**संक्षिप्त धावफलक**

**गॅरी कर्स्टन** : २८ षटकात सर्व बाद ९९ (निमिष कलेलं २८, अथर्व पाटील ५-१४) पराभूत विरुद्ध **एनजी अकॅडमी** : १९.३ षटकांत ३ बाद १०२ (विहन येवंकर ५०, तनय वाघमारे २-१४).

**आर्यन अकादमी** : २१ षटकांत सर्व बाद ७२ ( ओम केसकर १८, तनिष्क मेटी. ३-११) पराभूत विरुद्ध **भंडारी स्पोर्ट्स** : ११ षटकांत ७ बाद ७७( नरेन भोगे १५, सुनिल जाधव ४-३५).

**मॉडेल अकॅडमी** : २६ षटकात ७ बाद १९९ ( झेद शेख ६०, संस्कार गवळी ४४, श्रीराज गवळी २-४१) वि. वि. **युनायटेड** : ७ बाद १७७ (श्रीराज गवळी ७४, आयुष भोसले ३-३४, गौरव गाडेकर २-२४).

**गॅरी कर्स्टन** : ३० षटकांत ६ बाद २६० ( अप्पू स्वामी ४९, ओम साई ४७, संभू २-५३) वि. वि. **पीएसए इंदापूर** : २७ षटकांत सर्व बाद १२४ ( वरुण ५३, वंशी सबन २-२४, निमिष कलेल २-१६)

# सोलापूर स्पोर्टस् व मॉडेल अकादमीत आज अंतिम लढत




**उदगीरी करंडक १४ वर्षांखालील क्रिकेट**

**सोलापूर, दि. ९ मे-**

सोलापूर स्पोर्टस् व मॉडेल अकादमीने उदगीरी चषक १४ वर्षांखालील क्रिकेट स्पर्धेच्या अंतिम फेरीत प्रवेश केला.

मास्टर्स क्रिकेट अकादमीने आयोजित केलेली ही स्पर्धा येथील दयानंद महाविद्यालयाच्या मैदानावर सुरू आहे. अंतिम लढत शनिवारी होईल. उपांत्य सामन्यात सोलापूर स्पोर्टस्ने नीलेश गायकवाड क्रिकेट अकादमीवर ५ गडी राखून विजय मिळविला. नाबाद ४९ धावा फटकाविणारा गोंविदराज पुंजाल सामन्याचा मानकरी ठरला. दुसऱ्या उपांत्य सामन्यात मॉडेल क्रिकेट अकादमीने मास्टर्स अकादमीवर २५ धावांनी मात केली. ७ धावांत ३ बळी टिपणारा अभिषेख देशमुख सामनावीर ठरला.

सामनावीर पुंजाल व देशमुख यांना नितेश धुळम व शेख यांच्या हस्ते गौरविण्यात आले. यावेळी चंद्रशेखर उदगिरी व राजवर्धन जिल्ला उपस्थित होते. उपांत्य सामन्यासाठी पंच म्हणून चिराग शहा, नबीलाल पटेल व मोहसिन मुल्ला यांनी काम पाहिले.

**संक्षिप्त धावफलक**

**एनजीसीए** : ३० षटकात ५ बाद १८०( रूगवेद पाटील ५१, विहान येवानकर ८०, ओम स्वामी २-२४) पराभूत विरुद्ध **सोलापूर स्पोर्टस्** : २९.१ षटकात ५ बाद १८४ (अप्पु स्वामी ६०, गोंविदराज पुंजाल नाबाद ४९, अर्थव पाटील २-२८)

**मॉडेल अकादमी** : २८ षटकात ९ बाद १३१ (अभिया पटेल २४, नितेकेश गज्जम ३-२२, निरवीक बनसोडे २-२१) वि.वि. **मास्टर्स अकादमी** : २५.५ षटकात सर्वबाद १०६ (नीतिकेश गज्जम ३१, अभिषेक देशमुख ३-७, तनिष्का मेटी २-२५

# ऋतुजा मळगे उत्कृष्ट प्रशिक्षणार्थी

**ओकिनावा ट्रॅडिशनल कराटे अकॅडमीचे लष्करी शिबिर**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ९ मे-**

ओकिनावा ट्रॅडिशनल कराटे अकॅडमी इंडिया तर्फे कर्णिक नगर व पद्मा नगर येथे झालेल्या २५व्या ज्युनियर कमांडो ट्रेनिंग कॅम्पमध्ये ऋतूजा तुकाराम मळगे हिने उत्कृष्ट प्रशिक्षणार्थी म्हणून प्रथम क्रमांकांची ट्रॉफी पटकाविली. धानेश दौलप्पा बिराजदार हा द्वितीय तर समर्थ राजशेखर माळी हा तृतीय आला.

या शिबिराचा समारोप कार्यक्रम इनरव्हील क्लब ऑफ सोलापूरच्या अध्यक्षा व उद्योजिका कल्पना दरगड तसेच विराज फिटनेस क्लबचे संचालक स्वज्वल राऊळ यांच्या उपस्थितीत पार पडला यावेळी ओंकार साखरे, शिवप्रिया येलदी व सुयश सुळे, प्रतीक्षा सुनकारे यांनी शिबिरातील प्रशिक्षणाबाबत आपले मनोगत व्यक्त केले.



दररोज सलग १२ तास चालणाऱ्या या शिबिरात कराटे, ज्यूदो, सेल्फ डिफेन्स, जिम्नॅस्टिक, योगासने, ध्यान-प्राणायाम, हॉर्सरायडिंग, लाठीकाठी, नानचाकू, विविध अडथळा पार करणे, परेड, नेमबाजी, रोप व रॉक क्लायम्बिंग, रिव्हर क्रॉसिंग, बौद्धिके आदींचे शौर्याचे प्रशिक्षण देण्यात आले.

सर्वांना मुख्य प्रशिक्षिका आंतरराष्ट्रीय पंच शिहान अनुराधा महादेव थोरात (ब्लॅक बेल्ट फिफ्थ डिग्री ), सोनिया सतीशकुमार थोरात, गायत्री घाडगे, सुजीत बिराजदार, विनायक व निशा गायकवाड, वीर सुरा, प्रतीक्षा सुनकारे यांचे मार्गदर्शन लाभले.

# बास्केटबॉल प्रशिक्षण शिबिराचा समारोप

**भारतीय महिला कोच अर्निका गुजर यांचे मिळाले तंत्रशुद्ध प्रशिक्षण**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ९ मे-**

सोलापूर शहर व जिल्हा बास्केटबॉल असोसिएशनच्या ॲडव्हान्स प्रशिक्षण शिबिराचा समारोप खासदार प्रणिती शिंदे यांच्या हस्ते झाला. यावेळी सोलापूर शहर व जिल्हा बास्केटबॉल असोसिएशनचे अध्यक्ष के.डी पाटील, सचिव साकिब शेख, खजिनदार दिनेश सारंगी, प्रा. डॉ. नरेंद्र काटिकर, प्रार्थना बिज्जरगी, अभिजीत टाकळीकर, मुजाहिद पिरजादे, तस्लिमा शेख आदी उपस्थित होते. होम मैदान व सेलिब्रेशन स्पोर्ट अकॅडमी सिंधू विहार विजापूर रोड सोलापूर येथे हे प्रशिक्षण शिबिर भारताची पहिली फिबा इन्स्ट्रक्चर व भारतीय महिला कोच अर्निका गुजर यांच्या मार्गदर्शनाखाली झाले.




प्रशिक्षण आत्मसात करून यश संपादन करा : खासदार प्रणिती शिंदे

खेळाडूंना मार्गदर्शन करताना खासदार शिंदे म्हणाल्या, मुलींना बास्केटबॉल खेळण्यासाठी अवश्य पाठवा. यामुळे मुलींमध्ये सहकार्याची भावना खिलाडूवृत्ती निर्माण होते. दररोज असाच सराव चालू ठेवा. पुढील राज्य व राष्ट्रीय स्पर्धेत तुम्ही गुजर मॅडम यांनी शिकवलेल्या नवीन तंत्रांचा मॅन टू मॅन डिफेन्स, शूटिंग व ट्रिब्लिंगचा उपयोग करून यात यश संपादन करा. आपण सात दिवसात कौशल्य आत्मसात करण्याचे प्रयत्न केले आणि ते यशस्वी होतील.

# खो-खो स्पर्धेत महाराष्ट्राच्या मुलांचा धमाका, सलग सातवे सुवर्ण

**७ वी खेलो इंडिया युवा क्रीडा स्पर्धा : मुलींना रौप्य**

**तभा वृत्तसेवा,**
**गया (बिहार), दि. ९ मे-**

खेलो इंडिया युवा क्रीडा स्पर्धेतील खो-खो मध्ये महाराष्ट्राच्या खेळाडूंनी पुन्हा एकदा आपली ताकद सिद्ध करत देशभरात आपला ठसा उमटवला आहे.

गतविजेत्या महाराष्ट्राच्या मुलांनी सातव्यांदा सलग सुवर्ण पदक पटकावत इतिहासाची पुनरावृत्ती केली, तर मुलींच्या संघाला अंतिम फेरीत ओडिशाकडून पराभवाचा सामना करत रौप्य पदकावर समाधान मानावे लागले. दोन्ही सामन्यात महाराष्ट्राला ओडिशा बरोबर लढत द्यावी लागली होती.

या स्पर्धेत महाराष्ट्राच्या मुलांनी सलग ७ वे सुवर्णपदक मिळवत मैदानावर धमाका केला. तर महाराष्ट्राच्या मुलींनी या आधी पाच सुवर्ण पदक मिळवली होती तर हे दुसरे रौप्य पदक आहे.



**मुले : ओडीशावर वर्चस्व गाजवणारा विजय**

मुलांच्या विभागात महाराष्ट्राने ओडिशाला ३४-२५ असा ९ गुणांनी धुव्वा उडवत मैदानावर राज जाधवच्या कर्णधार पदाखाली वर्चस्व गाजवले. महाराष्ट्राच्या हारदया वसावे (२ मि. नाबाद संरक्षण व २ गुण), आशिष गौतम (१.४६ मि. संरक्षण व ६ गुण), राज जाधव (१.१४ मि. संरक्षण व २ गुण), शरद घाटगे (८ गुण) यांनी मैदान दणाणून सोडणार खेळ करत महाराष्ट्राला सलग ७ वे सुवर्ण पदक मिळवून दिले. तर पराभूत ओडिसातर्फे यशवंत यादव (१.०८, १.०१ मिनिटे संरक्षण व २ गुण), शगु सोयान (१.०८, १.२८ मि. संरक्षण व ४ गुण), सुमित पात्रा (१.५० मि. नाबाद संरक्षण व १० गुण), सुमित साहू (१.०९ मि. संरक्षण) दिलेली जोरदार लढत अपयशी ठरली.

**मुली : अंतिम सामन्यात चुरस, ओडिशाचा विजय**

मुलींच्या गटात महाराष्ट्र-ओडिशा हे दोन्ही संघ बलाढ्य असल्यामुळे अंतिम सामना चुरशीचा झाला. या सामन्यात ओडिशाने महाराष्ट्राला ४४-३१ असे ३ गुणांनी पराभूत केले व महाराष्ट्राला उपविजतेपदावर समाधान मानावे लागेल. या सामन्यामध्ये ओडिशा कडून अर्चना प्रधान (१.३० मि. नाबाद, २ मि. संरक्षण व २ गुण), स्मरणिका साहू (१.०२ , १.४७ मि. संरक्षण व १२ गुण), हरप्रिया भुयान (१.१३, १.१० मि. संरक्षण), के रमया (६ गुण) यांनी विजयात मोलाची कामगिरी केली. तर महाराष्ट्राकडून सुहानी धोत्रे (१, १ मि. संरक्षण व ८ गुण), अमृता पाटील (१.४० मि. संरक्षण व १२ गुण), प्रतिक्षा बिराजदार (१.०८, १.२० मि. संरक्षण), अश्विनी शिंदे (६ गुण) यांनी जोरदार लढत दिली होती. काही वेळेला महाराष्ट्र कि ओडिशा असा संभ्रम निर्माण झाला होता पण अखेर ओडिशाने विजयश्री खेचून नेली.

**शाब्बास महाराष्ट्र!**

या विजयासह महाराष्ट्राच्या मुलांनी सलग सातव्या सुवर्ण पदकावर नाव कोरले आहे. हे केवळ एक पदक नव्हे तर राज्याच्या खो-खो परंपरेचा अभिमान आहे. महाराष्ट्राच्या मुलींसाठी हे दुसरे रौप्य असून त्यांनी याआधी पाच सुवर्ण पदकांची कमाई केली आहे. खो-खोच्या मैदानावर महाराष्ट्राने पुन्हा एकदा सिद्ध केले की, क्रीडा कौशल्य, चिकाटी आणि संघभावना यांच्या जोरावर सातत्याने यश मिळवता येते. या यशामागे प्रशिक्षक, खेळाडू, संघटन आणि राज्य क्रीडा यंत्रणेचे अविरत परिश्रम आहेत.

## महत्वाचे...



### स्वामीकृपेचा ध्यास घेवून अक्कलकोटी आलोय : डीसीपी माकनीकर

**अक्कलकोट, दि. ९ मे-**

केवळ भाग्यवंतांनाच स्वामी दर्शनाचा लाभ मिळतो याची प्रचिती स्वामी दर्शनाचा लाभ मिळालेल्या भाग्यवान स्वामी भक्तांना येते याची आपणाला माहिती मिळाली आहे. या अनुशंगाने स्वामीकृपेचा ध्यास घेवून अक्कलकोटी आलो असल्याचे प्रतिपादन नागपूरचे डीसीपी राहुल माकनीकर यांनी केले. ते नुकतेच येथील श्री वटवृक्ष स्वामी महाराज मंदिरास सहकुटुंब भेट देऊन श्री स्वामी समर्थांचे दर्शन घेतले. यावेळी मंदिर समितीच्या वतीने समितीचे चेअरमन व नगरसेवक महेश इंगळे यांनी डीसीपी राहुल माकनीकर यांचा सन्मान केला. यावेळी भाविकांच्या स्वामी दर्शन अनुभूतीबद्दल बोलताना डीसीपी राहुल माकनीकर यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या. यावेळी मंदीर समितीचे सचिव आत्माराम घाणे, विश्वस्त महेश गोगी, योगेश धर्मा अधिकारी, विलास कलकर्णी, संजय पवार, गिरीश पवार, विपल जाधव, श्रीकांत मलवे, श्रीशैल गवंडी, संजय पाटील, देवस्थानचे सेवेकरी उपस्थित होते.



### गणपती फार्मसीमध्ये एकदिवसीय कार्यशाळा

**टेंभुर्णी, दि.९ मे-**

श्री गणपती इन्स्टिट्यूट ऑफ फार्मास्युटिकल सायन्सेस अँड रिसर्च, अकोले खुर्द, टेंभुर्णी येथे फार्मास्युटिकल उद्योगातील डेटा इंटिग्रिटी आणि अल्कोवा तत्त्वे या विषयावर एकदिवसीय कार्यशाळा झाली. सिप्ला, गोवा येथील सहाय्यक व्यवस्थापक (उत्पादन) बालाजी ढोरे यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या या कार्यशाळेत महाविद्यालयातील तृतीय व अंतिम वर्षाच्या बी.फार्म विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. फार्मास्युटिकल उद्योगातील नियमन, गुणवत्ता नियंत्रण आणि डेटा व्यवस्थापनाची मूलभूत तत्त्वे समजावून घेणे. यूएसएफडीए, वर्ल्ड हेल्थ ऑर्गनायझेशन या आंतरराष्ट्रीय नियामक संस्थांच्या मानदंडांनुसार डेटा रेकॉर्डिंगचे महत्त्व पटवून देणे हे या कार्यशाळेचे उद्दिष्ट होते. श्री. ढोरे यांनी डेटा इंटिग्रिटी सुनिश्चित करणाऱ्या अल्कोवा तत्त्वांचा तपशीलवार परिचय करून दिला. प्रश्नोत्तर सत्रात विद्यार्थ्यांनी डेटा फेरफार, लॅबमधील सुरक्षा उपाययोजना आणि ऑडिट ट्रायल भूमिकेवर प्रश्न विचारले. यावेळी प्राचार्या डॉ. रुपाली बेंदगुडे यांनी मुलांना सर्व स्किल्स मुलानी शिक्षण घेताना विद्यार्थ्यांना इंडस्ट्री- एकडेमिक् गॅप भरून काढण्यास मदत होणार असल्याचे सांगितले. यावेळी सचिव डॉ. आर. डी. बेंदगुडे, अध्यक्ष अँड. विजयराव हिरवे, उपाध्यक्ष बाबा येडगे, डॉ. प्रशांत मिसाळ, समन्वयक प्रा. नामदेव शिंदे, प्रा. शिवराज ढगे, प्रा. शैलेश पेंडोर आदी उपस्थित होते.

### युद्ध परिस्थितीत सर्व कीर्तनकारांनी देशाबरोबर राहावे : सुधाकर महाराज इंगळे

**सोलापूर, दि. ९ मे-**

सध्या भारत देश हा युद्धाच्या उंबरठयावर आहे. अशा संकट समयी सर्वांनी देशाबरोबर राहणं हे खूप महत्वाचे आहे. याप्रसंगी देश हितासाठी जो निर्णय घेतला असेल तो सर्वांनी स्वीकारून त्या निर्णया बरोबर राहिले पाहिजे. देश सुरक्षित असेल तरच आपण सुरक्षित राहू शकतो. राष्ट्रहित हेच स्वहित असल्यामुळे सर्व कीर्तनकार, प्रवचनकार, महाराज यांनी आपापल्या कीर्तनातून सद्यस्थिती व देशप्रेम याविषयी दररोज जागृती करावी, प्रबोधन करावे असे आवाहन अ.भा. वारकरी मंडळाचे राष्ट्रीय अध्यक्ष सुधाकर महाराज इंगळे यांनी केले आहे. '' धर्मांचे पालन करणे पाखांड खंडण '' या न्यायाने धर्म, देश सांभाळून जागर आवश्यक आहे. कीर्तन हे प्रबोधनाचे माध्यम आहे. त्याचा उपयोग देशासाठी करणे काळाची गरज आहे. महाराज व कीर्तनकार यांचेवर भाविकांचा असलेला विश्वास देश प्रेमामध्ये परावर्तीत करावयाचा आहे. या माध्यमातून तरी अल्पशी देशसेवा करता येणार असल्याचे सुधाकर महाराज इंगळे यांनी ऑनलाईनने घेतलेल्या मंडळाच्या बैठकीत व्यक्त केले. शिवारायांच्या काळात स्वराज्य प्रेम व जागृती करताना कीर्तन हे माध्यम उपयोगात आले होते. सैनिक आपली जबाबदारी खूप चांगली पार पाडत आहेत. आपण ही या प्रसंगी देश अंतर्गत शांतता राहावी यासाठी प्रयत्न करणे महत्वाचे आहे.



## निधन वृत्त...

### भिकू राऊत

**माढा, दि. ९ मे-**



माढा येथील सेवानिवृत्त वरीष्ठ लिपिक भिकू शंकर राऊत (वय ७५) यांचे गुरुवार दि. ८ रोजी हृदयविकाराच्या धक्क्याने निधन झाले. स्वातंत्र्य पूर्व काळातील सहकार महर्षी गणपतराव साठे जिल्हा परिषद प्रशाला येथे त्यांनी ३३ वर्षे वरीष्ठ लिपिक म्हणून कार्य केले. त्यांच्या पश्चात दोन मुले, तीन मुली, सुना, नातवंडे असा मोठा परिवार आहे.

### शिवम्मा माशाळे

**अक्कलकोट, दि ९ मे**



श्रीराम नगर जेऊर रोड येथील शिवम्मा दत्तात्रय माशाळे (वय ७०) यांचे अल्पशा आजाराने निधन झाले आहे. त्यांच्या पश्चात पती, दोन मुले, एक मुलगी, सुना नातवंडा असा परिवार आहे.

# ‘आयटीआयच्या’ हजारो विद्यार्थ्यांना आपत्ती व्यवस्थापनाचे धडे

- सीमेवरील तणावाच्या पार्श्वभूमीवर राज्यातल्या सर्वच आयटीआयमध्ये ऑनलाईनद्वारे आपत्ती व्यवस्थापनाच्या कार्यशाळा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.९ मे-**



जम्मू आणि काश्मीर येथील पहलगाम इथे दहशतवादी हल्ल्यानंतर भारत आणि पाकिस्तान सीमेवर सध्या तणावाचे वातावरण आहे. पार्श्वभूमीवर कौशल्य विभाग आणि अनिरुद्धाज अॅकॅडमी ऑफ डिझास्टर मॅनेजमेंट यांच्या संयुक्त विद्यमाने राज्यातील हजारो विद्यार्थ्यांना आपत्ती व्यवस्थापनाचे धडे देण्यात येत आहेत.

कौशल्य विकास मंत्री मंगलप्रभात लोढा यांच्या हस्ते ठाणे येथील राजमाता जिजाऊ औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत आज या शिबिराचे उद्घाटन करण्यात आले. राज्यातल्या सर्व औद्योगिक प्रशिक्षण केंद्रात ऑनलाईनद्वारे आपत्ती व्यवस्थापनाच्या कार्यशाळा होणार आहेत. या कार्यक्रमात कौशल्य विकास मंत्री मंगलप्रभात लोढा म्हणाले की, आपत्ती व्यवस्थापन ही काळाची गरज आहे. आपत्ती मानव निर्मित असो किंवा नैसर्गिक असो, याचे व्यवस्थापन आणि बचाव कसा करावा, याचे प्रशिक्षण प्रत्येक नागरिकांनी घेतले पाहिजे. मानवाने प्रगती केली असली तरी, आपत्तीचे स्वरूप ही त्यानुसार बदलले असून बचावाचे प्रशिक्षण नव्या पिढीला देण्याचा आमचा उद्देश असल्याचे लोढा म्हणाले. त्याचबरोबर या कार्यक्रमात मंत्री मंगलप्रभात लोढा यांनी आयटी आयमध्ये सहा नव्या अभ्यासक्रमाची यावेळी घोषणा केली. यात कृत्रिम बुद्धिमत्ता (ख), ई व्ही इलेक्ट्रिक वाहन व्यवस्थापन, इंडस्ट्रिअल रोबोटिक्स आणि थ्री डी प्रिंटिंग, ड्रोन तंत्रज्ञान, सोलर टेक्निशियन या अभ्यासक्रमांचा यात समावेश असून येत्या शैक्षणिक वर्षापासूनच याची सुरवात होणार आहे. दोन दिवसीय शिबिरात अनिरुद्धाज अॅकॅडमी ऑफ डिझास्टर मॅनेजमेंटचे मुख्य कार्यकारी अधिकारी सुनील मंत्री यांचे विद्यार्थ्यांना यावेळी मार्गदर्शन लाभले. तर राज्याचे माजी पोलीस महासंचालक प्रवीण दीक्षित यांनी राज्यातील आयटीआय विद्यार्थ्यांची नागरी संरक्षण या विषयावर ऑनलाईन कार्यशाळा घेतली. राजमाता जिजाऊ औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतल्या शिबिराच्या सुरुवातीला डॉ.लीना गडकरी यांनी आपत्ती व्यवस्थापन संकल्पना नेमकी काय हे विद्यार्थ्यांना सांगितले. या शिबिरात बचाव आणि मदतकार्याचे प्रशिक्षण देण्यात येणार आहे. मानव निर्मित आपत्ती यात युद्धाचा समावेश असून घ्यायची काळजी, बचाव यावरही विद्यार्थ्यांना माहिती देण्यात आली. तसेच मंत्री मंगलप्रभात लोढा यांच्या उपस्थितीत बचावाची प्रात्यक्षिके विद्यार्थिनींनी सादर केली. राजमाता जिजाऊ औद्योगिक प्रशिक्षण संस्थेच्या प्राचार्य एस. एस. माने यांनी यावेळी उपस्थितांचे आभार व्यक्त केले.

## पंढरपूर नगरपरिषदेचा आरोग्य कर आणि पार्किंग वसुलीचा ठेका रद्द

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. ९ मे -**

पंढरपूर नगर परिषदेव्यावतीने आरोग्य व्यवस्था कर व पार्किंग कर वसुलीचा ठेका रद्द करण्यात आल्याची माहिती पालिकेचे उपमुख्याधिकारी सुनील वाळुजकर यांनी दिली. या संदर्भातील माहिती नागरिकांना व्हावी यासाठी पालिकेच्या वतीने समाज माध्यमांवर देखील एक पत्रक प्रसिद्धीस दिले आहे.

या बाबत माहिती देताना पालिकेचे उपमुख्याधिकारी वाळुजकर यांनी सांगितले की, पंढरपूर शहरातील आरोग्य व्यवस्था कर व पार्किंग कर वसुली करिता निर्माला ऑटो केअर सेंटर अ.नगर या कंपनीला ठेका देण्यात आलेला होता. मात्र ५ मे २०२५ रोजी संध्याकाळी शहरातील गजानन महाराज मठ मागील रस्त्यावर कंपनीमार्फत नियुक्त कर्मचारी यांच्याकडून नाशिक विभागातील भाविक पंढरपूर मध्ये दर्शनासाठी आलेले असताना त्या भाविकांशी गैरवर्तन केल्याचे फेसबुकवर लाईव्ह व्हिडिओ प्रसारित झाला होता. त्याची गांभिर्याने दखल घेत नगर परिषदेने निर्मला ऑटो केअर सेंटर अहमदनगर यांचा आरोग्य व्यवस्था कर व पार्किंग कर वसुलीचा ठेका ८ मे पासून रद्द केला आहे.

> **यापुढे आरोग्य कर व पार्किंग कर देवू नये**
>
> पंढरपूरात आल्यानंतर यापुढे कोणत्याही व्यक्तीस आरोग्य व्यवस्था कर व पार्किंग कर देऊ नये तसे निदर्शनास आल्यास त्वरित नगर परिषदेशी संपर्क साधावा असे देखील आवाहन पालिकेच्या वतीने उपमुख्याधिकारी सुनील वाळुजकर यांनी केले आहे.

## लक्ष्मण खरात यांचा सेवापूर्ती निमित्त सत्कार

**तभा वृत्तसेवा,**
**सदाशिवनगर, दि. ९ मे-**



रेडे जिल्हा परिषद प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक लक्ष्मण खरात यांचा सेवापूर्ती निमित्त सन्मान सोहळा अकलूज येथील कृष्णप्रिया हॉल येथे नुकताच पार पडला.

यावेळी प्राथमिक जि.प.चे शिक्षणाधिकारी कादर शेख, बारामतीचे गटशिक्षणाधिकारी निलेश गवळी, कवठे महाकाळचे गटशिक्षणाधिकारी प्रमोद गोफणे, माळशिरसचे गटशिक्षणाधिकारी धनंजय देशमुख, विस्तारधिकारी महालिंग नकाते, विस्तारधिकारी सुषमा महामुनी, उज्वला नकाते, संजय रुईकर, केंद्रप्रमुख बापू हाके, साहेबराव देशमुख, बाळासाहेब वाघमोडे, सरपंच, आप्पासाहेब शेंडगे, आनंद शेंडगे उपसरपंच व तालुक्यातील प्राथमिक शिक्षक यांची प्रमुख उपस्थिती होती. खरात यांनी ३७ वर्ष पवित्र अशा शिक्षण क्षेत्रात सेवा करून निवृत्त झाले. त्यांनी शिक्षक, प्रभारी केंद्रप्रमुख, मुख्याध्यापक म्हणून उत्कृष्ट काम केले. त्यांनी सुरुवातीची काही वर्ष शिक्षक म्हणून मोटेवस्ती, इस्लामपूर, तिरवंडी या गावामध्ये शिक्षक म्हणून सेवा केली. रेडे येथे मुख्याध्यापक म्हणून त्यांनी या शाळेत ठसा उमटवला. शाळेत आल्यानंतर शाळेचे संपूर्ण रंगरंगोटी, डिजिटल वर्ग, भौतिक सुविधा, विद्यार्थी गुणवत्ता विकास करून शाळा नावारुपास आणली. सेवापूर्ती सोहळ्या निमित्ताने शिक्षक मित्र परिवाराने खरात यांचा सपत्नीक सन्मान केला. प्रास्ताविक गटशिक्षणाधिकारी अजिंक्य खरात यांनी केले. सूत्रसंचालन मुख्याध्यापक राजाराम गुजर, सुहास उरवणे यांनी केले तर आभार नवनाथ खरात यांनी मानले.

## राजा अंबरीशाच्या भक्तीमुळे बार्शीचे अद्वितीय महात्म्य

### डॉ. जयवंत महाराज बोधले यांचे प्रतिपादन

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. ९ मे-**




नारायण म्हटल्यानंतर भक्त प्रल्हादाचा धावा ऐकून भगवान नरसिंह क्षणार्धात धावून गेले, राजा अंबरीशाने सुद्धा भक्त प्रल्हादाचीच भक्ती परंपरा पुढे नेली, त्यामुळे बार्शी हे श्री भगवंताने राजा अंबरीशासाठी अवतार घेतल्यामुळे अजरामर महत्त्व लाभलेले तीर्थक्षेत्र असून बार्शीचे अद्वितीय पौराणिक महत्त्व आहे, असे प्रतिपादन प्रवचनकार डॉ. जयवंत महाराज बोधले यांनी केले.

बार्शीचे नगरदैवत श्री भगवंत देवस्थानमध्ये शुक्रवारी पहाटे श्री भगवंत जयंती सोहळ्यात ते कीर्तन करत होते. यावेळी बार्शी तालुक्यातील हजारो भाविक उपस्थित होते. यावेळी डॉ. बोधले म्हणाले, श्री भगवंताने दशावतार घेतले पण प्रत्येक अवतारानंतर श्री भगवंत बार्शीमध्ये वास्तव्यास राहिले. हे बार्शीचे मोठे संचित आहे. भगवंत बरोबरच राजा अंबरीशामुळे ही महान नगरी भक्तीच्या श्रेष्ठत्वाचा महिमा पिढ्यानपिढ्या सांगत राहणार आहे. यावेळी डॉ. बोधले यांनी श्री भगवंत अवतारापासून संत परंपरेपर्यंत अनेक धार्मिक बाबींवर उद्बोधक विवेचन केले.

यावेळी श्री भगवंत देवस्थान समितीचे अध्यक्ष दिलीप बुडुख, मुकुंद कुलकर्णी, नाना सुरवसे, जुगलकिशोर सोमाणी, डॉ. बी वाय यादव, सोमनाथ ढगे आदी मान्यवर उपस्थित होते.

## मंद्रूपमध्ये विजेचा लपंडाव

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर दि. ९ मे**



मंद्रूपमधये वीज कर्मचाऱ्यांच्या हलगर्जीपणामुळे सतत वीजेचा लपंडाव सूरू आहे. वीज कर्मचा-यांवर प्रभारी अधिका-यांचा वचक नसल्याने कर्मचा-यांची मनमानी सूरू आहे. ग्रामपंचायत पदाधिका-यांनी तक्रार करूनही दखल घेतली जात नसल्याने संताप व्यक्त करण्यात येत आहे.

मंद्रूपमधये वीज वितरण कार्यालय असूनही सतत वीज पुरवठा खंडीत होत आहे. सध्या उन्हाळा असल्याने उकाड्यापासून आराम मिळण्यासाठी कुलर, पंखा यासाठी वीजेची आवश्यकता असताना कर्मचा-यांकडून सतत वीज खंडीत करण्यात येत आहे. त्यामुळे अबालवृद्धांना त्रास सहन करावा लागत आहे. दिवसभर उन्हाची तीव्रता अधिक असताना वीजपुरवठा खंडीत केल्याने नागरीकांना त्रास होत आहे. मंद्रूपचे उपसरपंच भगवान व्हनमाने यांनी ग्रामपंचायत वीज दुरुस्तीबद्दल तक्रार करून महिना संपला तरी त्याची दखल घेण्यात आली नाही. उलट वीज कर्मचारी उद्धट बोलत असल्याचे सांगण्यात येते. एक वर्षापासून प्रभारी अधिकारी असल्याने कर्मचा-यांवर वचक राहीला नाही. एका वर्षात चार ते पाच प्रभारी अधिकारी बदलल्याने कर्मचा-यांची मनमानी सूरू आहे. वारंवार वीज खंडीत होण्यामुळे नागरीकांना त्रास होत आहे. म्हणून वरिष्ठ अधिका-यांनी कारवाई करण्याची मागणी होत आहे. तसेच मंद्रूप वीज वितरण कार्यालयाला कायमस्वरूपी अधिकारी नेमण्याची मागणी होत आहे.

> **एक महिन्यांपासून तक्रार**
>
> मंद्रूप ग्रामपंचायत वीज समस्या व दुरुस्तीबद्दल एक महिन्यांपासून पाठपुरावा सुरू आहे. मात्र वीज कर्मचारी दुरुस्ती करण्याऐवजी ग्राहकांशी उद्धट बोलतात. वरिष्ठांकडे तक्रार केल्यानंतर त्यांकडे दुर्लक्ष करण्यात येत आहे. त्यामुळे वीज ग्राहकांना त्रास सहन करावा लागत आहे. शिवाय वीज समस्यांचे निराकरण न केल्यामुळे गावात अंधाराचे साम्राज्य पसरले आहे. म्हणून वरिष्ठ अधिकाऱ्यांनी कारवाई करण्याची मागणी होत आहे.

## सोलापुरात 'प्रहार'चा १२ मे रोजी मेळावा अन पुरस्कार सोहळा

**तभा वृत्तसेवा,**
**टेंभुर्णी, दि.९ मे-**



प्रहार जनशक्ती पक्ष व प्रहार दिव्यांक्रांती संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने सोलापूर, लातूर, धाराशिव या तीन जिल्ह्यांचा संताजी धनाजी पुरस्कार वितरण सोहळा व कार्यकर्ता मेळावा १२ मे रोजी सोलापूर येथे निर्मिती लॉन विजापूर रोड या ठिकाणी होणार आहे.

या मेळाव्याच्या माध्यमातून पक्षाच्या कार्यात अमूल्य योगदान देणाऱ्या तळागाळातील कार्यकर्त्यांचा सन्मान करण्यात येणार आहे. तीन जिल्ह्यातून या मेळाव्यासाठी प्रहार जनशक्ती पक्ष तसेच प्रहार दिव्यांक्रांती संस्थेचे पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित राहणार आहेत. प्रहार जनशक्ती पक्षाचे संस्थापक अध्यक्ष माजी मंत्री बच्चुभाऊ कडू मेळाव्याला उपस्थित राहणार आहेत. प्रहार जनशक्ती पक्षाच्या संताजी धनाजी महाराष्ट्र प्रदेश मोहिमेचे प्रमुख पक्ष निरीक्षक महेश बडे व मंगेश ठाकरे, सोलापूर विभागाचे पक्ष निरीक्षक हे उपस्थित राहणार आसुन या दोघांच्या मार्गदर्शनात हा कार्यक्रम मोठ्या ताकतीने करू असे पक्षाचे जिल्हाध्यक्ष दत्ताभाऊ मस्के पाटील यांनी सांगितले. आगामी जिल्हा परिषद, पंचायत समिती, महानगरपालिका, नगरपालिका, नगरपरिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमिवर तसेच येणाऱ्या कर्जमाफी आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर या विभागीय मेळाव्याला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. मेळाव्यात शेतकरी कर्जमाफीसाठी २ जून रोजी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या बारामतीतील घरापासून ते नागपूर येथील मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या घरापर्यंत होणाऱ्या शेतकरी आत्मसन्मान आंदोलनाच्या पार्श्वभूमिवर भूमिका मांडली जाणार आहे. जिल्हाध्यक्ष दत्ताभाऊ मस्के पाटील यांनी सोलापूर लातूर धाराशिव या जिल्ह्यातील कार्यकर्ते, शेतकरी, युवक, दिव्यांग बांधव, विधवा महिला भगिनी यांनी उपस्थित राहण्याचे आवाहन केले आहे.

## बार्शीतील खेळाडूंची ४७ पदकांची कमाई




### राष्ट्रीय म्युझिकल चेअर व स्केटिंग स्पर्धा

**बार्शी, दि.९ मे -**

गोवा येथे झालेल्या १६व्या राष्ट्रीय म्युझिकल चेअर व स्केटिंग चॅम्पियनशिप स्पर्धेत बार्शीतील खेळाडूंनी म्युझिकल चेअर स्केटिंगसह, म्युझिकल चेअर, फ्री स्टाईल व स्पीड रेसिंग या चार प्रकारात उल्लेखनीय कामगिरी केली. महाराष्ट्राकडून प्रतिनिधित्व करताना ४७ पदकांची कमाई त्यांनी प्रथम क्रमांकाची ट्रॉफी पटकाविली. या खेळाडूंना श्रीशा स्केटिंग क्लब बार्शीच्या प्रियंका येडलवार यांचे मार्गदर्शन लाभले.

**कामगिरी केलेले खेळाडू :** अनन्या कुलकर्णी (२ सुवर्ण, १ रौप्य, १ कांस्य), इशिता बनाळे (२ सुवर्ण, २ रौप्य), स्वरूप पोळ (२ सुवर्ण, २ कांस्य) अर्णव कुलकर्णी (४ सुवर्ण), अथर्व केसकर (२ सुवर्ण, २ रौप्य), सर्वेश उदबाळे (१ रौप्य, २ कांस्य), शिवराज साळुंखे (१ सुवर्ण, १ रौप्य, २ कांस्य), सोहम सावंत (१ रौप्य, २ कांस्य), कार्तिकेय पवार (१ सुवर्ण, १ रौप्य), पृथ्वीराज जाधव (१ रौप्य, २ कांस्य), प्रसाद मांडे (२ सुवर्ण, २ रौप्य), श्रीशा येडलवार (४ सुवर्ण), कृष्णा ढाळे (२ सुवर्ण, २ रौप्य).

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्वाचे...



### दिगंबर जैन युवा संघातर्फे संघपतींचा सन्मान

**सोलापूर, दि. ९ मे-**

प.पू.अध्यात्मयोगी, चर्या शिरोमणी पट्टाचार्य श्री १०८ विशुद्धसागर महामुनीराज ससंघ मुंबई-जालना-इंदौर (५ मार्च ते २६ एप्रिल) मंगल विहार मनोभावे, तन, मन, धन अर्पण करुन, मुनी सेवा, धर्म प्रभावना करत सर्व संघाचा जवळपास ९०० किमी विहार सानंद पार पाडलेल्या सोलापूर नगरीतील गौरव मूर्ती, धर्मप्रेमी धमनुरागी तिन्ही संघपती प्रेरणा व राजकुमार दोशी, निशा व नूतन गांधी, योगिता व संतोष शहा यांचा सन्मान महावीर सांस्कृतिक भवन येथे श्री आदिनाथ महाराज दि. जैन मंदिर ट्रस्ट व सकल जैन समाजच्या वतीने सत्कार करण्यात आला. यावेळी दिगंबर जैन जागरण युवा संघाच्यावतीने सुद्धा तिन्ही संघपतींचा सन्मान करण्यात आला. याप्रसंगी जैन जागरणचे राष्ट्रीय संघटक मनीष शहा, महामंत्री बाहुबली शहा, मंत्री प्रशांत कोठाडिया, सुनील कुमुदचंद शहा, सांस्कृतिक मंत्री स्नेहा वनकुद्रे, कोषाध्यक्ष अमीचंद मेहता, सोनाली पालिया, नम्रता शहा, सुदर्शन वनकुद्रे, पल्लवी मेहता, कांचन मोहरे उपस्थित होते.




### रोटरीतर्फे रेडक्रॉस,थॅलेसेमिया दिन साजरा

**सोलापूर, दि. ९ मे-**

इंडियन रेडक्रॉस सोसायटी सोलापूर ब्रांच, रोटरी क्लब ऑफ सोलापूर व रोटरी रेडक्रॉस थॅलेसेमिया सेंटर यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक रेडक्रॉस दिवस व जागतिक थॅलेसेमिया दिवस विविध उपक्रमांनी साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाचे नेतृत्व चेअरमन डॉ. राजीव प्रधान, सचिव रो. जयेश पटेल, अध्यक्ष रो. सीए सुनील माहेश्वरी, डॉ. रो.ज्योती चिडगुपकर यांनी केले. रक्त संकलनासाठी गोपाबाई दमानी रक्त संकलन केंद्राचे थिटे, सुचिता, अभय कुलकर्णी, अंबलगी, तात्या, विठ्ठल व त्यांचा संपूर्ण स्टाफ यांनी उत्कृष्ट योगदान दिले. माजी संचालक केतन वोरा व डॉ. मंजरी कुलकर्णी यांची उपस्थिती होती. यावेळी ४० जणांनी रक्तदान केले. तसेच थॅलेसेमिया ग्रस्त मुलांना वाचनासाठी पुस्तके व खाऊचे वाटप करण्यात आले. यावेळी भावसार व्हिजन इंडिया सोलापूरचे पदाधिकारी उपस्थित होते. सोलापूर महानगरपालिकेच्या विवाह नोंदणी कार्यालयात जनजागृतीसाठी बोर्डचे अनावरण उपायुक्त आशिष लोकरे, डॉ. मंजरी कुलकर्णी, डॉ. रो. ज्योती चिडगुपकर, रो. अध्यक्ष सीए सुनील महेश्वरी, रो. धनश्री केळकर, रो. शिवाजी उपरे यांच्या उपस्थितीत पार पडले. विशेष उल्लेखनीय म्हणजे नुकतेच विवाहबद्ध झालेल्या डॉ. जयंती अडके यांच्या मुलाचे नवीन जोडपे देखील उपस्थित होते.

### पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर विद्यापीठात बी.व्होक पत्रकारिता पदवीचे प्रवेश सुरु

**सोलापूर, दि. ८ मे -**

बारावी नंतर विद्यार्थ्यांना पत्रकारिता आणि माध्यम क्षेत्रात कौशल्यपूर्ण करिअर घडवण्यासठी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर विद्यापीठात बी. व्होक पत्रकारिता पदवी अभ्यासक्रम सुरु करण्यात आला आहे. बारावीचा रिझल्ट लागताच बी. व्होक पत्रकारिता पदवीचे प्रवेश सुरु झाले आहेत. तरी जागा मर्यादीत असल्याने विद्यार्थ्यांनी तातडीने प्रवेश घ्यावेत. असे आवाहन सामाजिक शास्त्र संकुलाचे संचालक डॉ. गौतम कांबळे आणि जनसंज्ञापन विभागाचे प्र. विभाग प्रमुख डॉ. प्रभाकर कोळेकर यांनी केले आहे. पत्रकारितेच्या क्षेत्रात व्यावसायिक शिक्षण घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाने एक सुवर्णसंधी उपलब्ध करून दिली आहे. विद्यापीठाच्या सामाजिक शास्त्र संकुलातील मास कम्युनिकेशन विभागामार्फत 'बी. व्हॉक. जनर्लिझम' या पदवी अभ्यासक्रमासाठी शैक्षणिक वर्ष २०२५-२६ करिता थेट प्रवेश प्रक्रिया सुरू झाली आहे. हा अभ्यासक्रम बारावी नंतर थेट प्रवेश योग्य आहे. स्पर्धा परीक्षांची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठीही उपयुक्त आहे. या अभ्यासक्रमाची आखणी व अंमलबजावणी कुलगुरु डॉ. प्रकाश महानवर, प्र-कुलगुरू प्रा. लक्ष्मीकांत दामा, प्र. कुलसचिव डॉ. अतुल लकडे यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आली आहे. तरी या अभ्यासक्रम प्रवेशाच्या अधिक माहितीसाठी ९२६०४८९३८३, ८३२९८३९४५१, ९८८१०५०५९९ यांच्याशी संपर्क साधावा.

# बियाणे-खते लिंकिंग केल्यास थेट 'फौजदारी'

✔ जिल्हाधिकारी आशीर्वाद यांचा कंपन्यांसह विक्रेत्यांना इशारा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ९ मे-**

जून महिन्यात खरिपाच्या पेरण्या सुरु होताच कृषी व्यावसायिकांकडून वाढीव दरात बियाणे विकणे आणि लिंकिंगचे प्रकार समोर आले होते. असे प्रकार थांबविण्यासाठी सोलापूर जिल्ह्यातील खते-बियाणे विक्रेते, विविध कंपनी उत्पादक प्रतिनिधी आणि कृषी विभागाची आज (दि. ०९) संयुक्त बैठक घेवून जिल्हाधिकाऱ्यांनी बियाणे-खते-किटकनाशके लिंकिंग प्रकार करू नये अशा सक्त सुचना दिल्या.

दरम्यान, जर असे लिंकिंग प्रकार निदर्शनास आल्यास थेट फौजदारी कारवाईचा इशारा दिला आहे. यामुळे उत्पादक कंपन्या आणि खत-बियाणे विक्रेत्यांचे धाबे दणाणले आहेत. मृगाचा चांगला पाऊस पडल्यावर खरिपाच्या पेरणीला सुरवात होते. अशावेळी काही मोजक्या बियाणांची मागणी अधिक असते. तर अनेकदा कृषी व्यावसायांकडून अशा बियाणांची कृत्रिम टंचाई निर्माण केली जाते. त्यानंतर ही बियाणे हवी असतील तर त्यासोबत इतर औषधे, इतर कंपनीचे बियाणे, तसेच मागणी नसलेले बियाणे विकत घेणे अनिवार्य करण्यात येते. यामुळे शेतकऱ्यांची इच्छा नसतानाही त्यांना मागणी नसलेले आणि इतर खतांची आणि बियाणांची खरेदी करावी लागते. विशेष म्हणजे त्याचा आर्थिक भारही शेतकऱ्यांना झेलावा लागतो. अनेक कंपन्या जाणीवपूर्वक लिंकिंगची सक्ती व्यापाऱ्यांवर करतात आणि तीच सक्ती कृषी चालक शेतकऱ्यांवर करतात. यामुळे जिल्हाधिकाऱ्यांनी ०९ मे रोजी एक बैठक घेवून वरील इशारा दिला आहे.



जिल्हाधिकारी कार्यालयात झालेल्या या बैठकीला जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी शुक्राचार्य भोसले, राज्यातील विविध बियाणे-खत उत्पादक कंपन्यांचे १२ प्रतिनिधी, माफदाचे प्रतिनिधी व कृषी विभागातील इतर अधिकाऱ्यांची उपस्थिती होती. दरम्यान, या लिंकिंगवर करडी नजर ठेवण्यासाठी जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांच्या मार्गदर्शनाखाली तालुका, उपविभाग आणि जिल्हा स्तरावर गुणनियंत्रण पथकांची निर्मिती केली असल्याने कोणीही लिंकिंग करू नये, असे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी भोसले यांनी यावेळी केले.

#### जिल्ह्यात याप्रमाणे राहणार संरक्षित साठा

खरीप हंगामाची पेरणी झाल्यावर पिकांच्या वाढीसाठी आणि फळांच्या वाढीसाठी रासायनिक खतांची मागणी वाढते. दरम्यान मागणी वाढल्याने याचा फायदा काही कृषी केंद्र चालक आणि खताच्या कंपन्या घेतात. यामुळे जिल्ह्यात यंदा ६ हजार ९०० मे. टन युरिया अन् १४०० मे. टन डीएपीचा संरक्षित साठा (बफर स्टॉक) करण्यात येणार आहे. इतकेच नाहीतर गतवर्षीचाही सव्वालाख मे. टन खतांचा साठा आहे. यामुळे भविष्यात शेतकऱ्यांना खताचा तुटवडा जाणवणार नाही.

**- शुक्राचार्य भोसले, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी**



## लोकमंगल महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांचा निरोप

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ९ मे-**

श्रीराम ग्रामीण संशोधन व विकास प्रतिष्ठान संचलित आणि महात्मा फुले कृषी विद्यापीठ राहुरी संलग्रित लोकमंगल कृषीजैवतंत्रज्ञान महाविद्यालयातील चतुर्थ वर्षातील पदवीच्या विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ महाविद्यालयाच्या मुख्य सभागृहात संपन्न झाला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य सागर महाजन हे होते. या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून लोकमंगल कृषी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अमोल शिंदे व लोकमंगल कृषी व्यवसाय व्यवस्थापन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ सचिन फुगे हे लाभले होते. कार्यक्रमाची सुरुवात दीप प्रज्वलन आणि सरस्वती पूजनाने झाली. यानंतर आशिष पालवे, सोहम बोधले, प्रतीक्षा गुंड, आरती खुने, सायली सोनावणे, दर्शना शिंदे, प्रतिभा शिंदे, राधिका घुगे, श्रेया टकले, निकिता ठावरे आदींनी आपल्या मनोगतातून महाविद्यालयातील त्यांचा जीवनप्रवास, जिव्हाळा व अनुभव व्यक्त केला. याप्रसंगी प्राचार्य सागर महाजन, प्रा. सायली बडेकर, प्रा. अंकिता पवार यांनी आपल्या मनोगतातून विद्यार्थ्यांनी त्यांना मिळालेल्या ज्ञानाचा उपयोग भविष्यातील यशस्वी वाटचालीसाठी करावा, असा सल्ला दिला. सूत्रसंचालन व आभार नक्षत्रा कांबळे यांनी व्यक्त केले.

## मुळेगाव येथील नियोजित कत्तलखान्यास हिंदुत्ववादी संघटनांनी केला विरोध

महापालिका प्रशासनाकडे नोंदवली हरकत

✔ कत्तलखान्याचा विषय कायम स्वरूपी बंद करण्याची मागणी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ९ मे-**

मुळेगाव येथील नियोजित कत्तलखान्यास हिंदुत्ववादी संघटनांनी तीव्र विरोध दर्शवला आहे. या सदर्भात महापालिका प्रशासनाकडे आज हरकत नोंदवली आहे.या कत्तलखान्याचा विषय कायमस्वरूपी बंद करावा, अशी मागणीही करण्यात आली आहे.

मुळेगाव येथे अत्याधुनिक कत्तलखाना करण्यात येणार आहे. या संदर्भात सोलापूर महापालिकेने जाहीर प्रसिद्धीकरणही केले आहे. या नियोजित कत्तलखान्यास हिंदुत्ववादी संघटनांनी तीव्र विरोध दर्शवला आहे. आज सोलापूर महापालिकेत प्रशासनाकडे यासंदर्भात या संघटनांनी लेखी हरकत नोंदवली आहे. हा अत्याधुनिक कत्तलखाना सुरू करू नका. यापूर्वी सन २००७ - ०८ मध्ये अशाप्रकारे कत्तलखाना सुरू करण्याचा प्रयत्न झाला होता. त्यास संघटनांनी विरोध केला होता. जन आंदोलनाद्वारे तो प्रयत्न हाणून पाडला होता. हा कत्तलखाना कायमस्वरूपी बंद करण्याचा ठरावही सोलापूर महापालिकेने यापूर्वी केला आहे. या परिसरातून पालखी जाते. सोलापूर शहर धार्मिक क्षेत्र आहे. विमानतळापासून दहा किलोमीटर परिसरात कत्तलखाना असेल तर पक्ष्यांमुळे सुरक्षा धोक्यात येऊ शकते. विमाने उड्डाण करू शकणार नाहीत. यामुळे हा विषय कायमस्वरूपी बंद करण्यात यावा, अशी मागणी संघटनांनी केली आहे.



दरम्यान, डिसेंबर २००५ मध्ये झालेल्या महापालिकेच्या सर्वसाधारण सभेमध्ये ठराव क्रमांक ४०६ व ४०८ झाला असताना पुन्हा मुळेगाव तांडा येथे पुन्हा यांत्रिक कत्तलखाना उभा करण्यासाठी बीओटी पद्धतीअंतर्गत जाहिरात दिली जाते. हे योग्य नाही.

२००७ साली १कोटी १० लाख खर्चून कत्तलखाना उभा केला होता. तो पूर्ण कत्तलखाना हा ग्रामस्थांनी उध्वस्त करून सर्व मशिनरी चोरी गेली असताना पुन्हा ही जाहिरात देण्याचा काय उपयोग ? सर्व हिंदुत्ववादी संघटनेच्या प्रतिनिधीयाला नी स्थगिती न देता कायम स्वरूपी हा रद्द करावा अशी मागणी केली आहे, असे प्राणी क्लेश प्रतिबंध समिती सदस्य व पशु कल्याण अधिकारी केतन शहा यांनी सांगितले.

यावेळी विश्व हिंदू परिषदेचे संजयकुमार जमादार, बजरंग दलाचे नागेश बंडी, महेश भंडारी, अभिमन्यू डोंगरे, हिंदू राष्ट्र सेनेचे रवी गोणे, अक्षय कुलथे, विजय महिंद्रकर, भीमराव आसादे, अविनाश माने आदींसह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

## सौरऊर्जा सयंत्र अन् कॅन्सर प्रतिबंधासाठी निधी

▸▸ सीईओ कुलदीप जंगम यांची माहिती
▸▸ जिल्हा नियोजन समितीचे सहकार्य

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ९ मे-**

जिल्हा नियोजन समितीच्या माध्यमातून सोलापूर जिल्हा परिषदेला नाविन्यपूर्ण योजनांसाठी निधी प्राप्त झाला आहे. यामध्ये महिलांमध्ये वाढते कॅन्सरचे प्रमाण लक्षात घेऊन किशोरवयीन मुलींसाठी कॅन्सर प्रतिबंधक लस देणे व ग्राम पंचायतीवर सौरऊर्जा संयंत्र बसवण्यासाठी हा निधी देण्यात आला आहे, अशी माहिती जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांनी दिली.

जिल्हा परिषदेचे मार्च अखेर खर्चाचे नियोजन संपत आले आहे. खर्च झालेल्या निधीचा आढावा जिल्हा परिषदेच्या मुख्य लेखा व वित्त अधिकारी मीनाक्षी वाकडे या घेत आहेत. मार्च अखेरला शाळा सुधारणा, आरोग्य आणि ग्रामपंचायत विभागासाठी विशेष निधी देण्यात आला आहे. तत्कालीन मुख्य



कार्यकारी अधिकारी मनीषा आव्हाळे यांनी जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. संतोष नवले यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्ह्यात महिलांची आरोग्य तपासणी शिबिर राबवल्यानंतर महिलांमध्ये ब्रेस्ट व ब्लड कॅन्सरचे प्रमाण वाढल्याचे दिसून आले आहे.लक्षणे आढळलेल्या महिलांना उपचारासंबंधी सुविधा देण्यात आली होती. महिलांच्या कॅन्सरला प्रतिबंध करण्यासाठी बाजारात लस उपलब्ध झाली आहे. किशोरवयीन मुलींना ही लस दिली जाते. बाजारात या लसीची किंमत दोन ते अडीच हजार रुपये आहे. त्यामुळे ग्रामीण भागातील शाळकरी किशोरवयीन मुलींना ही लस मोफत देण्यासाठी जिल्हा परिषदेने प्रस्ताव दिला आहे. महाराष्ट्रातील हा पायलट प्रोजेक्ट असेल. मोठ्या ग्रामपंचायतसाठी सौरऊर्जा संयंत्र बसवण्यासाठी विशेष निधी मंजूर करण्यात आला आहे. त्याचबरोबर शाळांच्या नावीन्यपूर्ण उपक्रमासाठीही विशेष निधी मिळाला आहे. सोलापूर जिल्हा परिषदेला नवीन आर्थिक वर्षात या तीन नाविन्यपूर्ण योजनाना गती मिळणार आहे.

#### विकास कामांना गती

जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांनी कृषी विभागासाठी अकरा तालुक्यात ५० टक्के अनुदानावर शेतकरी गटासाठी ड्रोन उपलब्ध करून देण्याचे योजना जाहीर केली आहे. या योजनेचे कौतुक झाल्यानंतर आता जिल्हा नियोजन मधून यातील नाविन्यपूर्ण योजनांसाठी विशेष निधी मिळाला असल्याने झेडपीच्या विकास कामांना गती येणार आहे

#### एक कोटीचा निधी मंजूर

पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी या नाविन्यपूर्ण योजनेसाठी सुमारे एक कोटी निधी मंजूर केला आहे. आरोग्य विभागाची तांत्रिक मान्यता मिळाल्यानंतर हे लसीकरण सुरू करण्यात येणार आहे. जिल्हा परिषदेच्या या नावीन्यपूर्ण योजनेमुळे भविष्यातील कॅन्सरवर प्रतिबंध होणार आहे.

## रेशन ई-केवायसीसाठी ३० जूनपर्यंतची मुदतवाढ

● जिल्हा पुरवठा अधिकारी सरडे यांची माहिती

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ०९ मे-**

ई पॉस मशीन, आय स्कॅनर मशीन देवूनही जिल्ह्यातील रेशन दुकानदारांकडून ई केवायसीचा आकडा हलत नव्हता; यामुळे जिल्ह्यातील अनेक दुकानदारांना नोटिसा काढून सुचनाही केल्या मात्र जिल्ह्यातील ई-केवायसी ७५ टक्केच्या वर सरकत नसल्याची खंत जिल्हा पुरवठा अधिकारी संतोष सरडे यांनी व्यक्त केली.

आता शासनाकडून ३० जूनपर्यंत ई-केवासयीसाठी मुदतवाढ देण्यात आल्याने किमान या दोन महिन्यात तरी जिल्ह्यातील राशन दुकानदारांनी उर्वरित ई-केवायसीचे काम पूर्ण करावे, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. मंगळवेढा, अक्कलकोट आणि उत्तर सोलापूर तालुक्यात या ई-केवायसीचे काम अत्यंत संथगतीने सुरू आहे. जिल्ह्यातील शिधापत्रिका धारकांची ई-केवायसी करायच्या कामात हयगय केलेल्या ११ तालुक्यातील तब्बल



१६५ राशन दुकानदारांना गेल्या काही दिवसांपूर्वी बोलावून ई-केवायसीबाबत जाब विचारत जिल्हा पुरवठा अधिकारी सरडे यांनी त्या धान्य दुकानदारांची चांगलीच झडती घेतली होती. तरीही या दुकानदारांतून अद्याप तरी प्रगती झाली नसल्याचे त्यांनी आज सांगितले. आता ई-केवायसीची मुदतवाढ झाली असल्याने या दोन महिन्यात तरी धान्य दुकानदारांनी ई-केवायसीचा आकडा वाढवावा, अशी अपेक्षा व्यक्त केली. इतकेच नाहीतर या दुकानदारांना ईकेवायसीच्या पेंडिंग युनीटची सुधारित यादीही काढून दिल्याचे त्यांनी यावेळी नमूद केले. शासन जीआरप्रमाणे गेल्या ३ ते ४ महिन्यापासून शहर आणि जिल्ह्यातील राशन दुकानांतून शिधापत्रिकाधारकांसाठी ई-केवायसी करण्याची मोहीम चालू आहे. ही मोहीम पूर्ण करण्यासाठी ३० एप्रिल अंतिम मुदत होती.

## स्पेन्का कंपनीच्या नव्या कॉर्पोरेट ऑफिसचा रविवारी शुभारंभ

✔ चेअरमन सुहास आदमाने यांची माहिती
✔ नव्या तंत्रज्ञानाच्या अल्कलाइन आयोनायझरचेही होणार सादरीकरण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ९ मे-**

स्पेन्का कंपनीच्या नव्या कॉर्पोरेट ऑफिसचा शुभारंभ तसेच नव्या तंत्रज्ञानाच्या अल्कलाइन आयोनायझरचे सादरीकरण रविवार दि. ११ मे २०२५ रोजी सकाळी ११ वाजता हॉटेल बालाजी सरोवर, सोलापूर येथे होणार आहे, अशी माहिती या कंपनीचे चेअरमन सुहास आदमाने यांनी पत्रकार परिषदेत दिली.

सात रस्ता ते स्टेशन रोड या रस्त्यावरील हॉटेल यतीराजसमोरच्या अनुदीप बिल्डिंगमधील दुसऱ्या मजल्यावर या कंपनीचे नवीन कार्पोरेट ऑफिस उभारण्यात आले आहे. त्याचा शुभारंभ तसेच नव्या तंत्रज्ञानाच्या अल्कलाइन आयोनायझरचे सादरीकरण अशा दोन कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. छत्रपती खा. उदयनराजे भोसले यांच्या हस्ते व राज्याचे क्रीडा व युवक कल्याण विभागाचे राज्यमंत्री दत्तात्रय भरणे यांच्या अध्यक्षतेखाली हा कार्यक्रम होणार आहे. यावेळी प्रिसिजन कॅम्पशाफ्टसचे चेअरमन यतीन शहा, आ. सचिन कल्याणशेट्टी, आ. देवेंद्र कोठे व महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे या मान्यवरांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. २०१५ साली मोहोळ तालुक्यातील शिरापूर येथे स्पेन्का कंपनीची स्थापना केली. मिनरल वॉटरच्या उत्पादनापासून सुरु झालेला हा प्रवास आज १० वर्षात फ्लेव्हर्ड मिल्क, सॉफ्टड्रिंक्स, एनर्जी ड्रिंक, अल्कलाईन वॉटर, चहा या गुणवत्तापूर्ण उत्पादनापर्यंत पोहोचला आहे. महाराष्ट्र, कर्नाटक, तेलंगणा येथील ५ हजाराहून अधिक हॉटेल्स, रेस्टॉरंटस व लाखो ग्राहकांपर्यंत स्पेन्का ब्रँड पाहोचला आहे. वाढत्या प्रतिसादामुळे स्पेन्काने दुसरा प्लान्ट पुणे जिल्ह्यात इंदापूर येथे सुरु केला. या प्रवासात पंढरपूरच्या आषाढी वारी साठी सलग २ वर्षे २० लाखांहून अधिक वारकऱ्यांना मिनीरलयुक्त पाणी पुरवठा करण्याचे कंत्राट अगदी सुयोग्य नियोजनाव्दारे पूर्ण केले ही सर्वात मोठी स्पेन्काची उपलब्धी होती. आज गुणवत्ता आणि आपुलकीची सेवा, उत्तम व्यवस्थापनाव्दारे भारतातील एक नामांकित बँड म्हणून स्पेन्काला ओळखले जात आहे.


सुहास आदमाने


अश्विनी आदमाने

आता आणखी उत्तम आरोग्यदायी उत्पादन देण्याच्या हेतूने स्पेन्का अल्कलाइन आयोनाझर ग्राहकांसाठी उपलब्ध करुन देत आहे. अल्कलाइन आयोनायझर हे अत्याधुनिक मशीन जापनीज तंत्रज्ञानाचे असून यापासून अल्कलाइन वॉटरची निर्मिती होते. ऍसिडिटी नियंत्रणात ठेवण्यासाठी हे पाणी उपयुक्त आहे. स्पेन्का कंपनीत प्रत्यक्षपणे सुमारे २५० लोकांना तर अप्रत्यक्षपणे ८०० लोकांना रोजगार मिळतो, अशी माहितीही आदमाने यांनी दिली. यावेळी पत्रकार परिषदेस संचालिका अश्विनी आदमाने उपस्थित होत्या.







**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : **विवेक कृष्णाजी घळसासी.** ● समूह मुख्य संपादक : **दिलीप यशवंत पेठे.**● मुख्य संपादक :**प्रशांत वसंतराव माने** दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Website:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company **Solapur Tarun Bharat Media Limited.**, and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● **Mr. Vivek Krishnaji Ghalsasi -** Dissertation Editor / ● **Mr. Dilip Yeshwant Pethe** - Group Chief Editor ● **Mr. Prashant Vasantrao Mane** - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) **Email ID starunbharat@gmail.com** and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: **https://dainiktarunbharat.com/**, ● Epaper: **https://epaper.dainiktarunbharat.com/.** The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

सोलापूर दिनांक

**सोलापूर तरुण भारत,** सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



बार्शी : श्री भगवंत प्रकटोत्सव दिनानिमित्त काढण्यात आलेल्या विशेष पुरवणीचे प्रकाशन करताना हभप डॉ. जयवंत बोधले महाराज, भगवंत देवस्थानचे विश्वस्त मुकुंदशेठ कुलकर्णी, पुजारी योगेश बडवे, दैनिक तरुण भारतचे प्रतिनिधी अरुण बळप व इतर.



https://dainiktarunbharat.com, https://epaper.dainiktarunbharat.com
सोलापूर तरुण भारत

## ▶▶ महत्वाचे...

### पंख्याचा पाता डोक्यात पडून एकजण जखमी

**सोलापूर, दि. ९ मे-**
घरातील पंख्याचा पाता डोक्यात पडल्याने अमर दत्तात्रय अरगे (वय ३१, रा. बालाजी नगर, अक्कलकोट रोड, सोलापूर) असे जखमी झालेल्याचे नाव आहे.शुक्रवारी अमर हा त्याच्या घरात बसला असताना, अचानक पंख्याचा पाता तुटून त्याच्या डोक्यात पडला. यामुळे त्याच्या डोक्यात जखम झाल्याने पत्नी सपना हिने सकाळी १०.४५ वाजता शासकीय रुग्णालयात उपचारास दाखल केल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

### चक्कर येऊन पडल्याने कचरा गाडीवरील तरुणाचा मृत्यू

**सोलापूर, दि. ९ मे-**
कचरा गाडीवर काम करताना पाणी पिण्यासाठी म्हणून खाली उतरल्यानंतर अचानक चक्कर येऊन पडल्याने तरुणाचा मृत्यू झाला. ही घटना गुरुवारी दुपारी ४.३० वाजता घडली. विशाल मोहन कांबळे (वय ३५, रा. भवानी पेठ, सोलापूर) असे मृत पावलेल्या तरुणाचे नाव आहे. विशाल हा कचरा गाडीवर काम करत होता. गुरुवारी काम करता असताना, तो पाणी पिण्यासाठी म्हणून गाडीतून खाली उतरला. त्यावेळी त्याला चक्कर येऊन तो खाली पडला. सायंकाळी सात वाजता भाऊ विकी कांबळे याने उपचारास दाखल केले, त्यावेळी तो बेशुध्द अवस्थेत होता. रात्री आठ वाजण्याच्या सुमारास तो मृत पावल्याचे डॉक्टरांनी घोषित केल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

### एसटी खड्ड्यात पडून महिला जखमी

**सोलापूर, दि. ९ मे-**
नंदूरबार ते पंढरपूर जाताना कर्जतजवळील चापटगाजवळ चालकाचा ताबा सुटल्याने एसटी खड्ड्यात पडल्याने महिला जखमी झाली. हा अपघात शुक्रवारी मध्यरात्री २.३० वाजता घडला. ललिता पोपट करवर (वय ३४, रा. नंदूरबार) असे जखमी महिलेचे नाव आहे. ललिता ही महिला पंढरपूरला जाण्यासाठी नंदूरबार येथून एसटीत बसली होती. शुक्रवारी मध्यरात्री २.३० च्या सुमारास एसटी कर्जतजवळ आली असता, तेथील चापटगावाजवळ चालकाचा एसटीवरील ताबा सुटला. यामुळे एसटी रस्त्याच्या बाजूच्या खड्यात पडल्याने ललिता यांच्या उजव्या हाताला व डोक्याला जखम झाली. करमाळा येथील सरकारी रुग्णालयात उपचार करून भाचा नवनाथ याने शुक्रवारी १०.५५ वाजता दाखल केल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

### तेरामैल जवळील दुचाकीच्या अपघातात महिला बेशुध्द

**सोलापूर, दि. ९ मे-**
दुचाकींच्या अपघातात डोक्याला जखमी होऊन महिला बेशुध्द झाल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे. हा अपघात गुरुवारी सकाळी ९.३० वाजता तैरामैल येथे घडला आहे. शेवलाबाई पोमा राठोड (वय ५४, रा. सेवालाल नगर, मंद्रुप ता. द. सोलापूर) असे बेशुध्द महिलेचे नाव आहे. गुरुवारी सकाळी ९.३० वाजता शेवलाबाई या दुचाकीवर मागे बसून तेरा मैल ते सोलापूरकडे जात होत्या. तैरामैल पासून काही अंतरावर असताना शेवलाबाई बसून जात असलेल्या दुचाकीला समोरून आलेल्या दुचाकीची धडक लागली. या अपघातात खाली पडल्याने शेवलाबाई यांच्या डोक्याला जखम झाली. त्यानंतर त्यांना खासगी रुग्णालयात दाखल केले, परंतु त्यांच्या प्रकृतीत सुधारणा होत नसल्याने शुक्रवारी सकाळी १०.२० वाजता दिलीप चव्हाण यांनी शासकीय रुग्णालयात दाखल केल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे. दरम्यान डॉक्टरांनी शेवलाबाई या बेशुध्द असल्याची माहिती दिली आहे.

### हातमाग, वस्त्रोद्योग तंत्रविज्ञान पदविकेसाठी अर्ज करा

**सोलापूर दि. ९ मे-**
केंद्र शासनाच्या भारतीय तंत्रविज्ञान संस्थेतील सन २०२५-२६ या शैक्षणिक सत्राकरिता तीन वर्षीय (सहासत्रीय) हातमाग व वस्त्रोद्योग तंत्रविज्ञान पदविका अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी इच्छुकांनी १० जून पर्यंत विहित नमुन्यातील अर्ज सादर करावेत, असे आवाहन वस्त्रोद्योग आयुक्त संजय दैने यांनी प्रसिद्धीपत्रकाव्दारे केले आहे. उमेदवारांकरिता अधिक माहिती, प्रवेश अर्जाचा नमुना व इतर अनुषंगिक माहिती वस्त्रोद्योग आयुक्तालयाच्या http.www.dirtexmah.gov.in या संकेतस्थळावर तसेच सर्व प्रादेशिक उपायुक्त, वस्त्रोद्योग यांच्या कार्यालयात उपलब्ध आहे.

# बाजार समिती सभापती; चेंडू मुख्यमंत्र्यांच्या कोर्टात

✔ समितीच्या नूतन संचालकांकडून मुख्यमंत्र्यांची भेट, बंद लिफाफ्यातून नाव होणार जाहीर



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ९ मे-**
सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीच्या सभापतीची निवड रविवारी ११ मे रोजी होणार असून त्या पार्श्वभूमीवर आमदार सचिन कल्याणशेट्टी यांच्या नेतृत्वाखाली विजयी झालेले व सभापतीपदासाठी इच्छुक असणारे माजी आमदार दिलीप माने, दक्षिणचे नेते सुरेश हसापुरे, माजी सभापती राजशेखर शिवदारे यांनी पालकमंत्री जयकुमार गोरे, आमदार देवेंद्र कोठे यांच्या प्रमुख उपस्थितीत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली. बाजार समिती भाजपा-काँग्रेसची असली तरी सभापती कोणची घोषणा मात्र मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस करणार असल्याचे स्पष्ट झाले आहे.

बाजार समिती निवडणूकीनंतर सभापतीपदासाठी विविध नावे चर्चेत येत आहेत. इच्छुकांमधून एकाचे नाव निश्चित करण्याचे आव्हान आमदार कल्याणशेट्टी यांच्यासमोर आहे. त्यामुळे आमदार कल्याणशेट्टी यांचा सर्व संचालकांबरोबर समन्वय साधून सभापती निवड करण्याचा प्रयत्न सुरू आहे. बाजार समिती निवडणूकी दरम्यान मुख्यमंत्र्यां बरोबर चर्चा करूनच निवडणूक लढवित असल्याचे सांगितले होते. त्यानुसार नूतन संचालक व सभापतीपदासाठी इच्छुक असणाऱ्या संचालकांसह पालकमंत्र्यांच्या उपस्थितीत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेऊन सभापतीपदाच्या नावासंदर्भात चर्चा केल्याचे सांगण्यात येते.

बाजार समितीच्या सभापतीपदासाठी माजी आमदार दिलीप माने व सुरेश हसापूरे यांचे नाव समोर येत आहे. शिवाय राजशेखर शिवदारेही इच्छुक असल्याने सर्व संमतीने नाव जाहीर करण्यात येणार असले तरी आमदार कल्याणशेट्टी यांच्या मनातील सभापती कोण? हे रविवारी ११ मे रोजीच स्पष्ट होणार आहे. जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार गोरे व आमदार कल्याणशेट्टी यांच्या नेतृत्वाखाली दिलीप माने, सुरेश हसापुरे, राजशेखर शिवदारे, आमदार देवेंद्र कोठे यांच्या प्रमुख उपस्थितीत मुख्यमंत्र्यांची भेट घेण्यात आली. यावेळी मुख्यमंत्री फडणवीस यांनी सर्वजण मिळून सभापतीचा निर्णय समन्वयाने घ्या असे सांगितले असल्याचे सांगण्यात येते .

रविवारी होणाऱ्या बाजार समितीच्या चेअरमन पदाचे नाव देवेंद्र फडणवीस यांच्याकडूनच जाहीर होणार आहे. मुख्यमंत्री सभापतीचे नाव आमदार कल्याणशेट्टी यांना सांगितल्यानंतर सभापतीचे नाव जाहीर करण्यात येणार आहे. त्यामुळे मुख्यमंत्री फडणवीस यांच्या उपस्थितीत बाजार समितीच्या विविध विषयासंदर्भात चर्चा केल्याचे सांगण्यात येते. दरम्यान आगामी जिल्हा परिषद, महानगरपालिका आणि पंचायत समितीच्या निवडणुकीमध्ये एकत्रित राहून काम करा, मी तुमच्या कायम सोबत आहे, अशी ग्वाही फडणवीस यांनी दिली आहे.

#### ● बंद लिफाफा आमदार कल्याणशेट्टींकडे?

सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीच्या सभापतीचे नाव आमदार सचिन कल्याणशेट्टी जाहीर करणार आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नूतन संचालकांबरोबर चर्चा केली असून आमदार कल्याणशेट्टी यांना सभापतीचे नाव सुचविणार असल्याचे सांगितले. त्यामुळे रविवारी होणाऱ्या सभापतीच्या नावाचा बंद लिफाफा आमदार कल्याणशेट्टी यांच्याकडे असणार आहे.

#### ● आगामी निवडणुकीत एकत्र राहा

सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीवर आमदार सचिन कल्याणशेट्टी यांच्या नेतृत्वाखाली पॅनलने विजय मिळविल्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आगामी निवडणुकीत सर्व नेतेमंडळींनी एकत्र राहून काम करावे. जिल्हा मध्यवर्ती बँक, स्थानिक स्वराज्य संस्थांसह इतर निवडणूकीसाठी एकत्र राहण्याची सूचना मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिल्याचे सांगण्यात आले.

#### ● सभापतीपदासाठी इच्छुकांचा मुंबई दौरा

सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीच्या सभापती पदासाठी इच्छुक असणारे माजी आमदार दिलीप माने, सुरेश हसापूरे व राजशेखर शिवदारे आदिंनी पालकमंत्री व आमदारांच्या उपस्थितीत मुख्यमंत्री फडणवीस यांची भेट घेण्यासाठी मुंबई दौरा केला आहे. मुंबईमधूनच सभापती नाव निश्चित होणार असल्याने अनेक राजकीय घडामोडी घडल्याची चर्चा सुरू आहे.

## सफाई कर्मचाऱ्यांच्या वेळेत बदल करा

**कामगार संघटनेची मागणी**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ९ मे-**
महापालिकेतील झाडूवाले, बिगारी सफाईगार, जमादार आणि आरोग्य निरीक्षक यांच्या कामाची वेळ सकाळी ६: ३० ते दुपारी १: ३० अशी करण्यात यावी, या मागणीसाठी सोलापूर महापालिका कामगार संघटना कृती समितीने संघटनेचे अध्यक्ष अशोक जानराव शिष्टमंडळाने महापालिका आयुक्तांकडे निवेदन दिले आहे.

महापालिका घनकचरा विभागातील सफाई कामगारांच्या कामाची सकाळी ९.३० ते १०.००वाजेपर्यंत मध्यंतराची वेळ ठेवण्याबाबत दोन परिपत्रके काढून त्याप्रमाणे कामकाज करून घेतले जात होते. परंतु या परिपत्रकाप्रमाणे कामकाज करून घेण्याऐवजी कामाची वेळ सकाळी ६ ते दुपारी २ वाजेपर्यंत ठेवण्यात आली आहे. गेल्या दीड महिन्यापासून तापमानात वाढ होऊन तापमान ४५ अंशाच्या जवळ जात आहे. सद्या अशा रखरखत्या उन्हामध्ये कामगारांना काम करावे लागत आहे. उष्माघाताने चार झाडू वाल्यांना उपचारादरम्यान जीव गमवावा लागला आहे. उन्हामुळे घाणीत विषारी वायू तयार होतो. त्यामुळे कामगार रोजचा काम करताना चक्कर येऊन बेशुद्ध पडत आहेत. त्यांच्या जीविताचे रक्षण माणुसकीच्या दृष्टिकोनातून झाले पाहिजे. तसेच अशा घटना घडल्यास किंवा आजारी पडल्यास आर्थिक परिस्थिती नसल्यामुळे त्यांच्यावर योग्य उपचार होत नाहीत अशावेळी त्यांच्यासाठी कॅशलेस सुविधा देखील उपलब्ध करून देण्यात यावी. दुसरीकडे कामगार प्रामाणिकपणे काम करत असताना त्यांच्यावर ३०० रुपयांपासून ते १ हजार रुपयांपर्यंत दंडात्मक कारवाई केली जात आहे. ही बाब गंभीर आहे ती बदलण्यात यावी यासह विविध बाबींचा उल्लेख निवेदनात करून महापालिका प्रशासनाकडे पाठपुरावा करण्यात येत असल्याची माहिती श्री. जानराव यांनी दिली.

## पुण्याचा संगवई पुरस्कार दत्ता भोसले यांना जाहीर

**सोलापूर, दि. ९ मे-**
काव्य मित्र संस्था पुणेच्या वतीने देण्यात येणारा यंदांचा संजय संगवई स्मृती पुरस्कार येथील छत्रपती शिवाजी नाईट कॉलेजचे ग्रंथालयीन कर्मचारी दत्ता भोसले यांना जाहीर झाला आहे.



जागतिक मातृदिन, छत्रपती संभाजी महाराज जयंती,तसेच कर्मवीर भाऊराव पाटील व समाजसेवक तथा विचारवंत संजय संगवई यांच्या स्मृतिदिनाचे औचित्य साधून हा पुरस्कार देण्यात येत असूनया पुरस्काराचे यंदाचे हे २५वे वर्ष आहे. सन्मानचिन्ह,सन्मानपत्र, शाल, पुष्पगुच्छ असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. येत्या रविवारी ११ मे रोजी सकाळी १०.३० वाजता पुण्यातील पिंपरी चिंचवड सायन्स पार्क येथील तारांगण ऑडिटोरिअम येथे या पुरस्काराचे वितरण मातृतीर्थ सिंदखेडराजा येथील राजे लखोजी जाधवराव यांचे १४ वे वंशज तथा स्वराज्याचे सरसेनापती धनाजी जाधवराव यांच्या थेट दहावे वंशज श्रीमंत संभाजीराजे जाधवराव यांच्या हस्ते होणार आहे. याप्रसंगी ज्येष्ठ कवी डॉ. सुरेश वाकचौरे, भोसरी येथील श्रेयस टुल्स अँड कंपोनन्टसचे डॉ. अशोक साळुंखे आदींची उपस्थिती असणार आहे. भोसले यांचे संस्थेचे अध्यक्ष मनोहर सपाटे, महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. अरुण मित्रगोत्री, माजी प्राचार्य डॉ. अनिल बारबोले, डॉ. मधुकर पवार, मुख्याध्यापिका सुजाता जुगदार, माजी ग्रंथपाल नागनाथ नवगिरे आदींनी त्यांचे अभिनंदन केले आहे.

# शहर व जिल्ह्यात आत्महत्येच्या चार घटना

✔ दोघांनी गळफास घेतला तर दोघांनी औषध प्राशन केले

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ९ मे-**
सोलापूर शहर व जिल्ह्यात आत्महत्या करण्याच्या चार घटना घडल्या आहेत. यात दोघांनी गळफास घेऊन दोघांनी विशारी औषध प्राशन करून आत्महत्या केल्या आहेत.



**अंबिकानगर : पंख्याला साडीने गळफास**

पहिल्या घटनेत अज्ञात कारणातून सागर जनार्दन संकपाळ (वय २३, रा. अंबिका नगर, एमआयडीसी, सोलापूर) या तरुणाने राहत्या घरातील पंख्याला साडीने गळफास घेऊन आत्महत्या केली. हा प्रकार शुक्रवारी सकाळी ८.४५ वाजता उघडकीस आला. शुक्रवारी सकाळी ८.४५ च्या सुमारास सागर हा त्याच्या घरातील पंख्याला साडीने गळफास घेतलेल्या अवस्थेत आढळून आला. त्याला गळफासातून सोडवून एमआयडीसी पोलीस ठाण्यातील हवालदार डोके यांनी बेशुध्द अवस्थेत शासकीय रुग्णालयात दाखल केले होते. परंतु उपचारापूर्वीच तो मृत पावल्याचे डॉक्टरांनी घोषित केले.

**हगलूर: झाडाच्या फांदीला गळफास**

दुसऱ्या घटनेत उत्तर सोलापूर तालुक्यातील हगलूर शिवारातील पाटंबधारे हद्दीतील झाडाच्या फांदीला वायरच्या सहाय्याने गळफास घेऊन सचिन लक्ष्मण शिंपले (वय ३७) याने आत्महत्या केली. हा प्रकार गुरुवारी सकाळी ११.३० च्या सुमारास उघडकीस आला.

हगलूर गावाच्या शिवारात पाटबंधारे हद्द आहे. या परिसरात गुरुवारी सकाळी ११.३० वाजण्याच्या सुमारास सचिन हा झाडाच्या फांदीला वायरने गळफास घेतलेल्या अवस्थेत आढळला. ही बाब लक्षात येताच गावातील लोकांनी त्याची गळफासातून सुटका करून दुपारी २.१० वाजता मित्र अंगद चव्हाण याने उपचारास शासकीय रुग्णालयात दाखल केले. परंतु उपचारापूर्वीच तो मृत पावल्याचे डॉक्टरांनी घोषित केले.

**कोन्हेरी : फवारणीचे औषध प्राशन**



तिसऱ्या घटनेत मोहोळ तालुक्यातील कोन्हेरीत द्राक्षावर फवारणीचे औषध प्राशन करून महिलेने आत्महत्या केली. हा प्रकार गुरुवारी सकाळी ११.३० वाजता उघडकीस आला. सुमन दत्तू माने (वय ५०) असे महिलेचे नाव आहे. गुरुवारी सकाळी सुमन या कोन्हेरीतील त्यांच्या राहत्या घरी होत्या. त्यांनी अज्ञात कारणातून द्राक्षावर फवारणी करण्याचे घरात असलेले औषध प्राशन केले. यात त्यांना त्रास होऊ लागल्याने मोहोळ येथील सरकारी रुग्णालयात प्राथमिक उपचार करून डॉक्टराच्या सल्ल्यानुसार दुपारी दोन वाजता मुलगा नागनाथ याने रुग्णालयात उपचारास दाखल केले. उपचारादरम्यान ४.१५ वाजता त्यांचा मृत्यू झाल्याचे डॉक्टरांनी घोषित केले.

**कामती : प्रेमप्रकरणातून डेटॉल प्राशन**

चौथ्या घटनेत मोहोळ तालुक्यातील कामती येथील तरुणीने प्रेमप्रकरणातून सोलापुरात आत्महत्येचा प्रयत्न केला. हा प्रकार गुरुवारी दुपारी १.३० च्या सुमारास फौजदार चावडी पोलीस ठाण्यासमोर घडला. प्रिती संजय भोसले (वय २४, रा. कामती ता. मोहोळ) असे तरुणीचे नाव आहे. प्रेम प्रकरणातून प्रिती ही फौजदार चावडी पोलीस ठाण्यात तक्रार देण्यासाठी जात होती. दरम्यान पोलीस ठाण्याच्या समोर आली असता, तिने सोबत आणलेले डेटॉल लिक्विड प्राशन केले. त्यात तिला त्रास होऊ लागल्याने अरुण गुरव याने शासकीय रुग्णालयात उपचारास दाखल केले. या सर्व घटनांची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

# उजनी-सोलापूर दुहेरी जलवाहिनीच्या कामाची बुधवारी चाचणी

✔ अनधिकृत बांधकाम प्रकरण: ऑनलाइन अर्ज न केल्यास पाडकाम होणार
✔ हॉकर्स झोन निश्चित करून पथविक्रेत्यांना ओळखपत्र देण्यात येणार



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ९ मे-**
उजनी-सोलापूर दुहेरी जलवाहिनीचे केवळ ७५ मीटर राहिले असून ते दोन दिवसात पूर्ण होईल. त्यानंतर येत्या बुधवारी या जलवाहिनी कामाची चाचणी करण्यात येणार आहे. दरम्यान, शहरात हॉकर्स झोन निश्चित करून पथविक्रेत्यांना ओळखपत्र देण्यात येणार आहे, अशी माहिती महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी दिली.

उजनी सोलापूर दुहेरी जलवाहिनीचे एकूण ११० किलोमीटर पैकी शेवटचे केवळ ७५ मीटरचे काम शिल्लक आहे तेही येत्या दोन दिवसात पूर्ण करण्यात येणार आहे. तशा स्पष्ट सूचना संबंधितांना दिल्या आहेत. त्यानंतर येत्या बुधवारी जलवाहिनी चाचणीचे काम करण्यात येणार आहे. मोडनिंब येथील हे काम संपले आहे. शेतकऱ्यांच्या अडथळ्यामुळे अडचण आली होती. आता काम सुरू आहे, असे डॉ. ओम्बासे यांनी सांगितले. सोलापूर शहरातील पाणीपुरवठा संदर्भातील ८८२ कोटीच्या योजनेअंतर्गत पहिल्या टप्प्यातील ३०० कोटीच्या कामांचा नवा आराखडा तयार करण्यात येत आहे. ती प्रक्रिया सुरू केली आहे. महिनाभरात हा आराखडा तयार होईल. पुढील कार्यवाही करण्यात येत आहे. कोणत्या तारखेला किती पाणी येईल. कुठून येईल याचा आढावा यामध्ये घेतला जात आहे. एका विभागात पाणी सोडले तर दुसऱ्या टप्प्यातील पाणी इतर विभागात जाऊ नये. वॉल्व बंद केला की पाणी पुढे जाऊ नये यासंदर्भातही नियोजन करण्यात येत आहे. सर्व कनिष्ठ अभियंता यासंदर्भात नियोजन करत आहेत. टेंडर झाले आहे. आराखड्यानंतर पुढील कार्यवाही करण्यात येणार आहे, असेही डॉ. सचिन ओम्बासे यांनी सांगितले.



महापालिकेतील बोगस बांधकाम परवाना प्रकरणातील २७ जणांची सुनावणी पूर्ण झाली आहे. या सर्व बांधकाम धारकांना महापालिकेकडे बांधकाम परवान्यासाठी ऑनलाइन अर्ज सादर करण्याचे आवाहन केले होते. त्यापैकी केवळ सहा जणांनी ऑनलाइन अर्ज भरले आहेत. या ऑनलाईन अर्जावर महापालिकेचे कनिष्ठ अभियंता पुढील कार्यवाही करणार आहेत. संबंधित जागेवर प्रत्यक्ष जाऊन पाहणी आणि मोजणी करण्यात येणार आहे. नियमानुसार बांधकाम केले आहे की नाही याची तपासणी करून फोटोही घेण्यात येतील. नियमानुसार कार्यवाही केली जाईल. नियमानुसार बांधकाम नसल्यास आवश्यकतेनुसार पाडकाम करण्यात येईल. दरम्यान, या प्रकरणातील ज्यांनी ऑनलाईन अर्ज भरले नाहीत त्यांना येत्या आठ दिवसात ऑनलाईन अर्ज प्रक्रिया करावी अन्यथा पाडकाम करण्यात येईल अशी नोटीस बजावण्यात येणार आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाप्रमाणे संबंधितांना संधी दिली जात आहे. संधी देऊनही प्रतिसाद दिला नाही तर पाडकाम करावेच लागणार आहे. ते पाडावे लागणारच आहे, असेही यावेळी आयुक्त डॉ. ओम्बासे यांनी स्पष्ट केले.

### रस्त्यावरील वाढते अतिक्रमण; लवकरच हॉकर्स झोन होणार

सोलापूर शहरात रस्त्याच्या कडेला फुटपाथवर अतिक्रमण करून व्यवसाय करणाऱ्यांची संख्या वाढली आहे. यामुळे वाहतुकीस अडथळा होतो या संदर्भात विचारले असता रस्त्यावरील वाढत्या अतिक्रमण पाहता लवकरच हॉकर्स झोन जाहीर करण्यात येणार आहेत. सोलापूर शहरात सुमारे ६ हजार पथविक्रेते आहेत. या संदर्भात मागील आठवड्यात बैठक झाली. पथविक्रेता समिती गठीत करण्यात आली आहे. राहिलेले प्रतिनिधीही नेमले आहेत. रस्त्यावर अतिक्रमण वाढू नये यासाठी हॉकर्स झोन करण्यात येणार आहेत. प्रत्येक पथविक्रेत्यांना ओळखपत्र दिले जाईल. पाच बाय चार फूट इतकी जागा निश्चित केली जाईल. जागा मार्किंग करून जिओ टॅग करण्यात येणार आहे. दोन महिन्यानंतरही प्रक्रिया पार पाडली जाईल, असे महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी स्पष्ट केले.

### पनाश टॉवर प्रकरणी चौकशी अहवाल लवकरच

विजापूर रोडवरील बहुचर्चित पनाश टॉवर बांधकाम प्रकरणी चौकशी पूर्ण झाली आहे. महापालिका उपायुक्त आशिष लोकरे यांनी ही चौकशी केली आहे. दरम्यान, या समितीमध्ये नगररचना उपसंचालक मनीष भिष्णूरकर यांचाही समावेश करण्यात आला आहे. त्यांच्याकडून अहवाल तयार करण्यात येत आहे. लवकरच तो सादर होईल, असे आयुक्त डॉ. ओम्बासे यांनी सांगितले.

### शासन अनुदान खर्चाचे ऑडिट करण्याच्या सूचना

सोलापूर महापालिकेला केंद्र व राज्य शासनाकडून विविध प्रकारचे अनुदान मिळते. सोलापूर महापालिकेत त्याचे प्री ऑडिट होते मात्र पोस्ट ऑडिट होत नाही. किती अनुदान आले ? किती खर्च झाला? शिल्लक किती ? या संदर्भात ऑडिट होणे आवश्यक आहे. या संदर्भात विचारले असता अनुदान जमा साठी फार्म १३ तर खर्चासाठी फार्म १४ भरण्यात येतो. त्यानुसार मागील वर्षाचे ऑडिट करून घ्यावे, अशा सूचना संबंधित अधिकाऱ्यांना आयुक्तांनी दिल्या आहेत.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.
सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## ज्ञानामृत आनंदलहरी - ११११

**जैसा भ्रमर भेदी कोडें। भलतैसें काष्ठ कोरडें ।**
**परीं कळिकेमाजीं सांपडे । कोंवळिये ।।**

मोह माणसाला उच्च पातळीवरुन नको त्या स्तरापर्यन्त कसे आणतो याचे स्पष्टीकरण माऊली करीत आहेत. मोहामध्ये माणूस स्वत:चे अस्तित्व विसरुन जातो. अस्तित्वच काय, स्वत:चे सर्वस्व हरुन जातो. मोह हे एक असे शस्त्र आहे की ते समोरच्यावर वार न करता स्वत:वर वार करण्यास भाग पाडते. अर्जुन युध्द करण्याच्या मानसिकतेने रणभुमीवर उतरला आहे. कोणाशी युध्द करावे लागणार आहे याचे त्याला पूर्वीच ज्ञान होते. असे असतांनाही प्रत्यक्ष रणभूमीत उतरल्यानंतर शत्रुपक्षाला पाहून अर्जुनाला मोह निर्माण व्हावा हे आश्चर्य वाटण्यासारखे आहे.



मानवी जीवनातही असे अनेक प्रसंग घडत असतात, पण याचे माणसाला आश्चर्य वाटत नाही हे विशेष. माणसाला वाटते की, मी केलेले योग्यच आहे. पत्नी, पती, पुत्र किंवा ईतर जे कोणी असतील त्यांच्या प्रेमापोटी माणूस मोहग्रस्त होतो व हातून नको ते घडत आहे हे त्याला मोहाच्या पडद्याने दिसत नाही. मात्र एके दिवशी त्याचे विपरित परिणाम भोगण्याची वेळ त्याच्यावर येते. मी मी म्हणणारा माणूस कारणवश मोहग्रस्त झाला तर स्वत:चे अस्तित्व संपल्याचेही त्याला भान कसे राहात नाही याची अनेक उदाहरणे आपण पाहातो. मोह माणसाचा सर्वनाश कसे करतो याचे सुंदर स्पष्टीकरण माऊलींनी केले आहे. भ्रमर कठीणातले कठीणलाकूड सहज कोरु शकतो. पण कमळाच्या गाभ्यात बसुन कमळाचा स्वाद घेतांना कमळ मिटत असल्याचे विसरतो. त्या कमळाला पोखरुन बाहेर पडावे असेही त्याला वाटत नाही आणि कमळाच्या गाभ्यात तो अडकून पडतो. त्यात त्याचे सर्वस्व संपते.

माऊलींची ही ओवी आम्हाला भरपूर काही देऊन जाते. मी-मी म्हणणारे लोक किंवा समाजात ज्यांनी लौकिक मिळविला आहे, असे महान व्यक्तीमत्व असलेले मान्यवर सुध्दा बऱ्याच वेळा मोहग्रस्त होऊन स्वत:चे अस्तित्व लयास घेऊन गेलेले आपण पाहातो. समाजाचा आदर्श किंवा आशास्थान असणाऱ्या माणसांकडून जेव्हा मोहग्रस्त होऊन बेधुंद वागण्याच्या घटना घडतात तेव्हा समाजाला मोठा धक्का बसतो. मोठया माणसांच्या मोहग्रस्त होऊन वागण्याचा धक्का समाजाला बसत असेल. पण आपल्या सारख्या सामान्य माणसाच्या मोहापोटी बेधुंद वागण्याने किमान आपल्या संसाराला, आपल्या अस्तित्वाला तरी धक्का बसत असेल, याचा विचार आपण का करु नये ? आपण सुध्दा समाजाचे एक घटक आहोत म्हणून आपण मोहग्रस्त होऊन वागलो तर त्याचा विपरित परिणाम आपल्याबरोबर समाजावरही होतो याचा विचार करायला हवा. स्वत:वर व समाजावर विपरित परिणाम करण्याचा अधिकार कोणालाही नाही याची जाणीव सर्वांना राहावी अशी अपेक्षा माऊलींच्या या ओवी संदर्भाने केली तर योग्य होईल. मनुष्य देहाची महती आपणाला कळली तर चुकीचे पाऊल पडण्याचे कारणच नाही. आपले योग्य पाऊल नेहमी वाढत्या आनंदलहरीकडे नेणारे ठरु शकते.

**जय जय राम कृष्ण हरी।**

**- ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड**
**मो. ९४२२२१६४४८**

## सुप्रभात

### आजचा दिवस

| | |
|---|---|
| वार : शनिवार | दिनविशेष - |
| दि. १० मे २०२५ | शुभ दिवस, |
| विक्रम संवत् २०८१ | स्वामी युक्तेश्वर जन्मदिन |
| शके - १९४७ | ....राहू काल.... |
| संवत्सर - विश्वावसू | रविवार : दु.४.३० ते ६.०० |
| मास - वैशाख | सोमवार : स. ७.३० ते ९.०० |
| शु. त्रयोदशी (१७.२९) | मंगळवार : दु. ३.०० ते ४.३० |
| ऋतु - वसंत | बुधवार : दु. १२ ते १.३० |
| नक्षत्र - चित्रा (२७.१४) | गुरुवार : दु. १.३० ते ३.०० |
| योग - सिध्दी (२८.००) | शुक्रवार : स.१०.३० ते १२ |
| करण - गर (अहोरात्र) | शनिवार : स. ९ ते १०.३० |

### राशीभविष्य

**मेष :** अनावश्यक चिंतापासून दूर रहा. देणे - घेणे पासून सावधानता बाळगा. लोभ - लालचे पासून दूर रहा. धंदा मध्यम राहील. कौटुंबिक परिवारात सुख - शांती मिळेल.

**वृषभ :** मुलांनी केलेल्या कामांमुळे प्रतिष्ठा वाढेल. कामकाजाचा विस्तार होईल. अनावश्यक कामासाठी वेळ वाया घालू नका. प्रयत्न केल्यास थांबलेला पैसा निघून येईल.

**मिथुन:** व्यवसायाच्या विस्तारा संबंधी योजना आखाल. आरोग्याची काळजी घ्या. रोजगारात यश व फायदा मिळण्याची शक्यता.

**कर्क:** अडकलेला पैसा मिळेल. राजकीय व्यक्तींपासून फायदा होईल. वहान चालविताना सावधानीने चालवा. नवीन योजनांची सुरूवात कराल.

**सिंह :** व्यावहारिक अडचणी दूर होतील. विद्यार्थ्यांना आपल्या प्रगतीत वाढ होईल. प्रतिस्पर्धामुळे लाभ होण्याची शक्यता. पत्नीसोबत मतभेद होईल.

**कन्या :** कुटुंबात प्रसन्न वातावरण राहील. व्यापारासाठी प्रवास होण्याचा योग आहे. कामकाजात गुप्तता बाळगा, आर्थिक स्थिती चांगली राहील.

**तुळ :** आवश्यक कामांसाठी पूर्ण वेळ द्यावा. आर्थिक योग चांगला. नोकरीमध्ये उत्साह वाढेल. प्रवास जपून करा. वाचनाची आवड लागेल.

**वृश्चिक :** अनिश्चिततेमुळे अडचणी वाढतील. व्यापारीक वाद, मतभेद होण्याची शक्यता, जबाबदारीचे काम सांभाळून करा, आर्थिक योग मध्यम, कौटुंबिक जीवन सुखी राहील.

**धनु :** योजनेनुसार कामे पार पडणार नाहीत. व्यावसायिक चिंता राहील. मुलांच्या व्यवहारामुळे दु:खी व्हाल. सहयोगी मदत करणार नाहीत.

**मकर :** फायद्याच्या बातम्या ऐकण्यास मिळतील. सामाजिक किंवा राजकीय प्रसिद्धी मिळेल. व्यापार चांगला चालेल. घरासंबंधी समस्या दूर होतील.

**कुंभ :** मागे केलेल्या कामाचे फळ मिळेल. धंद्यात स्वत: निर्णय घेतल्यास निश्चित फायदा. दुसऱ्यांवर विश्वास ठेवू नका.

**मीन:** कर्मा विषयी उत्साह ठेवा. बुद्धी व तर्काने कार्यामध्ये सफलता मिळण्याचे योग आहेत. व्यापारात नवीन योजनेमुळे लाभ होईल.

# डीएड, बीएड शेवटच्या सत्रातील विद्यार्थी टीएआयटी परीक्षेस पात्र

## उमेदवारांना अर्ज सादर करण्यासाठी आज शेवटचा दिवस

### शिक्षक अभियोग्यता, बुद्धिमत्ता चाचणी परीक्षेत सुधारणा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ९ मे-**

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेकडून शिक्षक अभियोग्यता व बुद्धिमत्ता डीएड, बीएड आणि एमएड या अभ्यासक्रमांच्या शेवटच्या सत्रातील परीक्षेस प्रविष्ट असलेल्या उमेदवारांनाही अर्ज करता येणार आहे.

परीक्षा परीषदेकडून परीक्षेच्या तरतुदीत या सुधारणा करण्यात आली आहे. पवित्र संकेतस्थळामार्फत राबविल्या जाणाऱ्या शिक्षक भरती प्रक्रियेसाठी अभियोग्यता आणि बुध्दीमत्ता चाचणी २४ मे ते ६ जून या कालावधीत आयोजित करण्यात येणार आहे. या परीक्षेसाठी पात्र उमेदवारांचे अर्ज मागविण्याची प्रक्रिया सुरू उमेदवारांना ऑनलाइन अर्ज सादर करण्यासाठी १० मे पर्यंत मुदत आहे. मात्र काही विद्यापीठातील निकाल मे महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात आहे. त्यामुळे त्या विद्यार्थ्यांची गैरसोय होणार आहे.

शिक्षक अभियोग्यता व बुध्दीमत्ता चाचणी परीक्षेत प्राप्त केलेले गुण उघड केले जाणार नसुन त्यांचा निकाल राखून ठेवला जाणार आहे. डीएड, बीएड आणि एमएड उमेदवारांनी त्याचवेळी परीक्षा उत्तीर्ण होणे बंधनकारक करण्यात आली आहे.

#### या उमेदवारांकडून विरोध

सोलापूर जिल्ह्यात २०२४-२८ मध्ये शिकणाऱ्या डीएड व बीएड उमेदवारांची संख्या ४०० पेक्षा अधिक आहे. हे सर्व उमेदवार शिक्षक अभियोग्यता व बुध्दीमत्ता परीक्षा देऊ शकतात. त्यामुळे अगोदरच २५ ते ३० हजार डीएड व बीएड शिक्षक भरती प्रक्रियेमध्ये कमी पदाअभावी संधी मिळाले नाही. त्यामुळे या सर्व उमेवारांकडून विरोध होत आहे.

#### शासनाने फेरविचार करावा

गेल्या सात-आठ वर्षामध्ये शिक्षक अभियोग्यता परीक्षा तिस-यांदा आयोजित केली आहे. मंजूर पदांची संख्या जास्त आहे. त्याप्रमाणे उर्वरित रिक्त पदांची भरती पूर्ण व्हावी. यावेळी उर्वरित सर्व जागा भरून भावी शिक्षकांना न्याय देऊन रोजगार उपलब्ध करून द्यावा. राज्यात लाखोच्या संख्येने डीएड, बीएड उमेदवार असताना अद्याप त्यांच्या शैक्षणिक वर्ष संपले नाही. सीटीईटी टीईटी परीक्षा उत्तीर्ण झाले नाही, अशा उमेदवारांना संधी देऊन शासन काय साध्य करणार आहे? त्यामुळे अनेक वर्षांपासुन शिक्षक व्हायचे म्हणून प्रयत्न करणाऱ्या उमेदवारांमध्ये नाराजी आहे. शासनाने याचा सखोल विचार करावे.

**-प्रशांत शिरगूर,** राज्य उपाध्यक्ष, डीएड बीएड असोसिएशन तथा पवित्र पोर्टल संघटना




# स्त्री शक्ती फाऊंडेशनकडून गांधीनगर येथे पाणपोई

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ९ मे-**

अक्कलकोट रोडवरील गांधीनगर नंबर सहा येथे स्त्रीशक्ती सोशल फाउंडेशन संचलित मातोश्री प्रतिष्ठानच्या वतीने पाणपोईची सेवा सुरू करण्यात आली.

कै. सुशीला रामचंद्र माशाळकर यांच्या स्मरणार्थ सामाजिक उपक्रम म्हणून ही सेवा चालू करण्यात आली. सध्या कडक उन्हाळ्याचे दिवस असल्यामुळे या मुख्य रस्त्यावर रहदारी जास्त असल्यामुळे या ठिकाणी येण्या जाणाऱ्या नागरिकांसाठी पीण्याच्या पाण्याची सोय नसल्यामुळे पाणपोई सुरुवात करण्यात आली आहे. माजी महापौर महेश कोठे तसेच स्थायी समितीचे माजी सभापती किरण पवार यांच्या प्रेरणेने सामाजिक बांधिलकी म्हणून या पाणपोई चे उद्घाटन स्त्री शक्ती सोशल फाउंडेशनच्या शहर अध्यक्ष भाग्यश्री राठोड यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी संस्थापिका किरण माशाळकर, अर्चना माशाळकर, स्वाती खरवले, लिंगवा सोलापूरे, शहाबुद्दीन शेख, नुऱ्याबाई नदाफ, रशिदा शेख, शबाना शेख ,चंदाबाई उबाळे, शिवाजी कणसे, फिरोज शेख, शकील शेख आदी उपस्थित होते. शेवटी माजी नगरसेवक नारायण माशाळकर यांनी सर्वांचे आभार मानले.

# मराठी ग्रामीण साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी डॉ. शिवाजी शिंदे

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ९ मे-**

कवी सरकार स्वाभिमानी वाचनालय, इंगळी व पसायदान प्रतिष्ठान, गुहागर यांच्या वतीने आयोजित २४ व्या छत्रपती शंभूराजे समाज प्रबोधन मराठी ग्रामीण साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठामध्ये सहायक कुलसचिव व मराठी भाषा दक्षता अधिकारी म्हणून कार्यरत असलेले डॉ. शिवाजी शिंदे यांची निवड करण्यात आली आहे.



हे साहित्य संमेलन ११ मे रोजी भारत मंदिर सभागृह, कोल्हापूर येथे होणार आहे.

डॉ. शिंदे यांनी विविध आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय आणि राज्यस्तरीय कार्यशाळा, परिषदा आणि चर्चासत्र यामध्ये सहभाग व शोधनिबंध वाचन केले. विद्यापीठाच्या विविध २० समितीत्यांवर त्यांनी कार्य केले आहे. यापूर्वी त्यांनी ५ वे शिवार साहित्य संमेलन, मंगळवेढा आणि २० वे मराठी ग्रामीण साहित्य संमेलन खैराव अशा दोन साहित्य संमेलनाचे अध्यक्षस्थान भूषविले आहे.

# कर्मवीरांच्या कार्यामुळे ग्रामीण भागाचे चित्र पालटले : आयुक्त डॉ. ओंबासे

### रयत शिक्षण संकुलाच्या वतीने पुण्यतिथी निमित्त अभिवादन कार्यक्रमात प्रतिपादन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ९ मे-**

कर्मवीर भाऊराव पाटील यांनी बहुजन समाजातील मुलां मुलींच्या शिक्षणासाठी रयत शिक्षण संस्थेची स्थापना केली. स्वावलंबी शिक्षणाचा मंत्र दिला. कमवा व शिका योजना कार्यान्वित केली. त्यामुळे विद्यार्थ्यांना शिक्षण मिळाले. त्यातून ग्रामीण भागातील जनजीवनाचे चित्र पालटले. त्यामुळे पुरोगामी महाराष्ट्राची निर्मिती झाली असे प्रतिपादन सोलापूर महानगरपालिका आयुक्त डॉ. सचिन ओंबासे यांनी व्यक्त केले.

लक्ष्मीबाई भाऊराव पाटील महिला महाविद्यालय, रावजी सखाराम हायस्कूल, ज्युनिअर कॉलेज, प्राथमिक विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या ६६ व्या पुण्यतिथीनिमित्त सम्राट चौकातील पुतळ्यास पुष्पहार अर्पण केल्यानंतर आयोजित केलेल्या कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ सोलापूर येथील परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. श्रीकांत अंधारे, प्रभारी कुलसचिव डॉ अतुल लकडे, आनंद चंदनशिवे, उद्योजक केतन शहा, लक्ष्मी उद्योग समूहाच्या माधुरी पाटील, प्रख्यात करसल्लागार धीरज जवळकर, राजकीय विश्लेषक डॉ श्रीकांत येळेगावकर, प्राचार्य डॉ. राजेंद्रसिंह लोखंडे, मनपा उपायुक्त तैमूर मुलाणी, ओम प्रकाश वाघमारे, अंत्रोळीकर, डॉ अस्मिता बालगावकर, मुख्याध्यापीका काशीबाई पुजारी, मुख्याध्यापक संजय जोशी, वसंत नागणे, इतिहास संशोधक नितीन अणवेकर, प्रा उत्तमराव हुंडेकर आदी मान्यवर उपस्थित होते.



पुढे ओंबासे म्हणाले की कर्मवीरांनी आपल्या संस्थेच्या वस्तीगृहात ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांची निवासाची व भोजनाची व्यवस्था केली. कठीण प्रसंगी वस्तीगृहातील मुलांच्या भोजन खर्चासाठी त्यांच्या पत्नी लक्ष्मीबाई पाटील यांनी आपल्या गळ्यातील मंगळसूत्र देखील मोडले. प्रास्ताविक संतोष वालवडकर यांनी केले सूत्रसंचलन वंदना डांगे यांनी केले तर आभार अमर देशमुख यांनी मानले. कार्यक्रम प्रसंगी योगासन राष्ट्रीय खेळाडू जानवी चंदनशिवे व तायक्कांदो खेळाडू दिव्या कोणे व प्रशिक्षक सोमनाथ बनसोडे यांचा सत्कार करण्यात आला.

# उद्या जिल्हास्तरीय चित्रकला स्पर्धा

### किल्ला बागेमध्ये होणार तीन गटात मोफत स्पर्धा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ९ मे-**

बोधीवृक्ष फाउंडेशन , महाकारुणिक एज्युकेशनल फाउंडेशन आणि मूलनिवासी सभ्यता संघ यांच्या संयुक्त विद्यमाने रविवार दि. ११ मे रोजी सकाळी ७.३० ते ९.३० पर्यंत सोलापुरात चार हुतात्मा पुतळा चौकालगतच्या किल्ला बागेमध्ये जिल्हास्तरीय चित्रकला स्पर्धा आयोजित केली आहे, अशी माहिती स्मिता आबुटे यांनी पत्रकार परिषदेत दिली.

खुला, मोठा आणि लहान अशा तीन गटांमध्ये ही स्पर्धा मोफत राहणार आहे. लहान गट वय वर्षे १२ पर्यंत आहे. महाबोधी विहाराचे काढलेले चित्र दिले जाईल. त्यात त्यांनी रंगभरण करायचे आहे. मोठा गट वय वर्षे १२ ते १८ असून त्यांनी महाबोधी विहाराचे चित्र काढावयाचे आहे. खुला गट वय वर्ष अठराच्या पुढील असून त्यांनी कोऱ्या कागदावर भारतातील बौद्ध स्थळे व स्तूप आणि लेण्या किंवा बुद्धांच्या जीवनातील एक प्रसंग या संकल्पनेवर चित्र काढून रंगवायचे आहे. स्पर्धकांना चित्र काढण्यासाठी फक्त कागद पुरवले जातील. रंग, ब्रश, पॅड/स्टॅण्ड इत्यादी साहित्य त्यांनी स्वतः आणायचे आहे. खुल्या गटासाठी हॅन्डमेड ३८ बाय ५६ से. मी. कागद दिला जाणार आहे.

कार्यक्रमाच्या ठिकाणी लगेच बक्षीस वितरण करण्यात येईल. सर्व सहभागी स्पर्धकांना प्रमाणपत्र देण्यात येणार आहे. या स्पर्धेसाठी नाव नोंदणी आवश्यक आहे. नावे नोंदण्याची अंतिम तारीख दि. १० मे रोजी सायंकाळी ५ वाजेपर्यंत आहे. नांव नोंदणी अमोल वाघमारे - ८२७५९९५३५५, स्मिता आबुटे - ९६६५८३८७२० या मोबाईल नंबर वर करावी. या पत्रकार परिषदेस राजरत्न फडतरे, संजय आबुटे, अमोल वाघमारे, उमाकांत राजगुरू आदी उपस्थित होते.

# संवैधानिक मूल्ये जपणाऱ्या समाजाची गरज : किरण बनसोडे

### सम्यक प्रज्ञा शोध शिष्यवृत्तीचे वाटप

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ९ मे-**

भारतीय संविधान हे केवळ कायद्याचं पुस्तक नसून, एक मूल्याधारित जीवनशैली आहे. आजच्या काळात सामाजिक सलोखा, समता, बंधुता आणि न्याय यांची जपणूक होणे अत्यावश्यक असून त्यासाठी संवैधानिक मूल्य जपणारा समाज निर्माण झाला पाहिजे, असे प्रतिपादन सोलापूर महापालिका पत्रकार संघाचे अध्यक्ष किरण बनसोडे यांनी केले.




सम्यक अकॅडमी आणि लोकराजा फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने म. फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या संयुक्त जयंतीनिमित्त घेण्यात आलेल्या सम्यक प्रज्ञाशोध परीक्षेच्या शिष्यवृत्ती वाटप समारंभ प्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी महाराष्ट्र राज्य बहुजन शिक्षक महासंघाचे प्रदेशाध्यक्ष अण्णासाहेब भालशंकर हे होते. विचारमंचावर डॉ. बाबासाहेब आंबेडकर विचार संवर्धन समिती मुंबईचे अध्यक्ष शशिकांत जाधव, युवा उद्योजक अमोल शिंदे, पुरातत्व विभाग मुंबईचे सुरेंद्र शेंडे, दूरदर्शनचे निवृत्त अधिकारी कपिल ढोरे, भागवत कुवळेकर यांची उपस्थिती होती. एकूण रुपये २५ हजारांची शिष्यवृत्तीचे वाटप यावेळी करण्यात आले. कार्यक्रमासाठी सविता कुवळेकर, लोकराजा फाउंडेशनचे अध्यक्ष आशुतोष तोंडसे, प्रा.पल्लवी मेश्राम यांचीही उपस्थिती होती. सूत्रसंचालन बुद्धजय भालशंकर यांनी केले तर निर्मला मौळे यांनी आभार मानले.

# माता रमाईच्या क्ले मॉडेल पुतळ्याची नेत्यांकडून पाहणी



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ९ मे-**

सोलापुरात डॉ. आंबेडकर उद्यानात बसविण्यात येणाऱ्या माता रमाई आंबेडकर यांच्या पुतळ्याच्या क्ले मॉडेलची पाहणी आज विविध पक्ष, संघटना आणि मध्यवर्ती महामंडळाच्या पदाधिकाऱ्यांनी पुण्यात केली.

चेहऱ्यामध्ये बदल करावा तसेच मूळ स्वरूपात हा पुतळा असावा यासह विविध सूचना करण्यात आल्या.

### चेहऱ्यामध्ये बदलासह इतर केल्या सूचना

सोलापुरात सम्राट चौक नजीक डॉ. बाबासाहेब आंबेडकर उद्यानात माता रमाई आंबेडकर यांचा पुतळा बसविण्यात येणार आहे. मूर्तिकार सुभाष अलाट यांच्या पुण्यातील आल्हाट आर्ट स्टुडिओमध्ये या पुतळ्याचे क्ले मॉडेल तयार करण्यात आले आहे. दरम्यान, त्यास विविध पक्ष आणि मध्यवर्ती महामंडळाने हरकत घेतली होती. मूळ स्वरूपात हा पुतळा असावा, अशी मागणी निवेदनाद्वारे महापालिका आयुक्तांकडे केली होती.

दरम्यान, आज ज्येष्ठ नेते आणि पदाधिकाऱ्यांनी या पुतळ्याच्या क्ले मॉडेलची पुणे येथील मूर्तिकार सुभाष अलाट यांच्या आल्हाट आर्ट स्टुडिओ या ठिकाणी जाऊन पाहणी केली. पुतळ्याच्या चेहऱ्यामध्ये बदल करण्यात यावा. मूळ स्वरूपात हा पुतळा करण्यात यावा आदी सूचना केल्या. पुतळा हा मूळ स्वरूपात आणि सर्वांना मान्य होईल अशा स्वरूपात बनविण्यास सांगण्यात आले.

यावेळी रिपाइं (ए) चे प्रदेश अध्यक्ष राजाभाऊ सरवदे, सुबोध वाघमोडे, के.डी. कांबळे, माजी नगरसेवक अरुण भालेराव, अजित गायकवाड, राजा कदम, नागेश रणखांबे, शिवम सोनकांबळे, महेश गजधने, नागेश तळकेरी तसेच भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर मध्यवर्ती जयंती उत्सव व विश्वस्त समितीतील सदस्य उपस्थित होते. त्याचबरोबर बहुजन समाज पार्टीचे पश्चिम महाराष्ट्र झोन इन्चार्ज ॲड. संजीव सदाफुले, आप्पासाहेब लोकरे, जिल्हाध्यक्ष बबलु गायकवाड, शहर अध्यक्ष देवा उघडे,शहर प्रभारी सुहास सुरवसे, शहर युवक अध्यक्ष अमर साळवे, प्रविण गायकवाड, कामगार नेते अशोक जानराव तसेच भारतीय बौद्ध महासभेचे जिल्हाध्यक्ष आण्णासाहेब वाघमारे, शारदा गजभिये, महापालिकेचे कनिष्ठ अभियंता प्रशांत गुंड आदी उपस्थित होते.

# खासगी शाळांमधील रोस्टर तपासणी करा

### युवा पँथरची मागणी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ९ मे-**

जिल्ह्यातील खाजगी प्राथमिक आणि माध्यमिक शाळांमध्ये शासनाच्या नियमांनुसार रोस्टरची तपासणी करण्याची मागणी युवा पँथर सामाजिक संघटनेनी केली आहे.

अनेक वर्षांपासून रोस्टर तपासणी झाले नाही. यामुळे सामाजिक न्यायाच्या मूल्यांचे उल्लंघन होत आहे आणि गुणवत्ता असूनही अनेक पात्र उमेदवार त्यांच्या हक्काच्या संधीपासून वंचित राहत आहेत. बिंदू नामावलीचे नियम हे आरक्षित जागांवर योग्य आणि पारदर्शक पद्धतीने भरती सुनिश्चित करण्यासाठी अत्यंत महत्त्वाचे आहेत. या नियमांनुसार १०० बिंदूंची चक्रानुक्रम, आरक्षणानुसार जागा निश्चित करणे, गुणानुक्रमानुसार निवड आणि नोंदवही अद्ययावत ठेवणे बंधनकारक आहे.

मात्र अनेक शाळा या नियमांचे उल्लंघन करत असल्याचे निदर्शनास आले आहे.रोस्टर तपासणी वेळेवर न झाल्यामुळे अनेक वर्षांपासून पात्र उमेदवार शासकीय नियमांनुसार असलेल्या आरक्षणाच्या लाभापासून वंचित आहेत. तपासणी प्रक्रिया थांबवण्यामागील कारणे गुलदस्त्यात आहेत, ज्यामुळे संशयाचे वातावरण निर्माण झाले आहे. सोलापूर जिल्ह्यातील सर्व खासगी प्राथमिक आणि माध्यमिक शाळांची रोस्टर तपासणी तातडीने करण्यासाठी एका विशेष, स्वतंत्र आणि पारदर्शक पथकाची नियुक्ती करावी. या पथकात शिक्षण विभागातील कर्तव्यदक्ष आणि निष्पक्ष अधिकाऱ्यांचा समावेश करावा, जेणेकरून कायद्याचे पालन होईल आणि पात्र उमेदवारांना न्याय मिळेल. शिक्षण विभागाने योग्य कार्यवाही न केल्यास, युवा पँथर सामाजिक संघटनेकडून लोकशाही मार्गाने आंदोलन करण्यात येईल, असा इशारा बनसोडे यांनी दिला.

## महत्वाचे...



### मंगळवेढा केंद्रात निकीता आवताडे प्रथम; केंद्रात तिन्हीही मुलींची गरुड झेप

**मंगळवेढा, दि.९ मे-**

बारावी परिक्षेत मंगळवेढा केंद्रामध्ये दामाजी कॉलेज वाणिज्य विभागाची विद्यार्थिनी निकीता आवताडे हि ८८.१७ टक्के गुण घेवून प्रथम आली. तर न्यू इंग्लिश स्कूल कॉलेजची विद्यार्थिनी प्रणवी पाटील ८६ टक्के (वाणिज्य) व्दितीय, तसेच याच कॉलेजची विद्यार्थिनी प्राची ओमने ८१.१७ टक्के (शास्त्र) गुण घेवून अनुक्रमे तृतीय आली. दरम्यान मंगळवेढा तालुक्यात तिन्हीही मुली अनुक्रमे केंद्रात आल्याने शिक्षण क्षेत्रात मुलींची मान उंचावली आहे. दामाजी कॉलेजमध्ये २५८ विद्यार्थी परीक्षेस बसले होते, त्यापैकी २०९ विद्यार्थी पास झाले आहेत. कॉलेजचा निकाल ८१ टक्के आहे. यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थाध्यक्ष राहुल शहा, उपाध्यक्ष बाबासाहेब पाटील, सचिव किसन गवळी, प्राचार्य डॉ.औदुंबर जाधव, उपप्राचार्य प्रा.राजेंद्र गायकवाड, सर्व प्राध्यापक वर्ग, शिक्षकेतर कर्मचारी आदींनी मुला मुलींचे अभिनंदन केले. न्यू इंग्लिश कॉलेजची विद्यार्थिनी प्रणवी पाटील (वाणिज्य) हिने ८६ टक्के तर शास्त्र शाखेची प्राची ओमने ८१.१७ टक्के गुण घेवून केंद्रामध्ये अनुक्रमे व्दितीय व तृतीय आली. दरम्यान शास्त्र शाखेचा निकाल ९१.१२ टक्के, व्यवसाय शिक्षण विभागाचा ५१.९४ टक्के लागला आहे. यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थाध्यक्ष ॲड. सुजित कदम, उपाध्यक्ष सुभाष कदम, सचिव डॉ.प्रियदर्शनी महाडिक, डॉ.मिनाक्षी कदम, सहसचिव श्रीधर भोसले, संचालिका तेजस्विनी कदम, अजिता भोसले, खजिनदार राम नेहरवे, प्राचार्य रविंद्र काशिद आदींनी मुला मुलींचे यशाबद्दल अभिनंदन केले.



### अक्कलकोट प्रभाग ८ मध्ये स्वच्छता मोहीम

**अक्कलकोट, दि. ८ मे-**


अक्कलकोट येथील प्रभाग ८ येथे आज दिनांक ८ मे रोजी सामाजिक कार्यकर्ता चेतन शिंदे यांच्या मागणीनुसार स्वच्छता अभियान राबवण्यात आली यावेळी नेहरू गल्ली, रजाक टेकडी परिसर, शहाजी वाचनालय येथील परिसर, फस्के गल्ली येथील ड्रेनेज व गटारी नगरपालिकेच्या वतीने स्वच्छ करण्यात आल्या यावेळी ही स्वच्छता मोहीम वार्डाचे विद्यमान नगरसेवक माननीय श्री सुभाष बापू पुजारी यांच्या मार्गदर्शनाखाली व तसेच मुकादम सुभाष कांबळे साहेब यांच्या सहकार्याने यशस्वीरित्या पार पाडण्यात आली. यावेळी नगरपालिकेच्या वतीने सुभाष कांबळे व सुपरवायझर मुक्तूम शेख व परशुराम कांबळे, चेतन शिंदे तसेच त्यांचे नगरपालिकेचे स्वच्छता कर्मचारी यांच्या प्रयत्नांनी यशस्वी रित्या पार पाडली.



### काझी यांना आदर्श शिक्षक पुरस्कार प्रदान

**मंगळवेढा, दि.९ मे-**

येथील शिक्षण प्रसारक मंडळ संचलित इंग्लिश स्कूलमधील सहशिक्षक आशपाक काझी यांना उल्लेखनीय शैक्षणिक कार्याबद्दल आदर्श शिक्षक पुरस्कार प्रदान करण्यात आला. मंगळवेढा महोत्सव कार्यक्रमामध्ये हा पुरस्कार देण्यात आला. यावेळी शि. प्र. मंडळाचे अध्यक्ष ॲड. सुजीत कदम, प्रा. तेजस्विनी कदम, संचालक श्रीधर भोसले, राम नेहरवे, यतिराज वाकळे, दलितमित्र कदम गुरुजी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.राजेंद्र गायकवाड उपस्थित होते. श्री. काझी हे इंग्रजीचे शिक्षक आहेत. राज्यात विविध ठिकाणी त्यांनी इंग्रजीचे तज्ञ मार्गदर्शक म्हणून हजेरी लावलेली आहे. इ.एस.एम.९०-९२ ग्रुपच्यावतीने आशपाक काझी यांचे अभिनंदन करण्यात आले.




### वटवृक्ष मंदिरात अचंबीत लघु चित्रपटाच्या पोस्टरचे प्रकाशन

**अक्कलकोट, दि. ९ मे-**

श्री स्वामी समर्थांचे चरित्रवर आधारित अचंबित या लघु चित्रपटाचे पोस्टरचे प्रकाशन श्री वटवृक्ष स्वामी महाराज मंदिरात महेश इंगळे यांच्या हस्ते या पोस्टरचे प्रकाशन करण्यात आले. कोकण भागातील व कर्नाटक भागातील छोट्या पडदावरील कलाकारांनी सामूहिकरित्या एकत्र येऊन श्री स्वामी समर्थांचे चरित्रवर आधारित अचंबित या लघु चित्रपटाचे पोस्टर प्रकाशन करण्यात आले. याप्रसंगी बोलताना कुमार जाधव यांनी म्हणाले की, के.जे.क्रिएशन निर्मित कर्नाटकातील पहिला मराठी लघू चित्रपट स्वामी समर्थ महाराज ह्यांच्या लीलांवरती आधारित आहे. अंचबीत बेळगांव सहित संपूर्ण महाराष्ट्र व इतर राज्यामध्ये युट्यूब व इतर डिजिटल मीडियावर थोड्याच दिवसात प्रदर्शित होत आहे. त्याचे आज पोस्टर अक्कलकोट निवासी श्री स्वामी समर्थ ह्यांचा आशीर्वाद घेऊन स्वामीच्या दरबारात मंदिराचे चेअरमन महेश इंगळे ह्यांच्या हस्ते शुभारंभ करण्यात आले आहे. यावेळी या लघु चित्रपटातील भूमिका साकारलेले प्रसिद्ध बेळगाव व सावंतवाडीचे कलाकार डायरेक्टर कुमार जाधव, निर्मात्या किर्ती जाधव, कलाकार श्री स्वामी समर्थ भूमिका महेश गुरव, किर्ती जाधव, राजाराम तलवार चंद्रहास राहुळ, मयुरेश हवालदार, तृप्ती पाटील, डॉ.मेघा भंडारी, डॉ. सुकिर्त भंडारी, तुकाराम पवार उपस्थित होते.

# दुधाळ गाय-म्हैस अन् शेळी-मेंढीसाठी अनुदान

**२ जूनपर्यंत ऑनलाइन अर्ज करण्याचे आवाहन**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ९ मे**

जिल्हा परिषदेच्या पशुसंवर्धन विभागामार्फत विविध योजनांच्या माध्यमातून पशुपालकांना अनुदानावर दुधाळ गायी-म्हशी, शेळी-मेंढी गट, कुक्कुट पालन तसेच निवारा शेड दिले जाते. यासाठी ३ मे ते २ जून ऑनलाइन अर्ज करण्याचे तसेच पशुसंवर्धन विभागांतर्गत विविध वैयक्तिक लाभाच्या योजनांसाठी अर्ज करण्याचे आवाहन जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांनी केले आहे.

दरम्यान, जिल्हा परिषदेने विविध योजना व उपक्रमांच्या माध्यमातून ग्रामीण भागातील पशुपालक, शेतकरी बांधवांना स्वयंरोजगाराचे साधन उपलब्ध करून देण्यासाठी राज्यस्तरीय नावीन्यपूर्ण योजनेमध्ये गेली तीन वर्षे ऑनलाइन पद्धतीने अर्ज मागविणे व लाभार्थी निवड करण्याची पद्धत सुरु करण्यात आली आहे. आता याबरोबरच जिल्हास्तरीय विविध योजनांसाठी सदर संगणक प्रणाली लागू करण्यात येत आहे. शासनाच्या https://ah.mahabms.com यावर किंवा AH-MAHABMS यावर अर्ज करावा. २ जूनपर्यंत ऑनलाइन अर्ज स्विकारले जाणार आहेत. पशुधन विकास अधिकारी (विस्तार), पंचायत समिती, जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी अथवा जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त कार्यालय, जिल्हा पशुवैद्यकीय सर्वचिकित्सालय, तालुका लघु पशुवैद्यकीय सर्वचिकित्सालय अथवा नजीकच्या पशुवैद्यकीय केंद्रावर संपर्क साधण्याचे असे आवाहन जिल्हा परिषदेचे जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी डॉ. एन. एल नरळे यांनी केले आहे..



**अनुदानावर गाय, म्हैस, शेळी-मेंढी गट**

नावीन्यपूर्ण राज्यस्तरीय व जिल्हास्तरीय योजनेंतर्गत दुधाळ गाई-म्हशी, शेळी-मेंढी गट वाटप करणे, पक्ष्यांच्या संगोपनासाठी निवारा शेड उभारणीत अर्थसाहाय्य देणे, १०० कुक्कुट पिलांचे वाटप व २५-३ तलंगा गट वाटप या योजनांसाठी ऑनलाइन पद्धतीने लाभार्थी निवड प्रक्रिया सन २०२४-२०२७ व २०२५-२०२६ या वर्षात राबविली जाणार आहे.

शासनाने एखाद्या योजनेकरिता अर्ज केल्यानंतर त्यास दरवर्षी पुन्हा अर्ज करावा लागू नये, यासाठी तयार केलेली प्रतीक्षा यादी पुढील ५ वर्षांपर्यंत म्हणजे २०२५-२६ लागू ठेवण्याची सोय केली आहे. यामुळे अर्ज केलेल्या पशुपालकांना लाभ मिळण्याची शक्यता आहे,

पशुपालकांना डेअरी, पोल्ट्री किंवा शेळीपालन यापैकी ज्या बाबीमध्ये अर्ज करावयाचा आहे. त्यांची निवड करण्याची सुविधादेखील उपलब्ध करून देण्यात आली आहे. जिल्ह्यातील पशुपालक, शेतकरी बांधव, सुशिक्षित बेरोजगार युवक, युवती व महिलांनी या योजनांचा लाभघेण्यासाठी २ जून २०२५ पर्यंत ऑनलाइन पद्धतीने अर्ज दाखल करावा. अधिक माहितीसाठी पशुसंवर्धन विभाग, जिल्हा परिषद, सोलापूर येथे भेट द्यावी.

**- संदीप कोहिणकर , अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सोलापूर**

### मराठी भाषिकांचा आवाज बुलंद : चव्हाण

**सोलापूर, दि. ९ मे-**

व्यवसाय आणि नोकरीनिमित्त दुबईत राहणाऱ्या दीड लाख मराठी भाषिकांकरिता नुकतीच महाराष्ट्र परिषदेची स्थापना केली गेली. संयुक्त अरब अमिरातीत राहणाऱ्या भारतीय नागरिकांनी स्थापन केलेल्या इंडियन पीपल्स फोरम या व्यापक संस्थेची अंगीकृत संस्था म्हणून ही परिषद कार्यरत राहणार आहे. भारतीय जनता पार्टीचे महाराष्ट्र प्रदेश कार्यकारी अध्यक्ष रविंद्र चव्हाण यांच्या प्रमुख उपस्थितीत दुबईत महाराष्ट्र कौन्सिलची मुहूर्तमेढ रविवार, दि ४ मे रोजी रोवली गेली. यावेळी ते बोलत होते. चव्हाण म्हणाले की महाराष्ट्र काउन्सिलच्या महा हेल्पलाइन आणि युनायटेड महाराष्ट्र प्लॅटफॉर्म या अत्यंत महत्त्वाच्या उपक्रमांमुळे दुबईस्थित मराठी माणसांचा आवाज अधिक बुलंद होईल आणि त्यांचे प्रश्न सोडवण्यासाठी अधिक बळ मिळेल.

### मारहाणप्रकरणी पती-पत्नी विरुध्द गुन्हा

**मंगळवेढा, दि. ९ मे-**

तु माझे पैसे आत्ताच दे असे म्हणून एकास शिवीगाळ करुन लाथाबुक्क्याने व दगडाने मारहाण केल्याप्रकरणी परमेश्वर आठवले, पौर्णिमा आठवले या पती-पत्नी विरुध्द मंगळवेढा पोलीसात गुन्हा दाखल झाला आहे. पोलीस सुत्रांच्या माहितीनुसार यातील फिर्यादि हरी गौतम आठवले (रा. नंदूर) व वरील आरोपी हे नात्याने भाऊ व भावजय असून दि.३ मे रोजी रात्री ९ वाजता फिर्यादीचा भाऊ परमेश्वर येवून म्हणाला, माझ्या तुझ्याकडे राहिलेले वीस हजार रुपये कधी देतो ? त्यावेळी फिर्यादी त्यास तुला तुझे पैसे पुढील महिन्यात देतो असे म्हणाला. त्यावेळी आरोपीने फिर्यादीस तु माझे पैसे आत्ताचे आत्ता दे असे म्हणून शिवीगाळ करुन लाथाबुक्यांनी मारहाण केली. याचा अधिक तपास पोलीस हवालदार नवले हे करीत आहेत.

# कल्याणशेट्टी महाविद्यालयात यशस्वी विद्यार्थ्यांचा सत्कार

**तभा वृत्तसेवा**
**अक्कलकोट दि ९ मे-**

फेब्रुवारी २०२५ मध्ये घेण्यात आलेल्या बारावी बोर्ड परीक्षेत सुरेखा कल्याणशेट्टी उच्च माध्यमिक विद्यालयाचा ८४.५४ टक्के इतका लागला आहे. त्यात विज्ञान शाखेत ९० पैकी ८७ विद्यार्थी उत्तीर्ण होऊन ९६.६६ टक्के निकाल लागल असून त्यात प्रथम मनिषा कदम ६९.१७ टक्के, द्वितीय श्रेया मोरे ६७.८३ टक्के तर तृतीय राजनंदिनी स्वामी ६७.५० टक्के घेऊन बाजी मारले आहेत.

कला शाखेत ४६ पैकी २९ विद्यार्थी उत्तीर्ण होऊन ६३.०४ टक्के निकाल लागला आहे. त्यात प्रथम शुभांगी कोरे ८७.८३ टक्के, वैभवी धर्मसाले ८२.३३ टक्के तर तृतीय संजीवनी सुतार ७५ टक्के गुण मिळवून यशस्वी झाले आहेत. तर वाणिज्य शाखेत ७१ पैकी ५९ विद्यार्थी उत्तीर्ण होऊन ८३.०९ टक्के निकाल लागला असून प्रथम भूमिका पाटील ७९.३३ टक्के द्वितीय शरणप्पा लक्ष्मण वाले ७७.६७ टक्के तर तृतीय सुजाता अप्पाराव पाटील ७३.३३ टक्के गुण मिळवून यश संपादन करून याहीवर्षी गुणवत्तेची परंपरा कायम राखली आहे. यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष तथा आमदार सचिन कल्याणशेट्टी यांनी अभिनंदन केले आहे. यशस्वी विद्यार्थ्यांचे व मार्गदर्शक सर्व शिक्षकांचे संचालक मल्लीनाथ कल्याणशेट्टी, संचालिका शांभवी कल्याणशेट्टी यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी संचालक मल्लिकार्जुन मसुती, कनिष्ठ महाविद्यालय प्रमुख पूनम कोकळगी, सेमी विभाग प्रमुख रूपाली शहा, संचालक मल्लिकार्जुन मसुती, प्राचार्य राजेंद्रसिंह लोखंडे, मुख्याध्यापक मलकप्पा भरमशेट्टी हे उपस्थित होते. सूत्रसंचलन प्रा. गुरूसिध्द हपाळे यांनी केले तर प्रा. शितल टिंगरे यांनी आभार मानले.



# बार्शी पोलीस ठाण्याकडील बेवारस वाहनांचा होणार लिलाव

**पो.नि. बालाजी कुकडे यांची माहिती**

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. ९ मे-**

बार्शी शहर पोलीस ठाणे आवारात अनेक वर्षांपासून बेवारस वाहने जमा करण्यात आली आहेत. या वाहनांचा जाहीर लिलाव होणार असल्याची माहिती पोलीस निरीक्षक बालाजी कुकडे यांनी दिली. या वाहनांची कायदेशीर प्रक्रिया पूर्ण होऊन तहसीलदार तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी, बार्शी यांनी वाहनांच्या मालकी हक्काबाबत १ मेपासून १५ दिवसांच्या आत बार्शी शहर पोलीस ठाण्याकडे जमा असलेल्या वाहनांची मालकी हक्क शाबीत करुन घेऊन जावे. वाहने घेऊन न गेल्यास त्या वाहनांचा जाहीर लिलाव करण्यात येणार आहे. लिलावातून येणारी रक्कम शासन जमा करण्यात येणार आहे. वाहनांच्या यादीमध्ये मोटारसायकल, टोरिक्षा, चारचाकी वाहनांचा समावेश असून, ही यादी पोलीस ठाणे व तहसील कार्यालय येथील नोटीस बोर्डवर लावण्यात आलेली आहे. वाहनांच्या मालकांनी वाहनाबाबतच्या कागदपत्रांसह पोलीस ठाणे येथे हजर राहून अर्ज करावा. पंधरा दिवसांच्या आत मालकी हक्काबाबत दावा करण्यात यावा. त्यानंतर त्यांचे अर्ज ग्राह्य धरले जाणार नाहीत. नंतर वाहनांचा जाहीर लिलाव करण्यात येणार आहे. याबाबत काही माहिती हवी असल्यास नागरिकांनी बार्शी शहर पोलीस ठाणे कमांक ०२१८४ २२३३३३, पोलीस उपनिरीक्षक महेश गळगटे ९५०३७८५०९०, पोलीस हवालदार सचिन कदम ८६६९५०२२९६ यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन कुकडे यांनी केले आहे.

### सुळेवाडी येथील अहिल्यादेवी सिंचन विहीरीचे अनुदान देण्याची मागणी

**तभा वृतसेवा,**
**पिलीव, दि. ९ मे-**

माळशिरस तालुक्यातील सुळेवाडी गावामध्ये रोजगार हमी योजनेअंतर्गत १० ते १२ लाभार्थीना अहील्यादेवी सिंचन विहीर योजनेअंतर्गत विहरीची रितसर मंजुरी देणयात आली आहे. शेतकऱ्यांनी पदरमोड करुन विहीरीचे खोदकाम सुरु केले आहे. व रितसर पंचायत समिती माळशिरस याठिकाणी बिले मागणी केली आहे.

मात्र बिलाची मागणी करुनही बारापैकी फक्त एकाच लाभार्थ्यांला दोन हप्ते मिळाले आहेत. बाकीच्या एकाही लाभार्थ्यांना एकही हप्ता मिळालेला याबाबत वारंवार माळशिरस येथील पंचायत समिती कार्यालयातील रोजगार हमी विभागाकडे विचारणा केली मात्र सदरच्या एकाही लाभार्थ्यांना अहील्यादेवी सिंचन विहीरीचे हप्ते मिळाले नाहीत. सदरचे लाभार्थी शेतकरी गरीब आहेत सध्या पैसे



नसल्यामुळे विहीरीची कामे थांबली आहेत. तरी वरील शेतकऱ्यांनची बिले ताबडतोब द्यावीत, अन्यथा पंचायत समिती कार्यालयासमोर सर्व शेतकरी उपोषणास बसणार असल्याचा इशारा युवा नेते विक्रम सुळे यांनी निवेदनादवारे गटविकास अधिकारी माळशिरस पंचायत समिती यांना दिला आहे.

### उजनीनगर शाळेच्या इमारतीचा प्रश्न मार्गी

**माजी उपसरपंच वैभव कुटे यांची माहिती**

**तभा वृत्तसेवा,**
**टेंभुर्णी, दि. ९ मे-**

उजनीनगर (टे) येथील जिल्हा परिषद प्राथमिक केंद्र शाळेला जागा व सुसज्ज इमारत मिळावी यासाठी केलेला प्रयत्न सामान्य मुलांच्या शिक्षणासाठी आहे यातून कोणतेही श्रेय घेण्याचा प्रयत्न नसल्याचे टेंभुर्णीचे माजी उपसरपंच वैभव कुटे यांनी पत्रकार परिषदेत सांगितले.

यावेळी माजी सरपंच प्रमोद कुटे, विलास देशमुख, महेंद्र वाकसे व टेंभुर्णीतील प्रमुख कार्यकर्ते उपस्थित होते. येथील शाळेच्या जागेबाबत श्रेयवादाबाबत चर्चा सुरू आहेत. त्याअनुषंगाने श्री. कुटे यांनी मत मांडले. ते म्हणाले, शाळेची इमारत धोकादायक असून ती जागा न्यायालयीन प्रविष्ट असल्यामुळे त्या ठिकाणी बांधकाम करता येत नाही. त्यामुळे पर्यायी जागेच्या शोधात होतो. सध्याच्या धोकादायक शाळेचे स्ट्रक्चरल ऑडिट सुद्धा झाले आहे. बेंबळे रोडवरील पशुवैद्यकीय दवाखान्याची जिल्हा परिषदेची ४३ गुंठे खुली जागा शाळेला देण्यासाठी खासदार धैर्यशील मोहिते पाटील यांनी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांना लेखी पत्र दिले. मुख्याध्यापकांनीही लेखी पत्र दिले आहे. त्या अनुषंगाने मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम, शिक्षणाधिकारी कादर शेख व गटशिक्षणाधिकारी विकास यादव यांनी सदर जागेची नुकतीच पहाणी केली. शाळेच्या इमारतीसाठी ही जागा देण्यास सकारात्मकता दाखवली. यामुळे उजनीनगर जिल्हा परिषद शाळेच्या इमारतीचा प्रश्न खऱ्या अर्थाने मार्गी लागला आहे असे श्री. कुटे यांनी सांगितले. या जागेत शाळेची सुसज्ज अशी इमारत होईल. विद्यार्थ्यांसाठी स्वतंत्र शौचालय, क्रीडांगण, किचन शेड, पिण्याचे पाणी, ग्रंथालय, संगणक कक्ष, मुख्याध्यापक कक्ष, संरक्षण भिंत आणि वृक्षरोपण यासारख्या अत्यावश्यक सुविधा उपलब्ध होतील असेही माजी उपसरपंच वैभव कुटे यांनी पत्रकारांशी बोलताना सांगितले.

### घरासमोर गोंधळामुळे एकास मारहाण; चौघांविरुध्द गुन्हा

**तभा वृत्तसेवा,**
**मंगळवेढा, दि.८ मे-**

बोराळे येथे दारु पिवून घरासमोर गोंधळ का घालतो? अशी विचारणा करताच एकास लाथाबुक्क्यांनी मारहाण करुन शिवीगाळ करण्याचा प्रकार घडला असून राजू नकाते, संजय नकाते, लक्ष्मण आवताडे, स्वाती आवताडे या चौघा विरुध्द गुन्हा



दाखल झाला आहे. पोलीस सुत्रांच्या माहितीनुसरा अशी,यातील फिर्यादी आरती रामेश्वर आवताडे (वय२०) हे व वरील आरोपी नातेवाईक असून यातील आरोपीने फिर्यादी याचा नवरा रामेश्वर यास तू दारु पिवून घरासमोर गोंधळ का घालतो याचा त्रास आम्हाला होतो. असे म्हणताच फिर्यादीच्या पतीस आरोपीने लाथाबुक्याने मारहाण करुन शिवीगाळ व दमदाटी केली असल्याचे दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे. याचा अधिक तपास पोलीस हवालदार वाघमोडे हे करीत आहेत.



# कमलापूर येथे कायदेविषयक शिबीर

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि. ९ मे-**

सांगोला तालुका विधी सेवा समिती व विधिज्ञ सेवा संघ, सांगोला यांच्या संयुक्त विद्यमाने सांगोला तालुक्यातील कमलापूर ग्रामपंचायत येथे कायदेविषयक मार्गदर्शन शिबिर पार पडले. शिबिराच्या अध्यक्षस्थानी सांगोला न्यायालयाचे दिवाणी न्यायधीश बी.एम. पोतदार तर प्रमुख पाहूणे म्हणून सांगोला दिवाणी न्यायालयाचे २ रे सह दिवाणी न्यायाधीश एस.एस. साळुंखे, सांगोला विधीज्ञ संघाचे अध्यक्ष ॲड.एम. एन.ढाळे, सचिव ॲड.अजय तोरणे, सहसचिव ॲड. एस.व्ही.बोत्रे, पंचायत समितीचे पुकळे, तोडकरी तसेच कमलापूर गावचे सरपंच रावसाहेब अनुसे, उपसरपंच नितीन काळे, माजी सरपंच कलावती बंडगर, ग्राम पंचायत सदस्य, ग्रामसेवक खटकाळे उपस्थित होते. शिबिरामध्ये महाराष्ट्र दिनावर ॲड. टी.एम.टकले, कामगार दिनावर ॲड.एस.के.बनसोडे, आंतरराष्ट्रीय जैवविविधता दिवस यावर ॲड. ई.डी.कमले यांनी मार्गदर्शन केले. न्यायाधीश बी.एम.पोतदार यांनी मनोगतात सामाजिक क्षेत्रामध्ये काम करणा-या महीलांचे हक्क व अधिकार अबाधीत राखता यावेत याकरीता बनविण्यात आलेल्या कायद्यांची माहीती दिली. प्रास्ताविक ॲड.व्ही.बी.चव्हाण, सुत्रसंचालन ॲड. व्ही.एस.बेले यांनी केले. शिबिर यशस्वी करण्यासाठी न्यायालयातील कर्मचारी वाय. जी. तारे, पी. बी. शिंदे, संतोष शिंदे यांनी परिश्रम घेतले.

# बौद्ध धम्म परिषदेचे आज आयोजन

**अक्कलकोट, दि. ९ मे-**

दि. बुद्धिस्ट सोसायटी ऑफ इंडिया तथा भारतीय बौद्ध महासभा अक्कलकोटच्या वतीने बौद्ध धम्म परिषद व बौद्धाचार्य श्रामणेर शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

दि. १० मे रोजी बौद्धाचार्य श्रामणेर शिबिराचे उद्घाटन हसापूर येथे संपन्न होईल. हे शिबिर दहा दिवसीय निवासी शिबिर असेल. यामध्ये बौद्ध धम्म संघ, बौद्ध जीवनाची पद्धती, पारमिता, अष्टांगिक मार्ग, बौद्ध धार्मिक स्थळे, मंगल उत्सव सण, जगाचा अनेक धर्माचा तुलनात्मक अभ्यास, संपूर्ण विधीची प्रात्यक्षिके, अंधश्रद्धा नष्ट करण्यासाठी प्रत्यक्ष प्रयोगातून सादरीकरण, डॉ. बाबासाहेब आंबेडकर धम्मक्रांती याच बरोबर लोकशाही मजबूत करणारे भारतीय संविधान, ध्यान आणि विपश्यना यासारख्या ध्यानपद्धती शिकविले जातात बौद्ध धम्माचे विविध विषय तत्त्वज्ञान सांगितले जाते. कार्यक्रमाचा समारोप १९ मे रोजी बौद्ध धम्म परिषदेने होईल. याबाबतची माहिती बौद्धाचार्य साहिल कांबळे तालुकाध्यक्ष भारतीय बौद्ध महासभा अक्कलकोट यांनी दिली.

# मराठा सेवा संघाच्या महाअधिवेशनास करमाळ्यातील शेकडो कार्यकर्ते जाणार

**तभा वृत्तसेवा,**
**करमाळा, दि. ९ मे-**

मराठा सेवा संघाचे महाअधिवेशन १०, ११ व १२ मे रोजी अकलूज येथे होणार असून, या अधिवेशनात करमाळा तालुक्यातील मराठा सेवा संघ, संभाजी ब्रिगेड, जिजाऊ ब्रिगेडचे शेकडो कार्यकर्ते जाणार यासंदर्भातील नियोजनासाठी जेऊर येथील संभाजी ब्रिगेडच्या संपर्क कार्यालयामध्ये मराठा सेवा संभाजी ब्रिगेड संघाची बैठक नुकतीच पार पडली.

अकलूज येथे शनिवार १० मे रोजी अधिवेशनाचे उद्घाटन होणार असून संध्याकाळी जागर विचारांचा, जागर संस्कृतीचा हा सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. रविवार ११ मे रोजी दिवसभर व्याख्यान सत्रांचे आयोजन करण्यात आले आहे. तर सोमवार १२ मे रोजी नवोदित कवींचे काव्यसंमेलन, परिसंवाद, विशेष व्याख्याने होणार आहेत, तर समारोप व कृतज्ञता समारोहाने या अधिवेशनाची सांगता होईल. यावेळी नितीन खटके, सचिन काळे, बाळासाहेब झोळ, सतीश वीर, अजित कणसे, संतोष शितोळे, प्रविण शिंदे, नवनाथ मस्कर, सुहास पोळ, अतुल निर्मळ, गणेश कुकडे, संदिप रोडगे, राज झिंजाडे, भीमराव लोंढे, जाधव, निलेश पाटील, सोमनाथ जाधव, अजित उपाध्ये, सागर साखरे, सागर कोठावळे, आदिनाथ माने, सागर बनकर उपस्थित होते.

CMYK

आपला
# जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## शैक्षणिक कामासाठीचे दाखले काढून घेण्याचे प्रांताधिकाऱ्यांचे आवाहन

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर,दि.९ मे -**

इयत्ता दहावी आणि बारावीच्या निकालानंतर पुढील प्रवेश प्रक्रियेकरीता विद्यार्थी व पालकांची विविध दाखले काढण्यासाठी आपले सरकार सेवा केंद्र व सेतू कार्यालयात गर्दी होते. त्यामुळे ब-याच विद्यार्थ्यांना दाखले मिळण्यास विलंब होतो. त्यामुळे शैक्षणिक कारणासाठी लागणारे विविध दाखले त्वरीत काढून घेण्याचे आवाहन प्रांताधिकारी सचिन इथापे यांनी केले आहे.

विद्यार्थी व पालकांनी पुढील प्रवेशाकरीता गरजेचे शैक्षणिक दाखले मिळण्यासाठी जवळच्या सेतु केंद्रात, आपले सरकार केंद्र येथे अर्ज करावेत. तसेच ठराविक दरापेक्षा अतिरिक्त दर आकारल्यास आपले सरकार सेवा केंद्र व सेतू कार्यालयात दर्शनी भागात क्यू आर (ठठ)कोड उपलब्ध करून देण्यात आले आहेत,संबंधिताना क्यु आर कोड स्कॅन करून यावर तक्रार नोंदवण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आलेली आहे, यावरील तक्रारीची तात्काळ दखल घेऊन त्यासंबंधी कारवाई करण्यात येईल असेही प्रांताधिकारी सचिन इथापे यांनी सांगितले आहे. तसेच तहसिल कार्यालय पंढरपूर यांच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर अभियान ग्रामस्तरावर राबविण्यात येणार आहे.




## महत्वाचे...



### वटवृक्ष मंदिरात स्वामी दर्शनाचे उत्तम नियोजन : आ. बंटी भांगडिया

**अक्कलकोट, दि. ९ मे-**

येथील श्री वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थान हे श्री स्वामी समर्थांचे मूळस्थान आहे, त्यामुळे स्वामीभक्त हे स्वामींच्या या मूळस्थानी आवर्जून येत असतात व अत्यंत भक्ती भावाने स्वामी समर्थांच्या चरणी नतमस्तक होत असतात. ही बाब लक्षात घेऊनच मंदिर समितीचे चेअरमन महेश इंगळे यांच्या अधिपत्याखाली भाविकांच्या भक्तीला दाद देत वटवृक्ष मंदिरात स्वामी दर्शनाचे उत्तम नियोजन असल्याचे मनोगत चिमूर भाजपाचे विद्यमान आमदार बंटी भांगडिया यांनी व्यक्त केले. ते नुकतेच येथील श्री वटवृक्ष स्वामी महाराज मंदिरास सपत्निक भेट देऊन श्री स्वामी समर्थांचे दर्शन घेतले. याप्रसंगी मंदिर समितीच्या वतीने समितीचे चेअरमन महेश इंगळे यांनी आमदार बंटी भांगडिया यांचा श्री स्वामी समर्थांचे कृपावस्त्र, प्रसाद, प्रतिमा देऊन यथोचित सन्मान केला. याप्रसंगी आमदार बंटी भांगडिया बोलत होते. याप्रसंगी प्रथमेश इंगळे, नगरसेवक मिलन कल्याणशेट्टी, व्यंकटेश पुजारी, श्रीशैल गवंडी, संजय पवार, प्रदीप पाटील केदार माळशेट्टी, कांतु धनशेट्टी, पवार, शिवशंकर स्वामी, लखन झंपले, नागराज कुंभार उपस्थित होते.



### आंतरराष्ट्रीय तबलावादन स्पर्धेत सुदर्शन माने प्रथम

**सांगोला, दि. ९ मे-**

पुणे येथील आभाळाखालची शाळा या संस्थेच्या वतीने सदाशिव पेठ, पुणे येथे आयोजित केलेल्या आंतरराष्ट्रीय तबलावादन स्पर्धेमध्ये नाझरा विद्यामंदिर इंग्लिश मीडियम स्कूलचे संगीत शिक्षक सुदर्शन माने यांनी प्रथम क्रमांक मिळवला. स्पर्धेमध्ये जगातील ५५ देशातील १५० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला होता. २० परीक्षकाद्वारे सदर स्पर्धेचे परीक्षण करण्यात आले होते. यामध्ये सुदर्शन माने यांनी प्रथम क्रमांक मिळवला. आंतरराष्ट्रीय स्पर्धेमध्ये मिळवलेल्या या यशाबद्दल नाझरा विद्यामंदिर प्रशाला व ज्यु.कॉलेजचे प्राचार्य बिभीषण माने, पर्यवेक्षक मधुकर धायगुडे, शिक्षक विनायक पाटील, प्रा. महेश विभुते, दिलीप सरगर यांच्या हस्ते व व सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी यांच्या उपस्थितीत सुदर्शन माने यांना सन्मानित करण्यात आले. त्यांच्या या यशाबद्दल सां.ता.शि.प्र.मंडळाचे अध्यक्ष प्रा. प्रबुद्धचंद्र झपके, सचिव मल्लिकार्जुन घोंगडे, सहसचिव प्रशुद्धचंद्र झपके, सदस्य विश्वेश झपके, मुख्याध्यापिका मंगल पाटील यांनी अभिनंदन केले.

### शिरभावी प्रादेशिक नळ पाणीपुरवठा योजना लवकरच कार्यान्वित होणार : आ. डॉ. देशमुख

**सांगोला,दि.९ मे-**

सांगोला विधानसभा मतदारसंघाचे आ. डॉ. बाबासाहेब देशमुख यांच्या प्रयत्नांना यश मिळाले असून शिरभावी प्रादेशिक नळ पाणीपुरवठा योजना लवकरच कार्यान्वित होणार असल्याची माहिती त्यांनी दिली. आ.डॉ.बाबासाहेब देशमुख यांनी नुकतीच मुंबई येथे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली. यावेळी झालेल्या चर्चेत सदरची योजना चालू न झाल्यास ८२ गावे व वाड्या वस्त्यांवर पाणी टंचाई उद्भवणार असून सध्या सांगोला तालुक्यात पाणीटंचाई जाणवण्याची चिन्हे असून सदरची योजना तातडीने कार्यान्वित करण्याची भूमिका मुख्यमंत्र्यांना पटवून दिली. सदरच्या प्रश्नाची गंभीरता लक्षात घेवून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सोलापूर जिल्हाधिकारी यांना टंचाई निधी मधून ५.४१ कोटी इतकी थकबाकी उपलब्ध करून देण्याचे आदेश दिले. या आदेशाची दखल घेत लवकरात लवकर निधी उपलब्ध करून देण्याची ग्वाही दिली. सदरचा निधी तातडीने उपलब्ध करून दिल्याबद्दल आ. डॉ.बाबासाहेब देशमुख यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे आभार मानले.

### शेतकरी उत्पादक कंपनींना १४ मे पर्यंत अर्ज करण्याचे आवाहन

**सोलापूर, दि. ९ मे-**

राष्ट्रीय खाद्यतेल अभियान तेलबिया सन २०२५-२६ अंतर्गत सोयाबीन पीकासाठी सोलापूर जिल्ह्याची निवड करण्यात आलेली आहे. या योजनेअंतर्गत मुल्य साखळी भागीदार यांचे मार्फत संपुर्ण जिल्हयातील कार्यक्षेत्रात समुहामध्ये प्रमाणित बियाणे वितरण, शेतकरी प्रशिक्षण व शेतीशाळा इ. घटक राबवायचे आहेत. याकरीता खालील निकष पुर्ण करणारे शेतकरी उत्पादक कंपनी/सहकारी संस्था यांची निवड करावयाची आहे. या योजनेच्या मार्गदर्शक सुचनेच्या अधीन राहून वरील निकषांची पुर्तता करणारे इच्छूक शेतकरी उत्पादक कंपनी/सहकारी संस्था यांनी सोयाबीन पिकासाठी दि. १४ मे पर्यत वरील निकषाच्या आवश्यक त्या सर्व कागदपत्रांसह संबधित तालुका कृषि अधिकारी कार्यालयाकडे कंपनीच्या लेटर हेडवर संचालक मंडळाच्या ठरावासह अर्ज सादर करावेत. अधिक माहितीसाठी तालुका कृषि अधिकारी कार्यालयास संपर्क साधावा असे आवाहन जिल्हा अधिक्षक कृषि अधिकरी शुक्राचार्य भोसले यांनी केले आहे.

# विठ्ठल मंदिर परिसरातील घर, दुकानांवर ‘नो कॉरिडॉर’चे फलक

## सर्व्हेक्षणाचा निषेध करण्यासाठी कृती समितीचे अनोखे आंदोलन

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.९ मे -**

जिल्हा प्रशासनाकडून कॉरिडॉर बाधित नागरिकांच्या दुकाने, मालमत्तांचे सर्व्हेक्षण सुरु करण्यात आले आहे. या सर्व्हेक्षणाचा निषेध म्हणून श्री विठ्ठल रूक्मिणी मंदिर परिसरातील नागरिकांनी देखील कॉरिडॉर रद्द व्हावा या मागणीसाठी लोकशाही मार्गाने विविध प्रकारच्या आंदोलनांची हत्यारे उपसली आहेत. त्याचाच एक भाग म्हणून मंदिर परिसरातील घरांवर, दुकानांवर नागरिकांनी 'नो कॉरिडॉर'चे फलक लावुन प्रशासनाचा निषेध केला जात आहे. या बरोबरच सर्व्हेक्षणासाठी येणाऱ्यांना कोणताही विरोध न करता प्रत्येकाने बाधित नागरिकांनी आपली माहिती न देण्याचा देखील निर्णय घेतलेला आहे. ऐवढेच नाही तर कॉरिडॉर' राबविल्या जाणाऱ्या विठ्ठल मंदिर परिसरात जिल्हा प्रशासनाने कॉरिडॉर'व्हावे किंवा नको यासाठी खास मतदान घ्यावे अशी देखील मागणी केली जात आहे.

दरम्यान जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी जाहीर केल्यानुसार गुरूवारी (ता.८ ) पासून संभाव्य बाधित नागरिकांच्या सर्वेक्षणाला सुरुवात करण्यात आलेली आहे. या सर्व्हेक्षणाला अनेक व्यापारी व नागरिकांनी विरोध दर्शविला आहे. तर प्रशासनाकडून पहिल्या दिवशी गुरुवारी (ता.८) झालेल्या सर्व्हेक्षणाला नागरिकांचा उत्तम प्रतिसाद मिळाल्याचे जाहीर करण्यात आलेले आहे. या बरोबरच सर्व्हेक्षणाला सहकार्य करण्याचे देखील प्रशासनाकडून आवाहन करण्यात आलेले आहे. दरम्यान चाळीस वर्षापूर्वी मंदिर परिसरात रुंदीकरण झाल्यामुळे या भागात पुन्हा रुंदीकरणास स्थानिकांचा तीव्र विरोध आहे. प्रशासनाने कॉरिडॉर अंतर्गत मोठ्या प्रमाणात रुंदीकरणाचा घाट घातला असल्याचा आरोप व्यापारी, नागरिक व महाराज मंडळींनी केला. या विरोधात नागरिकांनी एक बैठक घेऊन पुन्हा कॉरिडॉरला विरोध सुरू करण्याचा निर्णय घेतला.



### पहिल्या दिवशीच्या सर्व्हेक्षणास उत्तम प्रतिसाद

जिल्हा प्रशासनाकडून गुरुवारी झालेल्या सर्व्हेक्षणाचे आकडे प्रसिध्दीस दिलेले आहेत. त्यामध्ये पहिल्या दिवशी गुरुवारी एकुण १९९ लोकांशी सर्व्हेक्षणासाठी संपर्क करण्यात आला. या मध्ये १४५ नागरिकांनी सर्व्हेक्षणात माहिती दिली असून केवळ ५४ लोकांनी माहिती दिली नसल्याचे जाहीर केलेले आहे.

### विविध घोषवाक्यांव्दारे निषेध

यापूर्वी २०२२ मध्ये ज्यावेळी पहिल्यांदा कॉरिडॉर होणार असल्याचे जाहीर झाल्यावर नागरिकांनी विविध आंदोलने केली होती. त्यानुसार आता पुन्हा एकदा पंढरपूर कॉरीडॉर रद्द करा, सोडा कॉरीडॉरचा अट्टहास, घेऊ नका आमच्या तोंडचा घास, एकच जिद्द कॉरीडॉर रद्द अशा प्रकारे कॉरीडॉरचा निषेध करुन आपल्या मागणीकडे प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी विविध प्रकारच्या निषेधाची घोषवाक्ये असलेले काळ्या रंगाचे फलक लावण्यात आलेले आहेत.

### पंढरपूर तिर्थक्षेत्र बचाव कृति समितीचे गठन

कॉरिडॉर बाधित संभाव्य नागरिकांनी एकत्रित येवून पंढरपूर तिर्थक्षेत्र बचाव समितीचे गठण केले आहे. या कृती समिती मार्फेत नागरिकांच्या बैठका घेऊन त्यांना कॉरिडॉरला विरोध करण्यासाठी लोकशाही मार्गाने, कायदेशीररित्या आंदोलने करण्याबाबत मार्गदर्शन केले जात आहे.

### मंदिर परिसरात मतदान घेण्याची मागणी

कॉरिडॉर करावा की नको याबाबत प्रशासनाने मंदिर परिसरात मतदान घ्यावे अशी मागणी कॉरिडॉर बाधित नागरिकांकडून प्रशासनाकडे केली जात आहे.

## जिल्हा परीषदेच्या दिशादर्शक फलकातून ग्रामपंचायत विभाग गायब

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.९ मे -**

ग्रामीण भागातून येणाऱ्या नागरिकांच्या माहितीसाठी जिल्हा परिषदेने प्रवेशद्वाराच्या दर्शनी भागात विविध कार्यालयांच्या ठिकाणांची माहिती असलेला दिशादर्शक फलक लावला असून या फलकावर ग्राम पंचायत विभागाला स्थान दिले नसल्याचे दिसून येते. सर्व विभागांची नावे फलकावर आली असताना ग्राम पंचायत विभागाचाच कसा विसर पडला ? याबाबत आश्चर्य व्यक्त केले जात आहे.

जिल्हा परिषदेमध्ये मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम व अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप कोहीनकर यांच्या मार्गदर्शनाखाली सध्या अनेक सुधारणा होत आहेत. जिल्हा परिषदेच्या परिसरातील उद्यान, रस्त्यांची सुधारणा झाली आहे.

अभ्यागतांना बैठक व्यवस्था व पिण्याच्या पाण्याची व्यवस्थाही करण्यात आली आहे. आता नव्याने जिल्ह्याच्या ग्रामीण भागातून मुख्यालयात येणाऱ्या नागरिकांसाठी कोणते कार्यालय कुठे आहे ? याची पहिल्यांदाच माहिती मिळणार असून त्यासाठी जिल्हा परिषदेच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर प्रवेशद्वारातून आत आल्यानंतर समोरच दर्शनी भागात कार्यालयांच्या नावासह मोठा दिशादर्शक फलक लावण्यात आला आहे. त्यामध्ये मुख्य इमारतीमध्ये मजलानिहाय असलेल्या सर्व कार्यालयांची माहिती आहे. परंतु जिल्हा 'परिषदेचा आत्मा म्हणून ओळख असणारा ग्रामपंचायत विभागच यातून गायब आहे.

दरम्यान, तब्बल साडेतीन वर्षे जिल्हा परिषदेच्या ग्रामपंचायत विभागाचा कारभार पाहणारे उपमुख्य कार्यकारी अधिकारी ईशाधीन शेळकंदे यांची नुकतीच राज्याचे कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांचे ओएसडी म्हणून बदली झाली आहे. शेळकंदे यांनी नुकताच पदभार सोडला आहे. शेळकंदे झेडपीतून गेले आणि आता त्यांच्यापाठोपाठ त्यांचा विभागही झेडपीतून हद्दपार झाला, अशी चर्चा सुरू आहे. दरम्यान, काही संवेदनशील नागरिकांनी याप्रकरणाची चौकशी करून दोषींवर कारवाईची मागणी केली आहे.





### वाघमारे कुटुंबियांकडून पिण्याच्या पाण्याची सोय

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.९ मे-**

बनशंकरी नगरातील श्री स्वामी समर्थ मंदिरात वाघमारे कुटूंबाकडून पिण्याच्या पाण्याची सोय करण्यात आली. जुळे सोलापूर परिसरातील बनशंकर नगर मठात श्री स्वामी समर्थ मंदिरात कालावधीसाठी उन्हाळ्यातील उष्णतेची तीव्रता लक्षात घेऊन स्वामी भक्तांसाठी श्री प्रभाकर वाघमारे व सौ महानंदा वाघमारे यांनी पिण्याच्या पाण्याची सोय ( थंडगार जार ) केलेली आहे.या सत्कार्यास श्रीशैल कोरे, सुमित डिगे, मीनाक्षी कोरे, पूजा डिगे व वैष्णवी वाघमारे यांचे मोलाचे योगदान लाभले केले. या मठाचे विजय चव्हाण महाराज यांनी विशेष आभार मानले. या सत्कार्याचे सर्व स्वामी भक्तांनी कौतुक केले आहे.

## जिल्ह्यातील दहा हजार लाभार्थ्यांना आवास योजनेचे ७० हजार अनुदान वितरीत

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ९ मे -**

फेब्रुवारी महिन्यात जिल्ह्यात प्रधानमंत्री आवास योजना टप्पा क्रमांक दोन अंतर्गत जिल्ह्यात ६२ हजार ९०० लाभार्थ्यांना घरकुल मंजूर करून त्यांना १५ हजार रूपयांचा पहिला हप्ताही देण्यात आला. डीबीटीव्दारे लाथार्थ्यांच्या बँक खात्यावर अनुदान जमा करण्यात आले. त्यामुळे जिल्ह्यातील बेघरांना घरे मिळण्यास मदत झाली. बांधकाम सुरू करण्यासाठी पहिला हप्ता देण्यात आला. त्यामुळे अनेक लाभार्थ्यांनी बांधकाम केल्यानंतर त्या लाभार्थ्यांना प्रशासनाकडून ७० हजार रूपयांचा दुसरा हप्ताही देण्यात आला आहे. ६२ हजार ९०० लाभार्थ्यांपैकी १० हजार लाभार्थ्यांना ७० हजार रूपयांचा अनुदान देण्यात आला आहे.

ज्या लाभार्थ्यांनी पाया बांधकाम करून पहिला टप्पा पूर्ण केला आहे, अशा घरकुल लाभार्थ्यांना ७० हजार रूपये देण्यात आले आहेत. घरकुल बांधकाम करणार्या लाभार्थ्यांना आता शासनाचे एक लाख २० हजार रूपये, रोजगार हमी योजनेचे ३० हजार रूपये, शौचालय बांधकामाचे १२ हजार असे एकूण एक लाख ६२ हजार रूपये मिळत होते. नुकतेच राज्य शासनाने घरकुल अनुदानात ५० हजार रूपयांची वाढ केली आहे. त्यामुळे लाभार्थ्यांना दोन लाख बारा हजार रूपये अनुदान मिळणार आहे. म्हणून लाभार्थ्यांनी घरकुल बांधकाम पूर्ण करून अनुदान रक्कमेचा लाभ घ्यावे, असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आला आहे.

> पंतप्रधान आवास योजना टप्पा दोन मधील सर्व लाभार्थ्यांना १५ हजार रूपये, तर पाया बांधकाम केलेल्या १० हजार लाभार्थ्यांना ७० हजार रूपये अनुदान वाटप करण्यात आला आहे. उर्वरित सर्व घरकुल लाभार्थ्यांनी त्वरीत बांधकाम पूर्ण करून वाढीव ५० हजार रूपये अनुदानासह दोन लाख १२ अनुदानाचे लाभ घ्यावे.
>
> **- डॉ. सुधीर ठोंबरे**
> प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा सोलापूर

## कासेगावच्या दारूबंदीचे गाऱ्हाणे थेट गृहराज्यमंत्र्यापुढे

### सरपंचासह महिलांनी घेतली भेट; मंत्र्यांचा पोलीस अधिक्षकांना तत्काळ फोन

**तभा वृत्तसेवा,**
**कासेगाव, दि.९ मे-**

कासेगाव (ता.दक्षिण सोलापूर) येथे दीड वर्षापूर्वी विशेष महिला ग्रामसभेत संपूर्ण अवैध दारूबंदीचा ठराव झाला होता. त्याची अंमलबजावणी अद्याप न झाल्याने येथील सरपंच यशपाल वाडकर यांच्यासह ग्रामस्थ व महिलांनी थेट राज्याचे गृहराज्यमंत्री योगेश कदम यांच्यापुढेच गाऱ्हाणे मांडले.

गृहराज्यमंत्री कदम हे नुकतेच सोलापूर दौऱ्यावर आले असताना कासेगावचे सरपंच वाडकर यांच्यासह ग्रामस्थ, महिला व ग्रामपंचायत सदस्यांनी त्यांची भेट घेतली. दीड वर्षांपूर्वी येथील महिला ग्रामसभेमध्ये गावात संपूर्ण अवैध दारूबंदीचा ठराव झाला होता. त्या ठरावासंदर्भात कार्यवाही करण्यासाठी पोलीस प्रशासन व उत्पादन शुल्क विभागाला वारंवार पाठपुरावा केला. तरीही अवैध दारू विक्री सुरूच आहे. विषारी रसायनयुक्त दारूमुळे अनेकांचे जीवावर बेतले आहे. तरुण पिढी बरबाद होत आहे. महिलांना मुलांना प्रचंड आर्थिक, मानसिक, सामाजिक तणावाचा सामना करावा लागत आहे. गृहराज्यमंत्र्यांनी वैयक्तिक लक्ष घालून येथे संपूर्ण दारूबंदी करावी. पोलीस प्रशासनास सूचना द्याव्यात, अशी विनंती निवेदनाद्वारे करण्यात आली. यावेळी महिलांनी मंत्री कदम यांच्यासमोर त्यांच्या व्यथा मांडल्या. यावेळी मंत्री महोदयांनी त्वरित जिल्हा पोलीस अधीक्षकांना मोबाईलवर संपर्क करून सदर विषयाकडे गांभीर्याने लक्ष देण्यास सांगितले. अवैध दारू विक्री करणाऱ्यांवर तडीपारीची कारवाई करण्यास सांगितले. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे विशेष कार्य अधिकारी मंगेश चिवटे हे यावेळी उपस्थित होते. त्यांनी देखील सदर प्रकरणात लक्ष घालण्याचे आश्वासन दिले. या भेटीसाठी शिवसेना जिल्हाप्रमुख मनीष (आण्णा) काळजे यांचे विशेष सहकार्य लाभले. यावेळी कासेगावचे लोकनियुक्त सरपंच यशपाल वाडकर, राजाराम पाटोळे, ताजुद्दीन शेख, तनुजा मुळे, प्रकाश हेडे, संभाजी चौगुले, जालिंदर गायकवाड, भरत जाधव, अनिता हेडे, सोनाली वाडकर, सौ. जाधव, सौ. तांबटकरी आदी उपस्थित होते. त्यानंतर महिलांनी उत्पादन शुल्क विभागाच्या अधीक्षक भाग्यश्री जाधव-खेतमाळीस यांनाही निवेदन देऊन कारवाईची मागणी केली.



## कांदलगांव देवस्थानसाठी पाच कोटींचा निधी देणार : पालकमंत्री गोरे

### विविध विकासकामांचे झाले भूमीपूजन

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. ९ मे-**

कांदलगांव (ता. बार्शी) येथील नृसिंह देवस्थानला लवकरच तीर्थक्षेत्राचा दर्जा देवून ५ कोटी रूपयांचा निधी देण्याचे अभिवचन ग्रामविकास मंत्री तथा पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी दिले.

मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेअंतर्गत १४ कोटी ६८ लक्ष ८५ हजार रूपये खर्चातून बार्शी-कांदलगांव सिमेंट कॉंक्रीट रस्त्याचे तसेच गावातील विकासकामांचे भूमीपूजन पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या हस्ते झाले. यावेळी माजी आमदार राजेंद्र राऊत, माजी सरपंच अरूण करडे, प्रदीप नवले, आप्पा फुरडे यांच्यासह गावातील पदाधिकारी उपस्थित होते.

पालकमंत्री गोरे म्हणाले, बार्शी उपसा सिंचन योजनेचे काम मुख्यमंत्री फडणवीस यांच्यामुळे मार्गी लागून आज या भागाला पाणी उपलब्ध झाले आहे. कांदलगांव शिवारातही ते आले आहे. मुख्यमंत्री फडणवीस यांचे माझ्यापेक्षा राजाभाऊंवर काकणभर प्रेम जास्तच आहे. त्यामुळे काळजी करू नका. देवस्थानला तीर्थक्षेत्राचा क व नंतर ब दर्जा देवू. चांदणी नदीवरील पुलाला आठच दिवसाच मान्यता दिली जाईल असेही त्यांनी यावेळी सांगितले. माजी आमदार राऊत म्हणाले, कांदलगांव हे माझे लाडके गाव आहे. पहिल्या आमदारकीच्या टर्ममध्ये पंतप्रधान ग्रामसडक योजनेतून गावचा रस्ता केला. त्यानतंर आताच्या संपलेल्या टर्ममध्ये मुख्यमंत्री सडक योजनेतून गावासाठी रस्ता मंजूर करून घेतला. कांदलगांवचा उपसा सिंचनच्या लाभक्षेत्रात समावेश केला. मुख्यमंत्री फडणवीस यांच्यामुळे उपसा सिंचन योजनेचे काम मार्गी लागून या भागाला पाणी मिळाल्याचे सांगितले.

यावेळी गावकऱ्यांच्यावतीने पालकमंत्री जयकुमार गोरे व माजी आ. राजेंद्र राऊत यांचा सत्कार करण्यात आला. प्रारंभी पालकमंत्री गोरे तसेच माजी आमदार राऊत यांनी ग्रामदैवत नृसिंहाचे मनोभावे दर्शन घेतले.

